# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ५८

## सभावृत्तांत

दिनांक - २०.०४.२०१६ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल-२०१६ ची मासिक मा. महापालिका सभा बुधवार दि.२०.०४.२०१६ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२१. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२२. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.आर.एस.कुमार

२५. मा.जावेद रमजान शेख

२६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२७. मा.राजू मिसाळ

२८. मा.नंदा विकास ताकवणे

२९. मा.नेटके सुमन राजेंद्र

३०. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३१. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३३. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३४. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३६. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३८. मा.अपर्णा निलेश डोके

३९. मा.अनंत सुभाष को-हाळे

४०. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४१. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४२. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४६. मा.वाबळे संजय मल्हारराव

४७. मा.मडिगेरी वर्षा विलास

४८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

४९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५०. मा.सुपे आशा रविंद्र

५१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५२. मा.मोहिनीताई विलास लांडे

५३. मा.अजित दामोदर गव्हाणे

५४. मा.गोफणे अनुराधा देविदास

५५. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५७. मा.महेशदादा किसन लांडगे

५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५९. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.सावळे सिमा रविंद्र

६२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६३. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६४. मा.पालांडे सुजाता सुनिल

६५. मा.बहल योगेश मंगलसेन

६६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६७. मा.कदम सदगुरु महादेव

६८. मा.गिता सुशील मंचरकर

६९. मा.कैलास महादेव कदम

७०. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७१. मा.टाक अरुण मदन

७२. मा.आसवाणी सविता धनराज

७३. मा.वाघेरे सुनिता राजेश

७४. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७५. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७६. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७७. मा.काळे विमल रमेश

७८. मा.पाडाळे निता विलास

७९. मा.विनोद जयवंत नढे

८०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८२. मा.विमलताई सुरेश जगताप

८३. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८४. मा.बारणे निलेश हिरामण

८५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६. मा.बारणे माया संतोष

८७. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८८. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८९. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९०. मा.कलाटे स्वाती मयुर

९१. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९३. मा.जवळकर वैशाली राहुल

९४. मा.जगताप राजेंद्र गणपत

९५. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९६. मा.जगताप नवनाथ दत्तु

९७. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९८. मा.प्रशांत शितोळे

९९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१००. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०१. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०२. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०३. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०४. मा.संजय केशवराव काटे

१०५. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०६. मा.पाटील सुजित वसंत

१०७. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१०८. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सह आयुक्त, मा.चव्हाण, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.इंदलकर, मा.आष्टीकर - सहा.आयुक्त, मा.साळुंके- मुख्य उदयान अधिक्षक, मा.पाटील- प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण केंद्र, मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.दुधेकर, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.पठाण, मा.लडकत, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.ओंभासे, मा.गद्दूवार, मा.शेख, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.सोनवणे - कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**------**

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक - ५२ दिनांक १९/१२/२०१५, २०/१/२०१६ व २५/१/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.विशेष महापालिका सभा क्रमांक - ५४ दिनांक १०/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका सभा क्रमांक - ५५ दिनांक २०/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ड) मा.महापालिका सभा क्रमांक - ५७ दिनांक १८/३/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, केरळ येथील पुट्टींगल मंदिरामध्ये लागलेल्या आगीत मृत्यूमूखी पडलेले नागरीक तसेच बापूसाहेब थिटे मा.गृहमंत्री व ज्येष्ठ नेते यांचे निधन, सुभाष सोपानराव भोईर सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन, नितिन भामरे सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन, ह.भ.प.सौभाग्यवती मालन दत्तात्रय म्होत्रे, माजी नगरसेवक शरद बो-हाडे यांच्या मातोश्री यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.अरुण बो-हाडे यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.महापौर-** मा.अरुण बो-हाडे.

**मा.अरुण बो-हाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शहराच्या विकासाचा जो रथ घोडदौड करतो आहे त्याला अनुषंगीक काही प्रश्न आहेत. खरेतर या प्रश्नाची उत्तर मला यापुर्वीच मिळणे अपेक्षीत होतं. येथे आल्यानंतर हे लेखी उत्तर मला मिळालेले आहेत. महानगरपालिकेचे जे बजेट आहे ते प्रत्येक वर्षी प्रत्येक नगरसेवक आपआपल्या प्रभागामध्ये अतीशय प्रयत्नपुर्वक मंजूर करुन घेत असतात. परंतु त्याच्या कामाची पुर्तता मात्र त्या त्या वेळेमध्ये होत नाही. आपण आकडेवारी पाहीलीतर शंभर टक्के बजेट वापरले जाणे गरजेच आहे. त्या वर्षी एखादया गोष्टीसाठी १० लाख रुपये लागणार असतीलतर ते काम लांबत गेलेतर पुढच्या वर्षी ते काम १५ ते २० लाखाचे होते, थोडक्यात त्या त्या वर्षाचे बजेट त्या त्या वर्षी वापरले जाणे काम वेळेवर होत जाणं हे अपेक्षीत आणि गरजेच आहे. कारण असतील, स्पष्टीकरण दयायची वेळ आलीतर त्या त्यावेळी फार छान स्पष्टीकरण आपले अधिकारी देतात. त्याचप्रमाणे सर्वांच्या पुढे उत्तर आहेत. जेएनएनयुआरएम अंतर्गत किंवा इतर योजने अंतर्गत जो निधी आम्हांला मिळालेला आहे त्या त्या निधीचा वापर आपण केलेला आहे. हे शहर विकसीत होत असताना गेल्या ४० वर्षामध्ये पाहीलेतर दहा दहा वर्षाचे टप्पे पडलेले आहेत आणि आता आपल्याकडे मोशी, च-होली, चिखली हा नव्याने समाविष्ट झालेला भाग मोठयाप्रमाणात विकसीत होत आहे. मी मुद्दामहून असे प्रश्न विचारले की गेल्या दहा वर्षामध्ये मोशी, च-होली या दोन गावामध्ये किती गृहप्रकल्पाला आपण मंजूरी दिलेली आहे. त्यातील आकडेवारी पेक्षा या स्किमला मंजूरी देत असताना डीसी रुल्सचे १०० टक्के पालन झालेले आहे का. कागदोपत्री निश्चितच त्याचे उत्तर होकारात्मक असेल. आयुक्त साहेब, आपण जर साईडवरती गेलेतर नुसत्या मोशीमध्ये किमान अशा डझनभर स्किम सापडतील की त्याठिकाणी शंभर टक्के डीसी रुल्सचे पालन झालेले नाही. मला आरोप करायचा नाही पण माझा हा दावा आहे की पध्दतशीरपणे काही गोष्टीकडे डोळेझाक करुन अशा स्किमला मंजूरी दिलेली आहे. ज्याठिकाणी जाण्यासाठी दहा-पंधरा फुटाचा रस्ता नाही त्याठिकाणी सहा सहा मजली इमारती झालेल्या आहेत. काही ठिकाणी रस्ताच नाही अशा ठिकाणी देखील गृहप्रकल्पाला मंजूरी देण्यात आलेली आहे. एखादया साध्या शेतक-यांने किंवा राहिवाशाने स्वत:च्या घराच्या मंजूरीसाठी प्लॅन जर दिलातर तो हेलपाटे मारतो, वैतागतो आणि सोडून देतो आणि मग या शहरामध्ये अनधिकृत बांधकाम उभी राहतात त्याच बी तिथं रुजलेल आहे. पण त्याचवेळेला दुस-या बाजुला बिल्डर्सने दिलेल्या मात्र मोठमोठया स्किम्स, बहुमजली ईमारती झाल्या त्यामध्ये

शेकडो लोक त्या भागामध्ये आहेत जर काही एखादी दुर्घटना दुर्दैवाने घडलीतर त्याठिकाणी वेळेवर ॲम्ब्युलन्स जाऊ शकणार नाही किंवा फायर ब्रिगेडची गाडी वेळेवर जाऊ शकणार नाही. तुम्ही मला म्हणाल नाव दया मी नाव देणार नाही, माझ्या कडे नाव आहेत पण माझी अशी विनंती आहे की आयुक्त साहेब, प्रशासनाचे लोक नगरसेवक किंवा अन्य कोणी त्रयस्त पार्टी यांची एक जॉईंट कमिटी आपण यावर निर्माण करावी आणि त्यांनी ती पाहणी करावी. गेल्या दहा वर्षात प्रोजेक्ट, स्किम्स मंजूर झालेल्या आहेत त्याचे आपण ऑडीट करुन घ्यावे. आपल्या निदर्शनास येईल पुणे शहरात दोन वर्षापुर्वी आपण पाहील आहे की एक मोठी ईमारत बांधकाम चालू असताना कोसळली. आपल्या येथे सुध्दा एखादी घटना घडते मग अधिकृतपणे आपण ज्यांना परवानग्या दिलेल्या आहेत अशा ईमारती तुम्ही जर चुकीच्या पध्दतीने काही मंजूर केलेल्या असतीलतर त्याच्याकडे डोळेझाक करुन चालणार नाही. शहराचा विकास होतो म्हणजे नेमके काय होते. कोणत्याही शहराचा विकास होत असताना, आपण स्मार्ट सिटीमध्ये आहोत, बेस्ट सिटी ॲवॉर्ड आपण घेतलेला आहे. परंतु कुठेतरी आम्ही सर्वानी राजकीय नेत्यांनी, प्रशासकीय यंत्रणेनी याचा विचार केला पाहीजे. या शहरामध्ये आम्ही किती लोकसंख्या ठेवू शकतो. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आपल्याला एकमेव पवना धरण आपल्याला आहे. भविष्यात भामा-आसखेडचे पाणी कधी मिळेल, किती मिळेल हे कोणी काही आज सांगू शकत नाही. जी येईल फाईल की त्याला दया मंजूरी, आली फाईल की त्याला दया मंजूरी. तुम्हांला ते रोखता येणार नाही परंतु काहीतरी धोरण या विषयाचे निर्माण केले पाहीजे. किती लोकसंख्येला आपण या सर्व सुविधा देवू शकतो पिण्याच्या पाण्याची सुविधा असेल, जलनिस्सारण सुविधा असेल किंवा इतर अनेक सुविधा असतील. किती लोकसंख्येचा आम्ही विचार केला पाहीजे. कुठेतरी याचा आम्ही गांभीर्याने विचार केला पाहीजे. याला लॉक करता आल पाहीजे. आयुक्त साहेब, या शहराचा पाया हा औदयोगीकीकरणाचा आहे. शहराच्या औदयोगिक उत्पदनातून मिळणारे स्त्रोत आहे तो खरा आमच्या उत्पन्नाचा आत्मा आहे. एका बाजूला उदयोगधंदे बंद पडत चाललेले आहेत. बेरोजगारी त्याठिकाणी निर्माण होत आहे. आणि त्याचवेळेला आम्ही त्या कारखान्यांना त्यांच्या असलेल्या जमिनीचा आम्ही मात्र आयटूआर मध्ये मोठया प्रमाणामध्ये आम्ही चाललेलो आहोत. आपल्याकडे उत्तर आहे, नियमाने करतो, शासकीय नियमाने करतो, महापालिकेच्या नियमामध्ये तशी तरतूद आहे, निश्चित असेल परंतु आम्हांला याचाही विचार केला पाहीजे की या नुसत्या ईमारती उभ्या जर राहील्यातर उदया या शहराचे होणार काय? उत्पन्नाचे स्त्रोत आम्ही घालवतोय का? त्याठिकाणी आम्हांला काही आपली जबाबदारी पार पाडता येईल का? राजकीय नेतृत्व आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्या सजगतेने, सावधपणे, जागरुकपणे या उदयोगधंदयाच्या अडचणी आम्हांला सोडविता आल्या पाहीजेत, हे उदयोगधंदे टिकले पाहीजेत. केवळ उदयोगधंदयातल्या जमिनीतीला काही पार्ट आपल्याला मिळतो, त्यांच्या त्याठिकाणी फाईल येतात, नियमामध्ये तरतूद आहे, कायदयामध्ये तरतूद आहे म्हणून आपण

त्याचा आयट्रआर करायचा आणि स्किमला मान्यता दयायची यातून मिळणारे भविष्य काळातील उत्पन्न आणि त्यांना आम्ही देवू शकणा-या सुविधा आणि आपल्याकडे असणार आर्थीक बजेट मला वाटत आपल हे बजेट दिवसेंदिवस कमी होईल की काय असे दिसते. याचे कुठेतरी बॅलेन्स साधता आले पाहीजे या आर्थाने प्रश्नोत्तर आम्ही दिले आहेत. पाठीमागे आम्ही सांगीतलेले होते की पर्यटनावर विचार करत असताना मोशी, चिखली, च-होली या भागात काही नैसर्गीक टेकडया आहेत आम्हांला त्याचा काही वेगळया अँगलने विचार करता येईल का. खुप सुंदर अशा त्या टेकडया आहेत. त्याठिकाणी उदया ईमले आणि बंगले उभे राहण्यापेक्षा त्याठिकाणी एकतर चांगल्या पध्दतीच कृषिपर्यटन उभं करता येईल, त्यादृष्टिने त्याचा विकास करता येईल. त्याठिकाणची आम्हांला वृक्षवल्ली जतन करता येईल अतीशय सुंदर भाग आहे. मुळातच तेथून इंद्रायणी नदी वाहते इंद्रायणी नदीला आध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. तीच्या परिसरात अतीशय सुंदर टेकडयांच निसर्गानं दिलेल वर्दान आहे. मला आठवतय आम्ही लहाणपणी शाळेमध्ये असताना कै. आण्णासाहेब मगर यांनी या महानगरपालिकेला काहीतरी पर्यटनाच क्षेत्र असाव म्हणून दुर्गादेवी टेकडीसाठी प्रयत्न केलेले होते. त्यांनी संरक्षण खात्याकडून ती टेकडी आपल्याला प्रयत्नपुर्वक मिळवून घेतलेली आहे आणि आज मात्र आमच्या शहरामध्ये असलेल्या या टेकडयांकडे आम्ही कानाडोळा करतो की काय असं मला वाटत. मोशीमधील्या टेकडया मध्ये मधल्या काळामध्ये खाणी झाल्या आहेत. खाणींचे मला वाटत त्याठिकाणचे काहींचे करारही संपत आलेले आहेत. ते सुध्दा आम्हांला पर्यटनाच्या दृष्टिने विकसीत करता येईल त्यादृष्टिने आपण काही कराव. आपले जे तज्ञ नेमलेले आहेत त्यांना त्याठिकाणी घेवून जावं. आम्हांला त्याठिकाणी विजनिर्मीतीचा उपयोग करुन घेता येईल का. काही प्रमाणात का होईना आम्हांला त्याठिकाणी विजनिर्मीतीचा स्त्रोत निर्माण करता येईल का हे पाहता येईल. खाणीच्या जागेमधुन सोलर एनर्जीचा उदयोग आम्हांला करता येईल का. वेगवेगळया पध्दतीने आपल्याला या शहराकडे पाहील गेलं पाहीजे. स्मार्टसिटीमध्ये ही चर्चा करत असताना याठिकाणी सरकारकडून आलेले पैसे आणि आपल्याकडे असलेली साधनसामुग्री याचा मेळ घालण्याच्या दृष्टिने उपाययोजना आहे हा एक मार्ग आहे असं मला वाटतं. बाकीची आकडेवारी आपण दिलेली आहे परंतु पाण्याच्या प्रश्नावरती आपणास पुन्हा एकदा माझ निवेदन आहे की सभागृहाने याच्यावरती गांभीर्याने विचार केला पाहीजे. कारण संपुर्ण पुणे जिल्हयाचे औदयोगीकीकरण किंवा नागरीकरण होत असताना आपल्याकडे असलेली धरण हे भविष्यामध्ये कमी पडणार आहेत. चाकण वाढत आहे, आळंदी वाढते आहे. पवना धरण आणि भामा-आसखेडच्या धरणातून ऑलरेडी आता पुणे महापालिकेची पाईपलाईन चालू केलेली असताना आळंदीकरांनी ती पाईपलाईन आडवलेली आहे. चाकणच्या नगरपालिकेच्या सभागृहातही ही चर्चा झालेली आहे. की हे पाणी पिंपरी चिंचवडला जाण्या आदि आमचा हा अधिकार आहे आपल्याला हे करत असताना शहरातील हया वाढत्या लोकसंख्येला, आणखी एक मला सांगायच

आहे की दररोज सकाळी तुम्ही जर पाहीलंतर निगडीच्या पुलाखाली अनेक बि-हाड बोरीबिस्तारा घेवून त्याठिकाणी आलेले असतात. संततुकारामनगरच्या एसटी स्टॅण्डच्या ठिकाणी अनेक बि-हाड येत असतात. हे बि-हाड जातात कुठे, राहतात कुठे की पुन्हा नव्याने झोपडया होतात की काय. एका बाजूला आपण झोपडपट्टी पुनवर्सनासाठी चांगल काम करत असताना याजर झोपडपट्टया वाढत असतीलतर त्याचा देखील आपल्याला पाठपुरावा करावा लागेल. मा.महापौर साहेब, माझे प्रश्न घेतले मात्र उत्तर मला आज मिळाले आहेत. मला बोलण्यास आपण संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रश्नोत्तरामध्ये जे प्रश्न सन्मा. अरुणशेठ बो-हाडे यांनी विचारलेले आहेत आताच स्थायी समितीमध्ये यासंदर्भात सर्व सदस्यांनी आणि मी स्वत: त्याठिकाणी मागणी केलेली आहे. आपलं शहर वाढते आहे. १० लाख लोकसंख्या ही आज २० लाखावर गेलेली आहे व मिळणारे पाणी तेवढेच आहे, संख्या मात्र वाढत चालली आहे. आंद्रा-मावळ, भामा-आसखेड या दोन्ही प्रकल्पाच्या आपण प्रतीक्षेमध्ये आहोत. अजून त्याचा डीपीआर सुध्दा तयार झालेला नाही. नंतर शासनाची मंजूरी आणि प्रत्यक्षात कामाला सुरवात याच्यामध्ये किती कालावधी जाईल हे सांगता येणार नाही आणि अशा परिस्थितीमध्ये शहर झपाटयाने वाढत आहे. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जी १८ गाव समाविष्ट झालेली आहेत त्याच्या नागरी सुविधेवर विशेष ताण आलेला आहे. स्थापत्यावरती स्थायी समितीमध्ये आम्ही सर्व सदस्य बोलत होतो, व्यथा मांडत होतो. सर्वात महत्वाचा भाग म्हणजे पाणी. पाण्यासंदर्भात वेगळे सांगायला नको. कारण आता उपलब्ध पाणी आणि लोकसंख्या याचा ताळमेळ बसायला पाहीजे. त्यामुळे आता सन्मा. अरुणशेठ बो-हाडे यांनी जो मुद्दा मांडला तोच मुद्दा मी अनेकवेळा सभागृहात, स्थायी समितीमध्ये मांडलेला आहे. मुळात आपल्या बिल्डींग परमीशन कडून ज्या पध्दतीने बांधकाम परवाने दिले जातात तेच मुळात नियमबाहय आहेत. डीसी रुल तपासून त्याठिकाणी बिल्डींग परमीशन दिले जात नाहीत. ज्याठिकाणी अरुंद रस्ते आहेत, ज्याठिकाणी ड्रेनेज नाही, पाण्याची लाईन नाही अशा ठिकाणी त्या त्या संबंधीत विभागाकडून बोगस दाखले दिले जातात आणि ते एकप्रकारचे बोगस प्रकरण तयार होते त्याला आपले बिल्डींग परमीशन दिले जाते. प्रत्यक्ष लोक राहण्यासाठी येतात त्यावेळेस ते सन्मा.सदस्यांकडे जातात. शेवटी पाणी हा त्यांचा अधिकार आहे, आपण त्या लोकांना पाणी देणे गरजेचे आहे. अशावेळी आपण कुठतरी पळवाट काढून त्यांना पाणी देण्याचा प्रयत्न करतो. आज अशी परिस्थिती आहे की आपण त्यांच्या अपेक्षा पुर्ण करु शकत नाहीत. ही परिस्थिती आज आपल्या डोळयासमोर आलेली आहे. मग यापुढे आपण जागरुक होणार आहेत की नाहीत, याच्यामध्ये काही बदल करणार का नाहीत की अशीच परिस्थिती आपण पुढच्या पाच दहा वर्षे वाट पाहणार आहोत का. सर्वात महत्वाची गोष्ट की ज्यावेळेस आपण पुर्णत्वाचा दाखला देतो आजही या भागामध्ये जवळ जवळ ९० टक्के बांधकाम व्यावसायीक

पुर्णत्वाचा दाखला न घेता त्याठिकाणी पझेशन दिले जाते. त्यां लोकांना आपण पाणी देणं गरजेच आहे, त्यामुळे कुठल्याही प्रकारचा त्याचा पुर्णत्वाचा दाखला आहे किंवा नाही याची चौकशी न करता आपण त्याठिकाणी त्यांना पाणी देतो. मुळात बिल्डरची जबाबदारी आहे तो त्याठिकाणी फ्लॅट विकतो, लोक रहायला येतात तो त्याठिकाणाहून निघून जातो. प्रशासन सुध्दा वर हात करते. जबाबदारी येते नगरसेवकांची. ही परिस्थिती निर्माण होण्यासाठी कारणीभूत कोण, दोषी कोण. त्याठिकाणी सन्मा.प्रशासक आणि बिल्डर यांची जी काही आभद्र युती आहे त्या आभद्र युतीमुळे आज शहरावर प्रचंड सुविधेचा ताण निर्माण झालेला आहे त्याला केवळ आणि केवळ आपल प्रशासन जबाबदार आहे. वेळीच आपण जर याची दखल घेतली नाही, वेळीच आपण जर त्याच ऑडीट केल नाही, वेळीच जर दक्षता कमिटीच्या माध्यमातून चौकशी केली नाहीतर आगामी काळामध्ये शहर हे बकालीकरण झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून मी संक्षिप्त याठिकाणी आपल्याकडे मागणी करतो. ही जी १८ गाव आहेत ज्याठिकाणी झपाटयाने मोठमोठे गृहप्रकल्प झालेले आहेत त्याची पुर्ण चौकशी करा. जोपर्यंत आपल्याला पुरेशे पाणी मिळत नाही आंद्र-मावळचे पाणी आपल्याला जोपर्यंत येत नाही तोपर्यंत पुढचे मोठमोठे गृहप्रकल्प आहेत त्यांना आपण तात्पुरती परवानगी देवू नये आणि जर तसे झालेतर पाण्याचं शंभर टक्के युध्द या शहरामध्ये निर्माण होणार याच्यामध्ये मला काही संशय वाटत नाही. म्हणून या ज्या सगळया मागण्या पोटतिडकीने सदस्य याठिकाणी मांडतात याचा सन्मा.आयुक्त साहेब, आपण विचार करावा एवढीच विनंती करतो. दुसरी महत्वाची गोष्ट याला अनुसरुनच आहे ज्यावेळेला उदयान विभागाकडून एनओसी दिली जाते आणि त्यांच्याकडून अनामत रक्कम घेतो. आज अशी परिस्थिती आहे ९० टक्के बांधकाम व्यावसायीक ही अनामत रक्कम परत घेण्यास येत नाहीत. याचा अर्थ असा होतो की त्यांना एका झाडाला जी काही अनामत रक्कम असते ते झाड त्याठिकाणी ते लावत नाहीत आणि त्यांची अनामत रक्कम बुडल्याची त्यांना अजीबात दु:ख नसत. ईथं अनामत रक्कम महत्वाची नाही हे आरोग्याच्या दृष्टिकोनातून, पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून ती झाड त्याठिकाणी लावली गेली पाहीजेत. त्यामुळे आपण या नियमात काहीतरी बदल करा, एकतर ती अनामत रक्कम त्याच्याकडून १०० पटीने घ्या अन्यत: जोपर्यंत ती झाड दोन वर्षामध्ये वाढली जात नाहीत तोपर्यंत त्यांना पुर्णत्वाचा दाखला देवू नका. ज्यावेळेस लोक राहायला त्याठिकाणी येतात त्यावेळेस आपले अधिकारी सांगतात की पुर्णत्वाचा दाखला न घेता लोक राहण्यासाठी येतात. अशाठिकाणी अतीशय मामुली दंड त्या बांधकाम व्यावसायीकावरती आहे त्याच्यामुळे त्याच फावतं, तो म्हणतो पुर्णत्वाचा दाखला घेण्यापेक्षा मी दंड भरेल व दंड भरल्यानंतर त्याला ते माफक वाटतं. म्हणून माझ म्हणणं असं आहे की पुर्णत्वाचा दाखला घेण्याअगोदर जे लोक रहायला येतात त्या बांधकाम व्यावसायीकावरती आता जो दंड आहे तो दहापट करावा. आज एका सदनिकेला दहा हजार रुपये दंड आहे. तरी नियमात आपल्याच पातळीवरती सभागृहामध्ये बदल करुन दंड १०

पट करावा जेणे करुन नागरी सुविधेवर ताण येणार नाही व आपण नागरीकांना चांगल्या सुविधा देवु एवढच याठिकाणी मी बोलतो

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाणीपुरवठयामध्ये तीन दिवस पाणी कमी मिळालेले आहे आणि २० लाख लोकांची अडचण झालेली आहे. हे डॅम मधुन पाणी कमी सोडल्यामुळे झालेले नाही वेगळया कारणामुळे हे झाले ते कारण काय याबद्दल प्रशासनाकडून माहिती पाहीजे. माझ्या माहितीप्रमाणे काही अधिका-यांच्या निग्लीजन्समुळे २० लाख लोकांना पाणी व्यवस्थीत मिळालेले नाही. हा कोणाचा हलगर्जीपणा आहे याबद्दल माहिती पाहीजे. तीन दिवसात काय झाले. डॅममधुन व्यवस्थीत सप्लाय केलेला आहे. ते पाणी आपल्यापर्यंत का पोहचलेले नाही याच स्पष्टीकरण पाहीजे.

**मा.दत्तात्रय साने-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमचे सहकारी मित्र अरुण बो-हाडे यांनी ग्रामीण भागातील काही प्रश्न विचारलेले आहेत. मी विनंती करतो की आर.एस.कुमार यांनी सांगीतले आहे. शहरामध्ये अचानक नदीमध्ये कोणीतरी बंधारा टाकला आणि दोन दिवस शहरातील पाणी विष्कळीत झालेले आहे. पाण्याची परिस्थिती, दुष्काळाची परिस्थिती पाहता शहरामध्ये अशी घटना घडनं हे आपल्या महापालिकेच्या दृष्टिने दुर्भाग्य आहे. आमचा भाग हा नवीन वाढता ऐरीया झालेला आहे. मोठमोठया ईमारती आमच्या भागामध्ये होत आहेत. माझ्या प्रभागातील उदाहरण देतो. एका प्रभागात नागरीकाला एक इंची पाणीकनेक्शन दयायचे म्हणलेतर आम्हांला पाणीपुरवठा आपल्याकडे सुरळीत नाही, पाणीपुरवठा कमी आहे, आम्हांला कनेक्शन देता येत नाही असे म्हणणारे आपले अधिकारी महाशय आणि दुस-या ठिकाणी दोन-दोन इंच बिल्डर्सला कनेक्शन दिलेले आहेत असे अधिकारी आपल्याकडे आहेत. आपण सांगीतल्याप्रमाणे मध्यंतरी आदेश काढला होता की ज्या नवीन सदनीका आपल्या भागात झालेल्या आहेत त्यांचे कम्प्लेशन सर्टिफीकेट, त्यांना पझेशन दिलेले आहेत त्या नवीन लोकांना कनेक्शन दयायचे नाही असा फतवा काढलेला पेपरला आलेला होता. तुम्ही नुसते पेपरला देता का आपल्या अधिका-यांच्या कानापर्यंत जात की नाही. बिल्डर्स लोक आमच्याकडे येतात आम्हांला परमीशन दिलय, महानगरपालिकेनी आम्हांला सांगीतलय मग तुमची काय अडचण आहे, नगरसेवक या नात्याने तुम्ही का आडवता हा त्यांचा प्रश्न असतो मग ते नागरीकांना सांगणार की तुमचा नगरसेवक पाणी आडवतो. अधिका-यांनी चुकायचे आणि नगरसेवकांनी फेस करायचे का. माझ्या प्रभागामधली घटना आहे. आमच्या भागातील पाण्याची परिस्थिती वाईट आहे. मोरेवस्तीला पाणी कमी पडते आणि तुम्हांला कनेक्शन देवून आम्ही करायच काय. २५६ फ्लॅटला दोन दोन इंची कनेक्शन देताय ते बंद केल्यानंतर आम्ही अधिका-यांना विचारलेतर ते म्हणाले आम्ही परमीशन दिलेले आहे. या विषयाची सखोल चौकशी करुन एकतर तुम्ही आदेश काढलेला असताना आपल्या अधिका-यांनी त्यांना कनेक्शन दयायचे कारण काय. शहरात पाण्याची परिस्थिती वाईट असताना एका बाजूला तुम्ही आदेश

काढता, एका बाजुला तुम्ही कनेक्शन कसे काय देता. सर्वसामान्य व्यक्तिंची अडवणूक करता पिळवणूक करता आणि बिल्डर्सला कनेक्शन देता. सर्वसामान्य नागरीकांसाठी अधिका-यांनी पहीलं प्राधान्य दिले पाहीजे हे सोडून बिल्डर्सच्या मागे तुम्ही पळत असालतर यामध्ये काहीतरी काळंबेर असेल असं मला वाटते. हे खालच्या महाभागान केलेल आहे असं सांगण्यात आल म्हणून या विषयावर जातीने लक्ष घालावे. शहरातील पाण्याची परिस्थिती खुप वाईट आहे. काल रावेतमध्ये बंधारा आडविल्यामुळे पाणी मिळालेले नाही. त्याचाही आम्हांला खुलासा दयावा. एखादा सर्वसामान्य नागरीक किंवा बिल्डर्स नदी आडवू शकतो, हे कोण? त्याची माहीती दयावी. तीन दिवस आम्ही त्रास भोगलेला आहे अशी घटना घडलेली आहे. अशा घटना घडलेल्या आहेत की ज्या घटनेमुळे सर्वसामान्य नागरीकास वेठीस धरण्याच्या घटना जर आपल्या शहरात होत असतीलतर त्याच्यावर आपण काय कायदेशीर कारवाई केली आहे, त्यांच्यावर काय आपण ॲक्शन घेतलेली आहे याची सविस्तर माहीती दयावी. पवना धरणामध्ये सुध्दा पाणी कमी झालेले आहे. तुम्ही एक दिवसाआड पाणी करणार आहात. पाणी एक तास दया, दोन तास दया, तीन तास दया, तुम्ही कपात केलेली आहे परंतु पाणी दयायचे असेलतर प्रेशरने पाणी दयावे. दोन तास पाणी मिळालेतरी चालेल परंतु प्रेशरने दयावे. तुम्ही तीन तास पाणी देवून एक हाण्डाही भरत नसेलतर ते पाणी नाही दिलेतरी चालेल. कपात करताना काय कपात केली हे आम्हांला कळलेले नाही वेळ कपात केली का पाणी कपात केले. गेली तीन दिवस झाले एकाठिकाणी पाणी आहे आणि एका ठिकाणी पाणी बंद. बंद असेलतर शंभर टक्के बंद पाहीजे. पाणी गेले की आम्हांला त्रास, अधिका-यांना त्रास. त्यामुळे जे दयायचे आहे ते लिमीटेड दयावे आणि प्रेशर मेन्टेन करुन दयावे.

**मा.एम.टी.कांबळे (प्र.शहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह पिंपरी चिंचवड शहराचा पाणीपुरवठा जो आहे तो १५ एप्रिल पर्यंत सर्व ठिकाणी सुरळीत होता. १५ एप्रिलच्या रात्री आमच्या रावेत येथील पाण्याची लेव्हल कमी झाल्यामुळे पंप बंद करावे लागले. त्यानंतर इरिगेशन डिपार्टमेंटला संपर्क साधल्यानंतर त्यांना सांगीतले की पाण्याची लेव्हल वाढविण्यासाठी तुम्ही पाणी जादा सोडा म्हणून मी त्यांना विनंती केल्यानंतर त्यांनी रात्री पाणी सोडले. पण रविवारी त्याचा इफेक्ट आम्हांला दिसून आला नाही. त्यामुळे सद्यस्थितीत उपलब्ध पाणी नागरीकांना देण्याचा प्रयत्न केला पण रविवारी सुध्दा त्याच्यामध्ये काही सुधारणा होवु शकली नाही त्यामुळे सोमवारी सकाळी मी माझ्या सर्व अधिका-यांची बैठक घेतली आणि माहीती घेतल्यानंतर असे लक्षात आले की पाणी इरीगेशन डिपार्टमेंटने नेहमीप्रमाणे सोडलेले आहे परंतु आपल्या पर्यंत पोहचण्यास अडचणी झालेल्या आहेत त्यासाठी या विषयी जे जबाबदार आहेत ते श्री. गलबले व त्यांना जोडीदार श्री. तांबे यांना पाठवून सर्व वरचे बंधारे तपासण्यास सांगीतले ते तपासताना असे निदर्शनास आले की रावेत येथे नॅशनल हायवे ऑथॉरेटीच्या ब्रीजचे काम चालू आहे त्यासाठी त्या ठेकेदारांनी नदीमध्ये बांध टाकून

पाणी आडविलेले लक्षात आले. ही गोष्ट इरिगेशन डिपार्टमेंटला, मा.आयुक्तांनाही सांगीतली आणि तातडीने तो बंधारा तोडून आपला पाणीपुरवठा दोन तासात सुरळीत करुन घेतला आहे

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण उत्तर दयायला माहीर आहात. प्रश्न असा आहे बंधारा आडविला त्यांची परमीशन घेतली होती का. परमीशन घेतली असलीतरी नदीपात्र अडविणे हा गंभीर गुन्हा आहे त्याच्यावर काही आपण कायदेशिर कारवाई केली का. आपला तो अधिकार आहे का, तुम्ही काय दखल घेतली.

**मा.एम.टी.कांबळे (प्र.शहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्यावेळेस आमच्या निदर्शनास आले त्यावेळेस इरिगेशन डिपार्टमेंटच्या अधिका-यांना मी जागेवरती तातडीने बोलावून घेतले मी स्वत: तिथं होतो. नदीपात्रामध्ये बांधारा किंवा कोणत्याप्रकारच्या गोष्टी तुम्ही अनधिकृतपणे केले असेलतर त्याचेवरती कायदेशिर कारवाई करण्याचे जे अधिकार आहेत ते जलसिंचन विभागाचे असल्यामुळे त्यांना तातडीने सांगीतले. संबंधीत वरिष्ठ अधिका-यांना पण सांगीतलं. त्यांनी त्याप्रमाणे त्यांचेवरती कारवाई चालू केलेली आहे. आपल्याला ती करता येत नाही म्हणून आपण स्वत:हून काही केलेले नाही. आपली जी अडचण होती ती दुर करुन नागरीकांचा पाणीपुरवठा दोन दिवसापासून आपण सुरळीत केलेला आहे आणि आता कोणत्याही ठिकाणी पाण्याची तक्रार नाही.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्याला कायदेशिर कारवाई त्यांच्यावर करता येणार नाही का. आपण त्यांच पाणी घेतो, आपल्याला अधिकार नाही असं म्हणता येणार नाही. आयुक्त या नात्याने आपण त्यांना पत्र दयायला पाहीजे होते. आमचे असे असे पाणी खंडीत झाल्यामुळे आमच्या नागरीकांना त्रास झाल यावर कायदेशीर कारवाई करावी असे आयुक्तांनी पत्र दयायला पाहिजे होते.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तीन दिवस पाणी विष्कळीत झाले. ज्यावेळेला अधिका-यांना फोन करुन विचारल त्यावेळेला त्यांनी सांगीतले पाटबंधारे विभागाने पाणी सोडले नाही. आम्हांला नागरीकांचे सकाळपासून फोन यायला लागले आम्ही दोनशे-तीनशे नागरीकांना तसे सांगीतले की डॅममधुन पाणी आले नाही म्हणून पाण्याचा सप्लाय विष्कळीत झालेला आहे. नंतर बातमी आली की नदीवर ठेकेदारांनी पुल बांधलेला होता. पहील्या दिवशी अधिका-यांनी हे का सांगीतले नाही. तीस-या दिवशी सिटी इंजिनीअरनी मिटींग घेतली त्यानंतर सांगीतले आपण डॅम पर्यंत जाऊन बघू. मी त्याच्याबद्दल सिटी इंजिनीअरनां धन्यवाद देणार पण हे पहील्याच दिवशी का केलेले नाही. कोणा अधिका-याची जबाबदारी आहे त्यांचे नाव डिक्लेअर करावे. तुम्ही सांगीतल पाटबंधारे विभागाला ॲक्शन घ्यायला सांगीतलं. आजचा पेपर वाचा त्यामध्ये हेडलाईन आहे पाटबंधारे विभागाने सुध्दा ॲक्शन घेतलेली नाही ही कंपनी नदीत पुल बांधते ती कंपनी कोण आहे. त्यांनी आपल्याकडे आणि पाटबंधारे विभागाकडून परवानगी घेतली नाही अशी कंपनी कोण आहे. त्या कंपनीच नाव सांगा आणि

यामध्ये कोण अधिकारी दोषी आहेत त्यांचे सुध्दा नाव सांगावे. पाणी प्रॉपर सप्लाय झालेला आहे परंतु तो आपल्यापर्यंत पोहचलेला नाही ही ॲक्शन पहील्याच दिवशी घेतली असतीतर असे झाले नसते. पाणीपुरवठयामध्ये सिक्यूरीटी परसन कमी आहेत, किती सिक्यूरीटी आहेत सांगावे. दोन सिक्युरीटी असून पाठीमागे, साईडला सिक्युरीटी नाहीत. प्राधिकरणामध्ये जास्त पाणी देतो म्हणुन सभागृहामध्ये अनेकवेळा बोंबाबोंब झाली. आम्हांला नॉर्म्सप्रमाणे ३० एमएलडी पाणी आहे. आज किती पाणी मिळत हे त्यांना विचारा. बाकी सर्वाना १५ टक्के कट केल आम्हांला ३० टक्के कट केलेल आहे. असं का, ज्यावेळेस नॉर्म्समध्ये ३० एमएलडी पाणी आहे तर तुम्ही २७ एमएलडी दया, २६ एमएलडी दया. आता आम्हांला मिळतय २१.५ म्हणजे जवळ जवळ ८ एमएलडी कमी केलेल आहे. काही सभासद बोलतात प्राधिकरणामध्ये पाणी जास्त आहे म्हणून ८० लाख लीटर पाणी कमी करणे चुकीच आहे. मी अनेकवेळा लडकत साहेबांना सांगीतले, आमच्यावर अन्याय झालेला आहे, ते मानत नाहीत. आमच्याकडे पाणी कमीत कमी २ एमएलडी तरी वाढवावे. बाकीच्याकडे १५ टक्के व आमच्याकडे ३० ते ३५ टक्के कट करता.

**मा.महेशदादा लांडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच सन्मा. आरुण बो-हाडे यांनी काही प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित केलेले आहेत त्यात विशेषत: दोन प्रभागा संदर्भात जास्त माहिती आपल्या पटलावर ठेवण्यात आलेली आहे. आयुक्त साहेब आपण दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत ३३ हजार सदनिका त्या ऐरीयामध्ये आता आपण बांधतो. दुसरी माहिती अनधिकृत संदर्भात दिलेली आहे. जवळ जवळ २० हजार बांधकाम अधिकृत नोंद असलेले आहेत. च-होलीला ५ हजार, मोशी मधले १३ हजार जवळ जवळ २० हजार बांधकाम आहेत आपल्याला पाण्याची कमतरता सगळीकडेच आहे. आमचा भाग शेवटचा असल्यामुळे तीकडे जास्त कमतरता पाण्याची आहे. आमच्या भागातील नगरसेवक आणि आम्ही सुध्दा प्रत्येक वॉर्डातील प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक भागात फक्त पाण्याच्याच समस्या वरती आम्हांला दिवस घालवावा लागतो. आता आपण असे सांगीतले की आपल्या पाण्याचा बंधारा आडवला, काकांच म्हणणं आहे त्याच्यावर कारवाई झाली पाहीजे, असे आमचे सगळयाचेच मत आहे. आपण जर कारवाई केली नाहीतर परत हा प्रश्न उदया आपल्या समोर येईल. समाविष्ट गावचा झपाटयाने विकास होतो, सदनिका तयार होतात त्यांना रितसर आपण परवानगी देतो असे असताना आपल्या महापालिकेची प्रामुख्याने जबाबदारी आहे की पहीले जे कनेक्शन आहेत ते सर्व कनेक्शन सांभाळून नव्याने सदनीका तयार होतात, ज्यांनी त्या बुक केलेल्या आहेत ते लोक राहण्यासाठी येतात. तो या उद्देशाने रहायला येतो की मी जे घर घेतलेल आहे ते अधिकृत घर आहे. महापालिकेच्या नियमामध्ये बसलेले घर आहे, महापालिकेनी सर्व एनओसी दिलेल्या आहेत या विश्वासावर लोक घर घेतात व आपण कुठलीही सुविधा उपलब्ध करुन देत नाहीत. चिखलीला रिव्हर रेसिडेन्सीमध्ये ३५०० फ्लॅट आहेत

त्याठिकाणी २८०० फ्लॅट तयार आहेत आणि १४०० लोक राहण्यासाठी आलेले आहेत त्यांना आपण पाणी देवू शकत नाहीत. त्या भागामध्ये प्रत्येक सोसायटी मग ती मोशीची असेल, च-होलीची असेल, डुडूळगावची असेल या भागामध्ये मोठयाप्रमाणात परवानग्या आपण दिलेल्या आहेत. मी बरशेट्टी, कांबळे साहेब यांना त्या नागरीकांच्या तक्रारी ब-याचवेळा पोहचविलेल्या आहेत. आपण त्यांना पाणी देवू शकत नाहीत. एका सोसायटीला रोजच ५ हजार रुपयाच पाणी विकत घ्यावे लागते. त्यांच्याकडून आपण टॅक्स घेतो, या शहराच नागरीकत्व त्यांना मिळालेल आहे ते या शहरात राहतात त्यांना मुलभूत गरजा पुरविण आपल काम आहे. भूसंपादना संदर्भात प्रश्न विचारलेले आहेत. ज्यावेळेस आपण फक्त या भागातील सदनिकांचा व बिल्डर्सचा विचार करतो त्याबरोबर त्या भागामध्ये त्या सदनिकाधारकांस लागणा-या मुलभूत गरजाचा विचार केला पाहीजे. जुना डीपी होता त्यावेळेस १९८६ साली महापालिकेस सुरवात झालेली होती. त्यानंतर पहीला डीपी या महापालिकेचा झाला त्या डीपीचे आजपर्यंत आरक्षण आपल्या ताब्यात नाहीत. त्याचा परिणाम काय झाला, त्या आरक्षणावर अनधिकृत बांधकाम झाली. ती चुक बांधकाम करणा-या लोकांची नाही ती चुक आपली आहे, आपली भूसंपादनाची प्रक्रिया ही इतकी थंड आहे की आपल्याला प्रत्येक वेळेस थांबाव लागत. १४-१४ वर्षे एखादया भूसंपादनासाठी थांबतो. यासाठी टाईमबॉण्डमध्ये करुन घेतला पाहीजे. आपण जर भूसंपादनाला पैसे भरले तर आपल्या अधिका-याना कमीत कमी वेळा त्या भूसंपादनाकडुन, त्या अधिका-याकडून आपल्याला दोन ते तीन महीन्यात पझेशन हातात आले पाहीजे इतकी त्वरीत कारवाई झाली पाहीजे. भूसंपादन करणार या उद्देशाने त्यांना आपण पैसे भरतो त्यावेळेला त्या शेतक-यांकडे ठरावीक बिल्डर्स लोक जातात, तुझा प्लॉट अवॉर्ड होणार आहे, जिल्हाधिकारी ऍक्वीझेशन करणार आहेत, तुला फक्त मोबदला मिळणार आहे, असं सांगुन त्याला घाबरुन टाकतात आणि त्याच्याकडून टिडीआर करतात मग आपण इकडे जे पैसे भरलेले आहेत जिल्हाधिकारी यांना भूसंपादनासाठी त्याठिकाणी जावुन हे सांगतात की भूसंपादन थोड लांबवा आम्ही त्यांच्याकडून टिडीआर करुन घेतो. या सगळया प्रक्रियेमुळे आपला वेळ लांबत असल्यामुळे विकास खोळंबून राहीलेला आहे. आपण नवीन गावामध्ये जी आरक्षण आहेत शाळा, दवाखाना, रस्ते, गार्डन, प्लेग्राऊंड त्यावर लक्ष केंद्रीत करावे. जे आरक्षण आपल्या ताब्यात आले ज्याचा टिडीआर झाला, ज्याचा मोबदलापण शेतक-यांनी घेतला ती विकसीत करावीत. जी राहीलेली आहेत त्यांना नोटीस पाठवा. जर आपण ही कारवाई केली नाहीतर याठिकाणी परत अनधिकृत बांधकाम होतील, परत आम्हांला सगळया नगरसेवकांना त्रास होईल म्हणून आपण प्रामुख्याने या संदर्भात विचार करावा. आरक्षणाच्या संदर्भात आपण लवकरात लवकर भूसंपादन करणे आवश्यक आहे. जुन्या विकास आराखडयाचा खोळंबा झाला त्यामुळे आज आपल्याला काही प्रश्नाला सामोरे जावे लागले त्या संदर्भातील भूमिका या नवीन गावामध्ये होवू नये याकरिता आपण प्रामुख्याने लक्ष दयाव. मुलभूत गरजा आहेत त्या देणेत

याव्यात. नवीन अर्थसंकल्पामध्ये आपण उल्लेख केलेला आहे त्या उल्लेखाप्रमाणे तेवढया रक्कमेचे आपल्याकडे आता सध्या बजेट आहे त्या रक्कमेमध्ये आपण त्या जागेवर वॉल कंपौंड करुन त्या जागेचा जेवढा विकास करता येईल तेवढा करण्याचा प्रयत्न आपण करावा अशी विनंती करतो आणि थांबतो.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शनीवार पासून पाण्याचा प्रॉब्लेम आलेला आहे. संपुर्ण शहराला त्यांनी वेठीस धरले. तो जो बंधारा टाकला गेला तो शनिवारी टाकला गेला. शनिवारी महापालिका चालू होती सुट्टीचा दिवस नव्हता. सर्व अधिकारी कामावर असताना शनिवारी संध्याकाळी ज्या भागामध्ये पाणीपुरवठा होतो त्या दिवशी कदाचित झालाही असेल परंतु जर शनिवारी संध्याकाळ पर्यंत टाक्या भरल्यातर रविवारी लोकांना पाणी देतो. मग शनिवारीच त्यांच लक्ष का गेल नाही. आपण ज्या स्काडा सिस्टिम्ससाठी कोटीच्या कोटी उड्डाणे घेतो त्या स्काडा सिस्टिम्समध्ये ही नोंद झाली नाही काय? त्यांच्या लक्षात आले नाही का, काय उपयोग आहे त्या सिस्टीमचा. लडकत साहेबांनी हे सांगीतले असते आपल्या बंधा-यामध्ये पाणी नाही किंवा सेक्टर २३ ला पाणी आलेल नाही. त्याच वेळेस आपण पाहीला पाहीजे होते. आपण किती हातबल आहोत, किती मजबुर आहोत. शासनाचा हा विभाग किती मुजोर झालेला आहे. पाणी मिळणे हा आपला मुलभूत हाक्क आहे. त्यावर यांनी गदा आणावी. शासनाच जे काही काम चालू आहे मग ते पुलाचे काम किंवा आणखीन काही काम चालू असेल. राज्यशासनाचे लक्ष नाही का ते नसेलतर त्यांचा निषेध करायला पाहीजे. २० लाख लोकांच्या तोंडचे पाणी पळवले आहे. आम्ही प्रशासनावर एवढे ताशेरे ओढतोय, राज्यशासनाचे याकडे लक्ष नव्हते काय. मी मा.आमदार साहेबांना सांगेल, दादा आपला २० लाख लोकांचा प्रश्न आहे, दोन दिवस पाण्यावाचून तळमळत होते. सगळे काही झोपडपट्टीमध्ये राहत नाहीत. सगळे काही चाळीत राहत नाहीत. सगळे काही मैदाना शेजारी राहत नाहीत. संपुर्ण व्यवहार ठप्प झाले, अचानक काही न सांगता पाणी आले नाही म्हणून. आणि राज्यशासनाने एवढी सुध्दा त्याची दखल घेवू नये एवढया मोठया राज्यामध्ये दुष्काळ पडलेला आहे त्याची दखल ते घेत नाहीत. शहरात दोन दिवस पाणी नाहीतर काय झाले असे म्हणत असतील, कदाचित. ठिक आहे त्याची दखल लोक घेतील. परंतु आपल पण प्रशासन ढिल्ल कसं आहे, आपला पाणीपुरवठा विभाग या विषयाकडे कसा दुर्लक्ष करते हे आपल्या लक्षात यायला पाहीजे. शनिवारीच ते बघायला पाहीजे होत नाही पाहील, रविवारीतरी जायला पाहीजे होत की, शनिवारी पाणी आल नाही. का नाही आल म्हणून रविवारीपण गेले नाहीत यांच्यावर कारवाई केली पाहीजे. जे जबाबदार आहेत त्या सर्व अधिका-यावर कारवाई आपण केली पाहीजे आणि राज्यशासनाकडे मा.महापौर साहेब, आपण हे निषेधाचे पत्र पाठवा की तीन दिवस आमच्या शहराला वेठीस धरलेले आहे. निषेध करायला पाहीजे कारण त्यांच्या विभागाने हे केलेले आहे. कोणीही येतं आणि टिकली मारुन जात काय चालल आहे हे. कांबळे साहेबांनी

व्यवस्थीत स्पष्टीकरण दिलेले नाही. बंधारा कोणी बांधला, कोणाच्या परवानगीने बांधला, का बांधला, आपल्याकडून त्यांना पत्र गेले का. भाडेकरुचे पाणी मालकांनी जरी तोडलतर तो फौजदारी दाखल करतो. आपल्या एवढया २० लाख लोकांच त्यांनी पाणी बंद केलं आणि तुम्ही काहीच करु शकत नाहीत. काय करतो आपला कायदा विभाग, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केलीच पाहीजे. आपला अधिकार असो किंवा नसो उदया काहीही करतील. उदया आपले चारही रस्ते बंद करतील. म्हणतील पिंपरी चिंचवडकरांनी शहराच्या बाहेर जायचे नाही कोणी आणि तुम्ही म्हणाल तो रस्ता आपल्या हद्दीत नाही. याबाबतीत योग्य ती कारवाई करायला पाहीजे. धरणामध्ये पाणी कमी आहे, आपण कपात करणार असे म्हणतो. तर सगळयांना विचारा, फक्त गटप्रमुख बोलवता चर्चा करता त्यामुळे एखादा विषय राहून जातो आणि आमच्या विभागावर अन्याय होतो. त्यामुळे तुम्हांला जे काही पाणी कपात करायच आहे ते सभागृहाला विश्वासात घ्या. दोन-चार टाळकी आली त्यांनी सगळ सुचवल की झाले असे नाही, सभागृहाला विचारात घ्यायच, विश्वासात घ्यायच आणि मग पाणी कपात करायच हे मी तुम्हांला याठिकाणी सांगते. आमच्याकडे मात्र प्रत्येक बिल्डर्सचे जे बांधकाम चालू आहे ते आपल्याच पाण्यावर चालू आहे, आपलेच कनेक्शन त्यांनी घेतलेले आहे. अजून बिल्डर्सनी त्या रस्त्यावरचे कनेक्शन घेतलेले आहे ते खड्डे सुध्दा बुजवलेले नाहीत तेवढी चौकशी आपण करावी. जलसिंचन विभाग असो किंवा राज्यशासनाचा कोणताही विभाग असो आपल्याकडून जी काही आवश्यक कार्यवाही आहे, कायदेशीर जी बाबी आहे ती आपण केलीच पाहीजे एवढच सांगून थांबते.

**मा.झामाताई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ब-याच जणानी याठिकाणी या विषयावर बोलले आहेत. खुप चर्चा झालेली आहे, पाण्याचा प्रश्न जिव्हाळयाचा प्रश्न आहे. प्रत्येकाच्या वॉर्डात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. कारण मी प्रथम आपल्या प्रशासनाला जाग आणुन दिलेली आहे. त्यांच्या लक्षात आलेले नाही. प्रशासनाला जाग केल ते सचिन बोडके यांनी त्यामुळे मी त्यांचे प्रथम अभिनंदन करते. त्यांनी प्रशासनाच्या लक्षात आणुन दिल नसत, आतापर्यंत आपल्याला माहिती पडल नसतं अजून पाण्याचा प्रश्न बिकट झाला असता. एवढी मोठी पवना नदी त्या नदीत कोण बंधारा टाकत असेलतर आणि ते आपल्याला माहिती नसेलतर आपल्या सर्वांच त्याठिकाणी एवढ दुर्लक्ष कसं आपल्याला त्या परिसरामध्ये पाण्याच्या बाबतीत लोकांच्या समोर जायचय. लोकांच्या अडचणी अवेळेमध्ये असं जर होत असेलतर निषेध केला पाहीजे. आज हा प्रश्न बिकट झालेला आहे. लातूर भागामध्ये रेल्वेनी पाणी देतात आपण नशीबवान आहोत. पवनेचे पाणी आपल्याला आहे. त्याठिकाणी आडकाठी आणणारे अशा व्यक्ति कोणी असतीलतर त्याला खरोखरच शासन झाले पाहीजे. कांबळे साहेबांनी सांगीतले १५ एप्रिल पर्यंत पाणी सुरळीत होते. साहेब आपल्या पर्यंत माहिती पोहचलेली नाही असं मला वाटतं. माझ्याच वॉर्डात जवळ जवळ एक वर्षे झाले टँकरने पाणी

आहे आणि आता पाणी कपात झाल्यामुळे तो टँकर बंद केलेला आहे त्याठिकाणी पाणी पोहचू शकत नाही परंतु टँकर सुध्दा बंद केलेला आहे. कांबळे साहेबांना, तांबे साहेबांना याची माहिती दिली. आता सुध्दा बघावे काय परिस्थिती आहे. लोक येतात बघतात परंतु काहीही होवु शकत नाही. त्याठिकाणी प्रेशरने सुध्दा पाणी पोहचत नाही. त्या लोकांनी पाणीपट्टी का भरावी. नाही भरलीतर त्याच्या मागे तगादा लावतो. काही ठिकाणी नळाला नुसती हवा येते व त्यांना त्याची पाणीपट्टी भरावी लागते नाहीतर कारवाई करतात. पडवळ नगरचा उंचावरचा भाग आहे, दगडूपाटील नगरला पाणी आहे, पडवळ नगरमध्ये काही ठिकाणी पाणी नाही, घोडेनगरला पाणी नाही. आपले कर्मचारी खोदतात काही सापडत नाही त्यामुळे पाणी दयायचे नाही का. आपण टँकर बंद का केलेले आहे त्यांना टँकरनेतरी पाणी दयावे. पाणी कपात झालेली आहे हे सगळयांना माहिती आहे. पाण्याचा प्रश्न बिकट आहे परंतु नागरीकांनी सुध्दा रोज पाण्यासाठी कुठे जायचे. काही काही लोक म्हणतात चार चार दिवस आम्हांला आंघोळया नाहीत. उंचावरच्या भागामध्ये लोकांनी काय करायचे. १ मे पासून एक दिवसाआड पाणी येणार आहे. ते लोक आजुबाजूला पाणी भरत असतीलतर दुस-याच्या नळावरुन तरी ते पाणी भरु देतील का. अशा लोकांनी कुठे जायचे. आता सुध्दा लोक म्हणतात महापालिका समोर मोर्चा घेवून येणार आहेत. आम्ही त्या लोकांना समजावुन सांगतो की पाण्याचा प्रश्न बिकट झालेला आहे. आपली पिंपरी चिंचवड महापालिका त्या मानाने चांगली आहे आपल्याला थोडफार पिण्यासाठीतरी पाणी मिळतय बाकीच्या ठिकाणीतर तेवढ सुध्दा नाही. परंतु ज्या लोकांना आम्ही समजावुन सांगायच आणि त्याच लोकांवर सतत अन्याय झालेला आहे. आता आपण टँकर बंद केलेले आहे. त्याठिकाणी काय करायचे. आपण एक दिवसाआड पाणी करणार परंतु प्रेशरने दया. अर्धा तास दया परंतु प्रेशरने पाणी दया. ज्या ज्या भागामध्ये पाणी मिळत नाही त्या भागात आम्ही लाईट सुध्दा बंद करायला सांगतो. लोक मोटार लावतात, यांनी मोटार लावली की दुस-याना पाणी मिळत नाही. ज्यांच्याकडे आहे ते मोटार लावतात ज्यांच्याकडे मोटार नाही त्यांनी काय करायचं. मोटार लावू नका नाहीतर तुमच्या मोटारी जप्त होणार आहेत म्हणुन आम्ही त्या लोकांना सांगतो. उंचावरच्या भागातील लोकांना पाणी मिळाले पाहीजे एवढी अपेक्षा करते आणि थांबते.

**मा.कैलासभाऊ थोपटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता याठिकाणी पाण्या विषयी बरीचशी चर्चा झालेली आहे. आम्ही स्थायी समितीमध्ये चर्चा केलेली आहे. आयुक्त साहेब, जर आपल्याला पाणीपुरवठा पवना धरणातून होतो. ज्या दिवशी पाणी आपल्याला कमी येईल त्यादिवशी आपल्याला माहिती व्हायला पाहीजे होती. आपण पाटबंधारे खात्याकडे ही चौकशी करायला पाहीजे होती. दोन-तीन दिवस पाणी कमी येते त्याची दक्षता आपण घेत नसूतर आपले प्रशासनाचा निष्काळजीपणा समजायला पाहीजे. आपले अधिकारी त्याठिकाणी बसतात, चर्चा करतात आणि तसा काहीतरी निष्कर्ष लागत नसेलतर आणि गंव्हूजे

गावाचा एक मनुष्य जर आपल्याला सांगत असेलतर आमच्या गावामधील नदीची पातळी कमीत कमी एक दोन मीटर वाढलेली आहे व त्यानंतर आपल्याला माहिती होते. आपले प्रशासन काय करते, डोळे झाकून आहे का. ज्या कंपनीने त्याठिकाणी बंधारा टाकला आणि पाणी आडविले त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहीजे. आपले अधिकारी असतीलतर त्यांनी लक्ष दिले नसेलतर त्यांच्यावर सुध्दा कारवाई व्हायला पाहीजे. ज्या माणसाने आपल्याला माहिती दिलेली आहे त्याचे अभिनंदन केले पाहीजे. नागरीक किती जागरुक आहेत हे आपल्यालाही समजले पाहीजे आणि जनतेलाही समजले पाहीजे. असे घडले नाही पाहीजे. संपुर्ण महाराष्ट्रात दुष्काळाचे साम्राज्य आहे आणि त्यातल्या त्यात आपल्या पिंपरी चिंचवड शहराला चांगल्या पध्दतीने पाणीपुरवठा आहे. आज आपण मराठवाडयामध्ये फिरलोतर, आजही आम्ही मराठवाडयामध्ये जातो, पाहतो, लग्नानिमीत्त आम्हांला त्याठिकाणी जावं लागतं. त्याठिकाणी नागरीकांचे भयानक हाल आहेत. आपण नशीबवान आहोत. खुप चांगल्या पध्दतीने पवना धरणातून पाणी मिळते परंतु असे घडले नाही पाहीजे रावेत याठिकाणी ब्रीज बांधला त्याठिकाणी पाणी आडविले यानंतर अजुनही दुसरीकडे कुठे काम निघेल तेही लोक असं करतील. यापुढे असे होवु नये, जलसंपदा विभागाची जबाबदारी आहे त्यांनी आपल्याला रावेत पर्यंत पाणी पोहचवून पाण्याची व्यवस्था केली पाहीजे. ही जशी त्यांची जबाबदारी आहे त्या पध्दतीने आपल्या महापालिकेचीही जबाबदारी आहे. आपणही त्याच्यावरती नियंत्रण ठेवले पाहीजे. आपण आपले माणस ठेवून त्याची रोजच्या रोज पाहणी केली पाहीजे. आता अरुण बो-हाडे साहेब आणि महेश दादानी भूसंपादन विषयावर चर्चा केलेली आहे. मला सुध्दा चर्चा करायची आहे. माझ्या प्रभागामध्ये नऊ वर्षापासून राहाटणी गावचा रस्तासंदर्भात अनेकवेळा चर्चा केलेली आहे. आमचा १८ मी. रस्ता भूसंपादन करावा तो रस्ता कमीत कमी ९० टक्के ताब्यात आलेला आहे. मी अनेकवेळा स्थायी समितीला, जीबीला चर्चा केलेली आहे, आपल्याला का भूसंपादन करता येत नाही, ऑवॉर्ड का करत नाहीत. आज त्या रस्त्यावर नखाते वस्ती ते फडके लॉज पर्यंत तो रस्ता इतका कन्झेस्टेट झालेला आहे. जो माणुस तो रस्ता आडवतो त्या माणसाशी अनेकवेळा चर्चा केलेली आहे. त्याच्यावर काही निष्कर्ष निघत नाही. आतापर्यंत त्यांनी चार आयुक्तांना वेडे बनविले म्हणायचं. तुम्ही जाऊन चर्चा केलेली आहे, बंड साहेबांनी, परदेशी साहेबांनी चर्चा केली, शर्मा साहेबांनी चर्चा केली त्याच्यावर काही निष्कर्ष निघत नाही. अशा माणसाचे आपण किती दिवस ऐकायचे. आज त्याठिकाणी संपुर्ण बकालपणा झालेला आहे. त्याठिकाणी त्या चौकामध्ये सगळे भाजीवाले आहेत, त्यांनी स्वत:चे ऑफीस टाकलेले आहे. ते ऑफीस सुध्दा पुर्ण त्या चौकामध्ये आलेले आहे नागरीकांनी कसे जायचे त्याठिकाणी तो काय करतो चार दिवस रस्त्याचे काम चालू करु देतो, त्याच काहीतरी साध्य असेल तेवढ काम करु देतो, ते करुन झाल्यानंतर परत ते काम तो थांबवितो. आता सध्या आपण त्याठिकाणी आपल्या रस्त्यास स्टोन लावलेले आहे. त्याच्यानंतर आपण फुटपाथ तयार करणार आहोत

परत काम थांबविले गेले. त्या फुटपाथच्या जागेवर संपुर्ण टपऱ्या मांडलेल्या आहेत. कलींगडचे स्टॉल लावलेले आहेत. आख्ख्या फुटपाथवरती कमीत कमी ३०० ते ४०० फुटापर्यंत सर्व चायनीजच्या गाडया, टप-या लावल्यामुळे बकालपणा त्याठिकाणी झालेला आहे अशा माणसावर आपण का कारवाई करत नाही, कारवाई केली पाहीजे. नऊ वर्षा पासून त्या रस्त्याचे भूसंपादन का होत नाही. शासनाने कायदयात बदल केलेला आहे म्हणून ते काम करायचे नाही का. आज जर बघीतले तर आपल्या शहरात विकास करत असताना नगररचनाच्या माध्यमातून भूसंपादन कारवाई होत नाही. नगररचना किंवा प्रशासन त्या ठिकाणी फक्त टिडीआर, एफएसआयच्या माध्यमातून आले की विकास करायचा का. काही लोक आडमुठेपणाचे धोरण धरतात की काहीही झालेतरी यांच्या काळात होवुच देणार नाही म्हणून आपण करायचे नाही का अनेकवेळा या विषयावर सभागृहामध्ये बोललेलो आहे पण निष्कर्ष काहीच होत नाही. तरी आपण भूसंपादन कधी करणार आणि किती दिवसात करणार, तो रस्ता किती दिवसात होईल हे सांगावे. महापौरांनी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांच अभिनंदन करुन याठिकाणी थांबतो.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मागच्या दोन दिवसापुर्वी पाणीपुरवठा विष्कळीत झाला. खाजगी ठेकेदाराने पुल बांधण्यासाठी त्याठिकाणी बंधारा आडविला. याचा अर्थ पुल बांधण्यासाठी पीडब्ल्यू खात्याने परवानगी दिलेली असेल. पाणी आडवण्यासाठी परवानगी नसेल. आपल्या अधिका-यांनी पहील्या दिवशीच खात्री करायला पाहीजे होती की रावेत बांधा-याला पाणी कमी का येते. दोन दिवसाने बोडके नावाच्या व्यक्तीने सांगीतल्यानंतर पळापळ करतात. मी आपल्याला आठवण करुन देतो की २००५ साली संपुर्ण शहर पावसाळयामध्ये जलमय झालेल होतं त्याच कारण पीडब्ल्यूडीने १० हजार क्यूसेक्स पाणी सोडण्याऐवजी धरणातून २० हजार क्युसेक्सचा विसर्ग केला आहे. नदीची वहनक्षमता किती आहे याचा विचार केला नाही ते पाणी सोडले आणि १ कि.मी. पर्यंत शहर जलमय झालं. निळी पुररेषा व लाल पुररेषा यांच कारण हे २००५ पासुन पुढ आल आहे. हा पाणीपुरवठा बंद पाईपलाईन मधुन पवना धरणातून से.२३ पर्यंत थेट पाणी आल पाहीजे. त्याचे कारण म्हणजे शासकीय पातळीवर काय चर्चा झाली याची माहीती आम्हांला अजीबात नसते तो प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा एवढेच बोलतो, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आरुण बो-हाडे यांनी प्रश्न दिलेले आहेत त्याचे उत्तर दिलेले आहेत त्या उत्तरामध्ये पाणीपुरवठया बद्दल प्रश्न निघालेला आहे. जस आता आमदार म्हणाले प्लॅन पास झाल्यानंतर कायदेशीर पाणी देणे गरजेचे आहे. आपल्या शहरातील पाण्याची कपॅसिटी किती आहे. इतक्या लोकांना आपण पाणी देवू शकतो का. बिल्डींग परमीशन तेवढया लोकांना दयायचे का हा सुध्दा विचार येथून पुढे केला गेला पाहीजे. किंवा तुम्ही त्यांच्याकडून लिहून घ्यावे की आम्ही तुम्हांला काय देवू शकतो

काय देवू शकत नाही. कारण एवढया मोठमोठया सोसायटया झाल्यानंतर आपण नेहमी असं सांगत असतो की त्या सोसायटयामध्ये रेनवॉटर हर्वेस्टींग झाले पाहीजे. त्याच्यावर सोलर सिस्टीम बसली पाहीजे. कच-याचे सुध्दा त्यांनी त्यांच विघटन केले गेले पाहीजे. त्यांना टॅक्समध्ये सुट दया. एवढी मोठी सोसायटी झाल्यानंतर आत मध्ये आपण रस्ता करुन देवू शकत नाही. शहरामध्ये येथून पुढे लोकांची डिमांड मोठया सोसायटयामध्ये राहण्याची आहे. नागरीकांच्या मागणीप्रमाणे बिल्डर्स लोक नियोजन करतात. दोन एक्करमध्ये सोसायटी असली पाहीजे. त्याठिकाणी स्विमींग पुल असतो. आपण इतर ठिकाणचे स्विमींग पुल बंद करतो त्या सोसायटयाच्या स्विमींगपुलला पाणी देणार का. मुळात शहराच मॉडेलच नाही. बजेटवेळेस आम्ही सांगत असतो कुठली लाईन कुठून गेलेली आहे या सगळया गोष्टी डिटेल्स मध्ये आल्या पाहीजेत. कुठून कोणाची लाईन गेलेली आहे हे सगळ तुमच मॉडेल जर तयार असेलतरच तुम्ही काम करु शकता. २००२ ला मोरेवस्ती सारखा भाग किंवा डुडूळगावला आम्ही पोहचलो होतो त्यावेळेला पाण्याचे कनेक्शन कसे देणार. ईथून दहा घर झाली की परत दयायचं, परत ब्रेक तेथून पुढे दयायच लिकेजेस किती वाढणार आणि मग पाणीपुरवठयाला आपण काय म्हणणार की पाणीपुरवठयामध्ये ३० ते ४० टक्के लिकेजेस आहेत. रस्ते आहे माहिती आहेनां मग अंडरग्राऊंड ड्रेनेजलाईन गेली पाहीजे त्याच्या बरोबर पाण्याची लाईन गेली पाहीजे, त्याच्याबरोबर आपल्या विदयुतच्या सगळया लाईन गेल्या पाहीजेत. नवीन गावामध्ये हे तीन चार काम पहील्यांदा झालेच पाहीजेत. त्याचबरोबर दोन डक्ट टाकले गेले पाहीजेत की जेणेकरुन ही खोदाई होते. आम्ही बोलायचे आणि प्रशासनाने हो म्हणुन आजचा दिवस घालवायचा असेलतर तसे सांगा. सगळे कृत्य प्रशासनाने करायचे आणि नगरसेवकांनी ते फेस करायचे हे किती दिवस चालणार आहे आणि का म्हणून नगरसेवकांनी चालून घ्यायच. गुन्हे समोर लावायचे आणि इकडच्या लोकांनी सगळ भोगायचं या गोष्टी थांबल्या गेल्या पाहीजेत. कोणत्या अधिका-यांना तसे जमत नसेलतर त्याला म्हणाव व्हीआरएस घे. कन्सलटन्सी, सल्लागारांची नेमणुक केलेली आहे त्यात दोनच गोष्टी दिलेल्या आहेत की पाणीपुरवठा आणि जलनिस्सारणसाठी १० कोटी दहा वर्षात दिलेले आहेत मला वाटत हे आकडे फेक आहेत. १० कोटी होवू शकत नाही, काम किती आहेत. या कन्सल्टंटला लाईन आता दाखवता येतात का. या कन्सलटंटनी लाईन कुठे कुठे टाकल्या याच त्यांच्याकडे चित्रीकरण आहे का, त्यांनी कुठल्या कुठल्या लाईन टाकल्या. आरुण बो-हाडे यांनी प्रश्न विचारले परंतु हे सगळ त्या कन्सलटंटनी केलेल आहे का. त्यांनी दाखवाव या लाईन कुठे टाकल्या, कधी टाकल्या त्याचे त्यांनी मॉडेल बनविले का. ज्या कन्सलटंटला हे सगळ माहित असेल त्यांना तुम्ही बोलऊन घ्या नाहीतर त्या कन्सलटंटला ब्लॅकलीस्ट करा. आपले जे.ई. डेप्युटी, कार्यकारी यांना काही कामच उरले नाहीत. आता कन्सलटंट आल्यामुळे यांनी काही कामच करायचे नाहीत. कन्सलटंट जसं डिझाईनींग देईल तसं ते सुचवणार आणि सांगायला रिकामे कोणतही काम,

आम्ही काय म्हणणार, सुरु का झाल नाहीतर ते म्हणणार कन्सलटंटने अजून दिलं नाही असे सांगतात. अजून त्याच डिझाईन मंजूर नाही. त्याला कोणत काय लावायच ते फायनल नाही. त्यामुळ आम्ही अजून ते काम सुरु केलेल नाही. दहा ते वीस करोडो रुपये आज कन्सलटंटला चाललेले आहेत. आज एक आकडा तर उदया दुसरा आकडा येईल. दहा कोटीचा जो आकडा आहे तो चुकीचा आहे. पाणी आपण देवू शकत नसूतर तसे तुम्ही बिल्डर लोकांना कळवा. बिल्डर लोक पिण्याच्या पाण्याची लाईन बांधकामाला वापरत असतीलतर त्याचा सर्व्हे झाला पाहीजे. नागरीकांना जाहीर आवाहन करा. आता एका सुशिक्षीत मुलांनी आपल्याला सांगीतलं रावेत साईडला पाण्याचा फुगवटा वाढलेला आहे आणि नागरीकांना आवाहन करावे की जो बिल्डर्स पिण्याच पाणी बांधकामासाठी वापरत असेल हे जो निदर्शनास आणेल त्याला बक्षीस महापालिकेच्या वतीने जाहीर करा. म्हणजे आपल्याला समजेल, पिण्याला पाणी आपण कपात करतो आहोत तर जो बिल्डर्स पिण्याच पाणी वापरत असेलतर त्याला किती दंड करायचा, किती पटीने त्या बिल्डर्सला दंड करायचा हे बघुन घ्या. परवाच्या प्रश्नामध्ये तीन दिवस पाणी बंद होते, एक दिवसाआड ठरलेले आहे, अचानक नागरीकांना न सांगता आपण एक-एक दिवसआड पाणी सुरु केले की काय असे नागरीक संभ्रम अवस्थेमध्ये होते. मागच्या वेळेस सभागृहाने अशी परमीशन दिलेली आहे रावेत मधील पाणीपुरवठा असेल त्याच्या संबंधीत जे डिपार्टमेंट असेल श्री.लडकत साहेब, श्री. तांबे साहेब असतील सर्व पाणीपुरवठयाची मंडळी आहे आम्ही सभागृहाने परवानगी दिलेली आहे की पाणीपुरवठा नागरीकांना चांगला होण्यासाठी जिथून पाणी आपल्याकडे येते तिथपासून ते आपल्या पर्यंत नागरीकांपर्यंत पोहचत म्हणजे रावेत पासून आपल्या नागरीकांपर्यंत पोहचत तिथं ज्यावेळेला पाण्याची साठवणूक होते त्याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे सुध्दा बसवावे अशी आम्ही मंजूरी दिलेली आहे. आज जर सीसीटीव्ही कॅमेरे आपले तिथे असतेतर आपल्याला कळाल नसतं का. प्रत्येक धरणावर सिक्युरीटी आहे, मग आपल्याला जिथून पाणी येतं तिथ सिक्युरीटी लावली नाही का. जो माणुस एवढे बिनधास्त काम करतो त्याच्यावर गुन्हा का दाखल झाला नाही, फौजदारी गुन्हा का दाखल झालेला नाही. जो माणुस २० लाख लोकांचे पाणी बंद करु शकतो तो २० लाख लोकांच्या जीवनाशी खेळू पण शकतो. मग त्याच्यावर फौजदारी गुन्हा का दाखल झालेला नाही. कुणाची वाट बघायची होती आपण. आपल्या प्रिमायसेसमध्ये येवून आपले येथे पाईपलाईन टाकून त्याच्यावर व्यवस्थीत रस्ता बनवुन तो जातो आपल पाणी पुर्ण आङ्तं. ज्यावेळेला नागरीक ओरडतात त्यावेळेला पाणी बरोबर आहे असे सांगता. सगळया नगरसेवकांनी फोन केलेले आहेत जे.ई. ला आणि प्रत्येकाने हेच उत्तर दिलेले आहे. नवीन जे.ई. भरलेले आहेत त्यांना बोलायचे सुध्दा समजत नाही त्यांना एक ट्रेनिंग दयावी. पिंपरी चिंचवड शहरामध्ये नागरीकांशी कसे वागले पाहीजे. कुठल्याही नागरीकांनी फोन केलातर नाही नाही ते बरोबर आहे, आम्ही मीटर चेक करायला येतो. तुमच्या टाकीत किती पाणी पडत ते चेक करतो. आता

पाणी नाहीतर तु काय त्याचा सर्व्हे करणार आहे. नागरीकांनी निवडून दिलेल्या सदस्यांना किती त्रास होत असेल त्याचा विचार केला गेला पाहीजे. ज्यावेळेला आपल्याला समजले खरच काहीतरी प्रॉब्लेम आहे, कोणीतरी सांगीतल्यानंतर आपण खडबडून जागे व्हायचे. हे कुठल्या गणीतात बसतं हे आम्हांला सांगाव. तुम्ही जर काहीच करणार नसालतर थोपटे इतके तळतळीने म्हणत होते, ते खरचं आहे. एखादा मोठा माणुस त्याठिकाणी बसला असतातर नक्की त्याचा रस्ता, अवॉर्ड सगळ झाल असतं. तुम्ही दहा वर्षाच काय सांगता मोहननगरमधले ते काळे काका म्हणून येतात २५ वर्षे झाले. ते म्हणाले माझ वय ताई आज किती आहे ते बघा आख्ख तारुण्य माझ त्या रस्त्यासाठी मी घालवलं तरी आमच प्रशासन काहीही करणार नाही. तुम्ही दहा वर्ष सभागृहात आहात पण मी रोज आपली हजेरी लावतो असे म्हणाले पण आपल प्रशासन त्यांना काही दाद देणार नाही. टप-यातर त्यांना प्रियच आहेत. तुम्हीजर ठरवलतर ते तुमच्याकडे लगेच बघतील ही तुमची टपरी आहे. पण इतर ठिकाणच्या बाजूच्या टप-या ते काही बघणार नाहीत. कारण तो बहुतेक यांच्या आवडीचा विषय आहे. हॉकर्स झोन बनवायचा. आम्ही आमच्या पंचवीस-पंचवीस वर्षाच्या टप-या वॉर्डातून काढायच्या आणि बाहेरुन आणलेल्या हातगाडया मात्र समोर लोक लावून इलेक्ट्रीकच्या पोलला कुलूप लावून जातात ते आम्ही मस्तपैकी बघायचं. याच्यावर काय कारवाई होणार हे बघावे अन्यत: ही सभा याठिकाणी थांबलीतरी चालेल. ज्यांचे टेंडर आहे त्यांच्या घराचे पाणी बंद झाले असतं, मुंबई मधल्या एवढया मोठया इमारतीचं त्यांच काय झालं असत किती त्यांना पाणी लागतं. मुंबईमध्ये ज्यांचे काम चालू आहे त्यांची किती मोठी इमारत आहे त्यांच्या इमारतीला जर एक दिवस पाणीपुरवठा झाला नाहीतर त्यांचे सगळे शोक आंबट होतील. त्यांचे लोक खाली काय काम करतात हे त्यांनी बघायला नको. ज्यावेळेला मालक म्हणून आपण जर एखादी कंपनी चालवीत असूतर त्यावेळेला त्यांच्या खालचे लोक काय करतात हे बघायला पाहीजे. त्यांचे कोणी खाली सुपरवायझर असतील ते तुम्हांला विचारण्यासाठी कोणी आले का, नाही आले. तुम्ही त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा. अन्यत: त्यांचे नाव घेवून आम्हांला निषेध करावा लागेल. ही जनरल बॉडी येथेच थांबेल. तुम्ही कामच करणार नसालतर कशाला यायच सभागृहामध्ये तरी आणि महापालिकेमध्ये तरी. २० लाख लोक आम्हांला शिव्या देणार आणि अधिकारी मात्र मनमानेल तसं, पाहीजे तसं, मनाला वाटल तर करायच. कांबळे साहेबांनी काम खुप चांगल केलं परंतु खालची टिमचे काय. आज त्यांची रिटायरमेंट आलेली आहे परंतु जाताना सुध्दा पाणीपुरवठयासारखे डिपार्टमेंट कोण घेत नाहीत त्यांच्याकडे पाणीपुरवठयासारखे डिपार्टमेंट आहे. त्यांनी म्हणाले असते साहेब, नको जाता जाता माझ्यावर काहीतरी होईल परंतु त्यांनी तसे काहीही केलेले नाही. परंतु त्यांची खालची फळी आहे त्यांनी बघावे. आपण रितसर प्रत्येक गोष्टीचा खुलासा करावा तरच पुढे काम करा नाहीतर आम्हांला तुम्ही सांगा, तुम्ही घरी जा, तुम्हीच काम करा आम्ही याठिकाणी येतच नाहीत. कुठलेही काम होणार नसतीलतर आणि

अधिकारी ऐकणार नसतीलतर काम कशाला करायचे. सगळी सिनीअर मंडळी बोलली. अधिकारी काहीच करणार नसतीलतर आम्ही काय करायचे, कशाला यायचं. याच्यावर व्यवस्थीत खुलासा झाला पाहीजे आणि याच्यावर कारवाई प्रेस कॉन्फरन्स घेवून तुम्ही सांगीतल पाहीजे की हे या घटनेसाठी आम्ही या या गोष्टी केलेल्या आहेत आणि  त्याचप्रमाणे आरुण बो-हाडे यांचे जे प्रश्न आहेत त्या प्रश्नाप्रमाणे सल्लागारांनी काय काय काम कशी केलेली आहेत. जेएनएनयुआरएम मधील प्रोजेक्ट आहेत कम्पलेशन मिळत नाही. पर्यावरणाची एनओसी नाही. हे कोर्टात जाते, ते कोर्टात जाते. हे सल्लागारांच्या पेमेंट मधुन वसूल करा, ठेकेदाराला त्यांनी जादा काही केलेल असंल ते त्यांच्या पेमेंटमधुन  दया आणि जेवढे आहेत तेवढया सल्लागारांना ब्लॅकलीस्ट करा आणि हे करणार असालतर तसे सांगा तरच पुढची सभा चालू करतोत अन्यत: आम्ही घरी जाऊ, धन्यवाद.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. श्री.बो-हाडे साहेबांच्या प्रश्नोत्तरामध्ये माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे तथापि त्यांनी बरेचसे मुद्दे उपस्थित केलेले त्याच्यावर मी नंतर येतो. आगोदर पाण्याच्या प्रश्नावरती येतो. पाण्याच्या बाबतीत ही वस्तुस्थिती आहे की शनिवारी संध्याकाळ पासून किंवा रविवारी सकाळपासून विस्कळीत झालेला पाणीपुरवठा मंगळवारी उशिरा नीट करता येवु शकला. याच्यामध्ये संबंधीत कंपनीने विदाऊट परवानगी तिथे जो बंधारा टाकण्याचा प्रयत्न केला त्यामुळे आपल्याला इरिगेशन डिपार्टमेंटने सोडलेले पाणी रावेतच्या बंधा-या पर्यंत न येऊ शकता त्याच्या मागेच नदीच्या दोन्ही पात्रामध्ये त्याची लेव्हल वाढली त्याच ठिकाणी ते साठून राहीलेले आहे. आपले श्री.गलबले, एक्झिक्युटीव्ह इंजिनीअर पाणीपुरवठयाचे बघतात. तसे ते सिन्सेअर ऑफीसर आहेत आणि ते व्यवस्थीत काम करतात याच्या बद्दल माझे दुमत नाही. पण तथापि याबाबतीत मात्र श्री.गलबले, श्री.लडकत यांनी सांगीतले की  एक दिवस पाणी लेव्हल कमी झाली, लेव्हल कमी होण्याचा हा पहीला प्रकार नव्हता याच्या पुर्वीही लेव्हल कमी होत होती इरिगेशन डिपार्टमेंट पाहीजे तेवढे पाणी सोडत नसल्यामुळे एखादयावेळेस लेव्हल कमी जास्त होते असा त्यांचा समज होता. एक दिवस, दिड दिवस, आपण समजू शकतो त्यानंतर ज्यावेळेस कांबळे साहेब स्वत: इरिगेशन डिपार्टमेंटशी बोलले त्यावेळेस त्यांनी अतीरीक्त पाणी सोडण्याची विनंती केली. व त्यांनी सोडलेही आणि तरीही पाणी वाढले नाही तरीही आपल्या लक्षात न येणं ही थोडी अचंबीत करण्यासारखी गोष्ट आहे. एवढे पाणी कोण चोरुन नेणार नाही. ते काही दोन आणि चार लीटर पाणी थोडच आहे. तिथं असा काही मोठा बोगदा पण नाही की त्या बोगदयातून पाणी गेलं आणि आपल्याला काही कळला  नाही.  त्यामुळे ते पाणी धरणापासून आपल्या बंधा-या पर्यंत कुठंतरी मध्ये आहे याची कल्पना तात्काळ यायला पाहीजे होती याच्याबद्दल काही दुमत नाही आणि मग ते कुठे आहे हे शोधण्यासाठी ३० ते ३५ कि.मी. चा तो ऐरीया आहे. आपल्या बंधा-यापासून ते धरणाच्या भींतीपर्यंतचा वाकडे तीकडे असेल, काही ठिकाणी रस्ता नसेलतरी तो

प्रयत्न करण्याची आवश्यकता होती. मी रविवारी रात्री श्री.तांबे यांना १२ ते १२.३० वाजता बोललो, श्री.लडकत यांना बोललो. ते सेक्टर २३ लाच होते ते प्रयत्न करत होते. त्यांचे प्रयत्न म्हणजे इरिगेशन डिपार्टमेंटला बोलणे, पाणी कमी का आले, हे बघणे. जेवढ शक्य आहे तेवढ पाणी उचलणे. जेणेकरुन पुढच्या टाक्या भरल्या जातील पण तरीही ठिक आहे, रात्री नाही जाता आल पण  दिवसा तरी ताबडतोब नदीवर कोणालातरी पाठवून काय झाले हे बघणे अपेक्षीत होते व हे प्रशासनाने करणे अपेक्षीत आहे. आपले नशीब चांगले, श्री.बोडके यांनी सांगीतले त्यानंतर आपण झटपट दोन तासात तो बंधारा मोकळा केला. दोन ते आडीच दिवस आपल्या मंडळीनी प्रयत्न करुन सुध्दा आपल्याला असलेल पाणी आपल्याला घेता आलेले नाही, कोणीतरी मध्ये आडवलं त्यामुळे आपल्या अधिका-यांच्या बाबतीत सुध्दा आपल्याला चौकशी करुन खरंच त्यांनी काय प्रयत्न केले त्यांचे प्रयत्न अपुरे होते का या गोष्टी बघाव्या लागतील. त्यामुळे आडीच ते तीन दिवस जो प्रकार झाला त्याची आजच सखोल चौकशी करण्यासाठी मी आदेश काढतो व त्याची प्रत सभागृहात ठेवतो.

**मा.एम.टी कांबळे (प्र.शहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. सदर काम जे आहे ते नॅशनल हायवे ऑथोरेटी ऑफ इंडीया यांच्या मार्फत चालू होतं. त्याचे ठेकेदार रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर आहेत व सब कॉन्ट्रॅक्टर जे आहेत ते केसीपीएल म्हणून आहेत ते काम करत होते. ही बाब लक्षात आल्यानंतर तातडीने इरिगेशन डिपार्टमेंटच्या अधिका-यांना बोलवून घेतले त्यांना सांगीतल त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांना पण सांगीतल आणि ते कारवाई करतो म्हणून त्यांनी स्वत: सांगीतले म्हणून आम्ही स्वत:हून पुढाकार घेतलेला नाही.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. आपण अधिका-यांच्या बाबत चौकशी करु.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपल्या अधिका-यांना कळायलाच पाहीजे होतं परंतु त्या कंपनीवर पहील्यांदा फौजदारी गुन्हा दाखल झाला पाहीजे. बंधारा कसा टाकला म्हणून.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. आताच कांबळे साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे हे नॅशनल हायवे ऑथोरेटी ऑफ इंडीया यांचे काम आहे. त्यांनी स्वत: सुध्दा इरिगेशन डिपार्टमेंटला सांगीतलेले आहे. परंतु आपण आजच्या सभागृहाच्या भावना लक्षात घेता मी स्वत: इरिगेशन सेक्रेटरीला एक अर्धशासकीय पत्र लिहीतो आहे, त्याच्यामध्ये ही सगळी वस्तुस्थिती नमुद करतो.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. त्या कंपनीकडून आपल्याला त्रास झालेला आहे. आपण एफआयआर त्या कंपनीवर नोंदविला पाहीजे.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. सभागृहाची भावना असेलतर आमची तशी पण तयारी आहे आपण कारवाई करु या तथापि ही बाब राज्याशासनाच्या वरिष्ठ अधिका-यांच्या निदर्शनास आणणे पण आवश्यक आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. सभागृहाच्या सुचनेप्रमाणे आम्ही त्यांच्यावरती पोलीस केस करण्याची कारवाई करु. याच्या ऊपर आपण दोन गोष्टी करतो आहोत की इरिगेशन डिपार्टमेंट आणि नदया ज्यांच्या ताब्यात आहेत त्यांनाही अर्धशासकीय पत्र लिहीणार आहे आणि त्याची कॉपी नॅशनल हायवे ऑथोरेटी ऑफ इंडीया यांच्या वरिष्ठ अधिका-यांना सुध्दा दिली जाईल एवढच मी सांगू इच्छितो. त्याव्यतीरीक्त आपण यापुढे असे प्रकार होवु नयेत यासाठी उन्हाळयामध्ये किंवा आता पाऊस चांगला पडेपर्यंत, पुर्वी कॅनॉलवरती कॅनॉल इन्सपेक्टर असायचे आणि ते दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत रोज एक चक्कर मारायचे तसे आपण या ३० कि.मी. साठी आपले एक ते दोन इन्सपेक्टर कायमस्वरुपी नेमू. ते रावेत बंधारापासून धरणापर्यंत याबाबतीत रोज चक्करा मारुन आपल्याला सर्व आलबेल आहे का आणि पाणी मध्ये कोणी चोरतय का याच्या बाबतीत माहीती देतील. आपण नदीसाठी अशा इन्सपेक्शनची व्यवस्था उदयापासून तात्काळ अंमलात आणू. या व्यतिरीक्त मी दोन तीन महत्वाच्या गोष्टी सांगू इच्छितो की, सध्या पाणीटंचाई आहे. आम्ही बैठक घेवून सर्व अधिका-यांना सांगीतले आहे चांगला पाऊस पडेपर्यंत कोणीही रजेवर जाऊ नका, तुमचे फोन चालू ठेवा सन्मा.सदस्यांना आणि जनतेला तात्काळ रिस्पॉन्स दया. जरी आपण टँकर बंद करा म्हणले असलेतरी काही ठिकाणी टँकरची गरज असेलतर टँकर आपण देवु. मी से.२३ च्या मिटींग मध्ये एक्झिक्युटीव्ह ईंजिनीअरला आणि डेप्युटी ईंजिनीअरला सगळे अधिकार दिलेले आहेत. त्यांना सांगीतलेले आहे तुम्ही टँकरचा हिशोब ठेवा. ज्याठिकाणी गरज आहे, दुसरा पर्यायच नाही, उंचावरचा भाग आहे. ५-२५ घरे असतीलतरी त्याठिकाणी टँकर देण्याचे अधिकार दिलेले आहेत. टँकर कायमचे बंद केलेले नाहीत. आवश्यकतेप्रमाणे टँकर देण्याची व्यवस्था आपण सांगीतलेली आहे. पठाण मॅडम म्हणाल्या होत्या पाणी कपात करता त्यावेळेस फक्त गटनेत्यांना बोलवता आणि प्रेस घेता. प्रथा जशी होती तसे करतो परंतु येथून पुढे महापालिका सभेला विषय मांडू यात. आपल्याकडे ८० टक्के पाणी होते त्या अनुषंगाने आपल्याला २० टक्के पाणीकपात करायला पाहीजे होती पण आपल्याला माहिती की आपण फक्त जानेवारीमध्ये सुरवातीला १० टक्के आणि आता मागच्या एक महीन्यापासून ५ टक्के अशी १५ टक्के कपात केलेली आहे. आपण गटनेत्यांची मिटींग असलीतरी आपण सर्व त्याठिकाणी बरेचजण असतो आणि सर्व मिळूनच निर्णय घेतो. आता मी येथून पुढे गटनेत्यांची मिटींग घेणार नाही, प्रेसलाही सांगून टाकतो याठिकाणी आपण जो निर्णय घ्याल तो त्यांनी लगेच जनतेपर्यंत पोहचवावा अशी माझी

विनंती आहे. १ मे पासून एक दिवसाआड पाणी करायला पाहीजे. कारण आता १ मे पासून आपल्याला १५ टक्के ऐवजी डायरेक्ट २५ टक्के पाणी कपात करा म्हणतात. आपल्याला ४२० एमएलडी पाणी मिळत होते ते डायरेक्ट ३०० एमएलडी पर्यंत येईल. हे ३०० एमएलडी जरी पाणी असलेतरी एका दिवसात अर्धे शहर आणि एका दिवसात आर्धे शहर केलेतर पाणी व्यवस्थीत येईल. एक तास पाणी मिळत असलेतरी ते प्रेशरने येईल, दररोज तुम्हाला एक किंवा दिड तास पाणी मिळत असेलतर त्या दिवशी आपोआपच जास्त पाणी वाढेल. प्रेशरने येईल, वेळ वाढेल आणि जनतेलाही कळेल की उदया पाणी येणार नाही म्हणून आज भरुन ठेवायच आहे. १ मे पासून एक दिवसाआड पाणी करणार आहोत. मी ३० जुनपर्यंत म्हणतो परंतु त्याच्या अगोदर जर चांगला पाऊस पडलातर नदीत पाणी आलेतर आणि नदीच पाणी जर रावेतच्या बंधा-यातून ओव्हरफ्लो होत असेलतर ते आम्ही काही वाया घालवणार नाहीत, चोवीस तास पंपींग चालू होवून पाणी मिळेल अशी माझी विनंती आहे त्यामुळे तोही निर्णय आपण आज घ्यावा अशी विनंती राहील. भूसंपादनाबद्दल सर्वांनी विषय नमुद केलेला आहे. भूसंपादन जिल्हाधिकारी ऑफीस करते आणि ती प्रक्रीया खरंच कॉम्प्लीकेटेड असते. फक्त आपल्या शहरातच नाहीतर महाराष्ट्रात आणि देशात सुध्दा सगळया शहराचा डीपी किती युटीलीटी झाला हे बघीतलेतर तुम्हांला कुठलाही डीपी ३० ते ३५ टक्केपेक्षा जास्त युटीलीटी झालेला दिसणार नाही. राज्यशासनाने टिडीआरचा चांगला निर्णय घेतलेला आहे. आता थोपटे साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे राजकारण आहे, कामच होवु देत नाही असं काहीतरी असेलतर भूसंपादन कराव या मताचा मी आहे. आता आपण सर्व मंडळीनी आपआपल्या भागातील रस्ते आणि आरक्षणाबाबत जे कोणी शेतकरी असतील मी आतापर्यंत अनेक शेतक-यांच्या मिटींग घेतल्या आहेत. तसं आपण आणखीन शेतक-यांना घेवून बसु यात. त्यांच्यासाठी टिडीआरची प्रक्रीया केली आहे. राज्यशासनाने पण अतीशय चांगला निर्णय घेतला त्याची माहीती मी सभागृहालाही देतो. आम्ही स्वतःही शेतक-यांना पोहचवत आहोत. की जर पहील्या वर्षात त्यांनी टिडीआर घेतलातर त्यांना एकूण जमिनीच्या २० टक्के जास्त मिळणार, दुस-या वर्षात घेतलातर १५ टक्के, तीस-या वर्षात १० टक्के, चौथ्या वर्षात ५ टक्के असा टिडीआर त्यांना देवू केला आहे. याचे कारणच हे आहे की प्रत्येक शहरातील रस्ते, उदयान असतील, शाळा असतील हे लवकरात लवकर महापालिकेच्या ताब्यात यावे त्यासाठी पैसे खर्च करण्याची गरज नाही. हा टिडीआर शेवटी शहरावर लोड होतो. त्याचा अर्थ आपल्याच इन्फ्रास्ट्रक्चरवरती लोड पडतो. त्यांना रस्ते, पाणी, लाईट आपल्यालाच दयावी लागते. तथापि शेतक-यांच्या दृष्टिने अतीशय चांगली बाब आहे. २० टक्केचा, १५ टक्केचा सर्व फायदा पुढील दोन वर्षात सर्व शेतक-यांनी घेतल्यास तात्काळ आपल्याकडे टिडीआरअंतर्गत जमिनी प्राप्त होतील आणि आपले छोटे मोठे प्रश्न मीटतील असं दिसते पण तरी मी मागच्या दोन वर्षाखाली साई चौकातले ब्लॉकेज काढलेले आहेत. वाय जंक्शन वगैरे केल आहे. कस्पटे वस्तीचा तीन-तीन, चार-चार वर्षे पडलेला

रस्ता व्यवस्थीत केलेला आहे. केएसबी चौकाच्या पुढे जाधववाडी, कुदळवाडी तेथील रस्ता सर्व भंगारवाल्यांनी आडवला होता तो रस्ता मोकळा केलेला आहे. जवळपास आठ ते दहा ठिकाणचे मोठमोठे ब्लॉकेजेस काढलेले आहेत. सर्वच सन्मानीयांना मी सांगत असतो की पुढचेही काही ब्लॉकेजेस असतीलतर ते आपण काढू. पिंपळेनिलख मध्ये महादेव मंदीराच्या ठिकाणी ब्लॉकेजेस काढलेले आहे तोही रस्ता सुरु केलेला आहे. सुनिताताई वाघेरे यांच्या वॉर्डातील तोही रस्ता देत नव्हते त्याही रस्त्याचा प्रश्न मिटविला व रस्ता चालू केलेला आहे. तथापि काही शेतकरी किंवा काही मंडळी समोर येत नाहीत, जागा देत नाहीत, त्यांना वाटत आपला रस्ता जात नाही, किंवा मग आपण कोर्टात जावू, स्टे आणू. लोकशाहीने प्रत्येकजण आपआपला भाग अवलंबेल पण शेतक-याना कन्हेनीअन्स करुन, त्यांना भरवसाच नाही की लवकर टिडीआर मिळेल की नाही म्हणून. तरी ती प्रक्रीया सुटसूटीत करुन लवकरात लवकर त्यांना टिडीआर देणे, आणि हे आरक्षण आणि रस्ते विकसीत करण्याचा प्रयत्न आमचा चालूच आहे. आणखीन आपण हे फास्ट करुयात एवढच सांगतो आणि बो-हाडे साहेबांनी चांगले प्रश्न विचारलेले आहेत. जेएनएनयुआरएम मध्ये मागच्या सात वर्षात फार पैसे आले, आडीच हजार कोटी रुपये आपल्या महापालिकेत आले. एवढया मोठया प्रमाणावर काम करताना कन्सलटंटच्या सेवा घ्याव्या लागलेल्या आहेत. आता अमृत योजने मध्ये रक्कम येत असलीतरी एका प्रकल्पापुरती आलेली आहे तो पाणीपुरवठयाचा प्रकल्प आहे. १ कोटी रुपये आपल्याला गार्डनसाठी आलेले आहेत. हौसिंग मध्येही आपण आता फार मोठे प्रकल्प घेवू असे वाटत नाही. ईडब्ल्यूएसचा पुढचा टप्पा आहे तो घेण्याचा आपला प्रयत्न आहे. आता कन्सलटंन्सीची गरज नाही असं आपल्याला माहिती आहे पण तरीही काही ठिकाणी आपण मंडळीच अग्रह करतो. गार्डन करायचे, चांगले करायचे. मग जर आपल्याला नावीन्यपुर्ण गार्डन करायचे असेलतर आपल्याला चांगला कन्सलटंट लागतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. कन्सलटन्सीच्या आम्ही विरोधात नाहीत. परंतु त्यांनी ते कागदपत्र चेक करायला नको का तुम्ही कन्सलटंट नेमू नका असं अजीबात आम्ही म्हणत नाही. त्या माणसाला पैसे दिलेतर त्यांची सेवा तत्परतेनी आपल्या अधिका-यांनी घेणे गरजेच आहे आणि त्या पध्दतीने काम करुन घ्यावे, आम्ही कन्सलटंट नको असे म्हणले नाही.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. केंद्रशासनाच्या जेएनएनयुआरएम मधील सगळे धडे घेवून आपण २.५ एफएसआय नसताना करा बांधकाम त्याच्यावर, एसआरएचा प्रकल्प असतानाही जा पुढे, एसआरएची परवानगी घ्या. आपण अशा ब-याच गोष्टी केलेल्या आहेत त्याच्यामागचा उद्देशही चांगला असेल परंतु मागच्या सगळया चुकांचा धडा घेवून आता केंद्रशासनाने सुरवातीलाच सांगीतलेल आहे की जागा तुमच्या ताब्यात पाहीजे. तुम्ही प्रत्येक गोष्ट नियमानुसार करत नाहीत तोपर्यंत आम्ही तुमच्या प्रकल्पालाच मान्यता देणार नाहीत.

त्यामुळे आमचे एचओडी आणि प्रशासन हे दोघेही ते बघतील आणि कन्सलटंटलाही आपण सांगू की आपण काही चुका करत असालतर त्या चुकेसाठी, हायकोर्टाच्या केसेससाठी, लागणा-या वकीलाच्या फि साठीची संपुर्ण जबाबदारी कन्सलटंटची राहील असे एखाद ॲडीशनल कलम त्या ॲग्रीमेंटमध्ये टाकूयात. जेणेकरुन कन्सलटंटवरती थोडस बांयडींग येईल आणि त्या कन्सलटंटने तो प्रकल्प पुर्णत्वापर्यंत नेण्यास साथ दयायची आणि यासाठी सर्व पुर्व तयारी करायची आहे. पाण्याच्या विषय सिरीएसली महापालिका घेते आहे. मी हे पण सांगु इच्छितो की खरच आपले शहर नशीबवान आहे. ८० टक्के तरी धरण भरलेल आहे. दुसरीकडे फार वाईट परिस्थिती आहे. पुण्यामध्ये सहा महीने झाले एक दिवसा आड पाणी आहे. आपण १ मे पासून एक दिवसाआड पाणी करतो आहोत यासाठी सर्वांनी सहकार्य करावे अशी विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. तीन नंबरचा प्रश्न आहे तो कन्सलटन्सीचा आहे त्याचे उत्तर आम्हांला लेखी स्वरुपात दयावे. प्रश्न क्रमांक तीन आहे मागील दहा वर्षामध्ये महापालिकेने कोणकोणत्या कारणांसाठी अथवा प्रकल्पांसाठी सल्लागारांच्या नेमणुका केल्या आहेत **?** त्यांच्यासाठी आतापावेता किती रक्कम खर्च करण्यात आली **?** हे विस्ताराने स्पष्ट करण्यात यावे.

**मा.महापौर-** सगळया प्रश्नांचे उत्तर याठिकाणी दिलेले आहेत.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. या प्रश्नांचे उत्तर वाचून दाखवावे. किती खर्च केलेला आहे हे उत्तर लेखी येऊ दया.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पक्षनेत्यांनी आताच माहीती सांगीतलेली आहे. त्यानंतर बोलणे बरोबर नाही. त्यातून हा विषय राहीलेला आहे. कन्सलटंटला नेमले. आतापर्यंत त्यांना जेएनएनयुआरएमवेळेस घरकुल, इडब्ल्यूएससाठी ५० कोटी रुपये दिलेले आहेत. त्या भागात त्या कन्सलटंटने जे जे काम केलेले आहेत त्या भागाचा मॅप आहे त्यांनी केलेला मॅप आहे. ड्रेनेजलाईन असेल, पाण्याची पाईपलाईन असेल, किंवा त्या भागातील काही सुविधा असतील याचा नकाशा हा देणे गरजेचे आहे तो ते देत नाहीत त्यामुळे अधिका-यांना त्रास होतो. त्यांचा नकाशा दोन दिवसामध्ये मिळालातर आम्हांला त्या परिसरात काम करता येईल. पाच कोटीची बिल्डींग आपण उभी केलेली आहे. पाचव्या मजल्यावर पाणी जात नाही, पाण्याच्या पाईपलाईन वगैरे ब्लॉकेज होतात. त्या लोकांच्या तक्रारी फार मोठया आहेत त्यामुळे कन्सलटंन्सीच्या या चुकीमुळे तो विषय आलेला आहे. हा विषय महत्वाचा आहे म्हणून आपल्याला विनंती करतो की, दोन दिवसात त्याचा मॅप दयावा एवढी विनंती करतो.

**मा.महापौर-** विषय क्रमांक १ घ्यावा.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक- २०.४.२०१६

विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/श.अ./तां/४/५१५/१५
दि.२८/१२/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१५१६६ दि.१७/०२/२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८३० दि.१८/३/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांमधून भुमिगत सेवा वाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे विविध शासकीय/निमशासकिय तसेच खाजगी संस्थेकडून रस्ता खोदाई परवानगीसाठी प्रकरणे वेळोवेळी सादर होत असतात. सदर सेवावाहिन्या नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३९ अन्वये सदर संस्थांना त्यांचेकडील भूमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईस परवानगी महापालिकेमार्फत देण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४१(२) अन्वये संबंधित कंपनीकडून सदर खोदलेला रस्ता दुरुस्त करण्यासाठी जो खर्च येईल तो वसूल करावयाचा आहे. त्यासाठी सदर खोदलेले रस्ते दुरुस्तीसाठी मनपाने दर निश्चित केले असून सदर दर वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. मनपाच्या सदर प्रचलित दरानुसार रस्ता दुरुस्तीपोटी येणारा खर्च संबंधित कंपनीकडून आगाऊ भरून घेण्यात येतो. सद्यस्थितीत सदर रस्ते दुरुस्ती शुल्कामध्ये रस्ता दुरुस्ती खर्च अंदाजे सरासरी र.रु.६५००/- व मनपा अधिभार सरासरी र.रु.३०००/- प्रती मी. दराप्रमाणे आकारण्यात येतो. त्यानुसार अद्याप पर्यंत सर्व खाजगी, शासकीय/निमशासकिय संस्थांना (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत वगळून) त्यांच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी वरीलप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यात येत आहेत. खोदलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीस होणारा अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्याच्या दृष्टीकोनातून तसेच नागरिकांच्या सुरक्षित वाहतूकीसाठी मनपास रितसर निविदा प्रक्रिया करुन, सदर खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी लागते. त्यासाठी महापालिकेकडून भुमिगत सेवावाहिन्या टाकणा-या संस्थेंकडून रस्ता दुरुस्तीचा प्रचलित दरानुसार येणारा खर्च आगाऊ स्वरूपात वसूल करण्यात येतो.

**<u>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचेकडील मागणीः-</u>**

म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभुत आराखडा - २ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी मा.आयुक्त यांच्याकडील दि.१०/०२/२०१५ चे मान्य प्रस्तावानुसार व आदेश क्र.स्थापत्य/शअ/तां/४/५९/२०१५, दि.१०/०२/२०१५ अन्वये र.रु.२३००/- प्रती रनिंग मीटर प्रमाणे

(एकत्रित रस्ता दुरुस्ती खर्च व मनपा अधिभार) याप्रमाणे सवलतीच्या दराने शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत आहे. दि. १४/०९/२०१५ व दि.१६/१०/२०१५ च्या पत्रांन्वये म.रा.वि.वि.कं.मर्या., यांनी महापालिका हद्दीमध्ये यांच्याकडील पायाभुत आराखडा - २ अंतर्गत भुमिगत केबल टाकण्यासाठी व दुरुस्तीसाठी रस्ता खोदाई करण्यास विनाशुल्क परवानगी देणेबाबत मागणी केलेली आहे.

**<u>महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.व भारत संचार निगम लि.यांचेकडील मागणीः-</u>**

तसेच, महानगरपालिकेकडील दर जास्त असल्याने रस्ते दुरुस्तीचे दर कमी करुन पुणे महानगरपालिकेकडील सदर कामासाठीच्या दराप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी मिळणेबाबत महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी त्यांचेकडील दि. २०/०७/२०१५ व दि.०६/१०/२०१५ च्या पत्रांन्वये विनंती केलेली आहे. त्याचप्रमाणे भारत संचार निगम लि. यांनी त्यांचेकडील दि.०१/०७/२०१५ व दि.१९/११/२०१५ च्या पत्रांन्वये रस्ते खोदाईस परवानगीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना देण्यात येणा-या दरातील सवलतीनुसार रस्ते खोदाईस परवानगी मिळणेबाबत तसेच महानगर पालिकेच्या विकास कामातील रस्ता सुधारणांमुळे पुर्वी टाकलेल्या केबल तुटल्यामुळे सदर केबल दुरुस्तीसाठी विनाशुल्क रस्ता खोदाईस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मुख्य व अतंर्गत रस्त्यांवरील उपस्कर विद्युत वाहिन्यांद्वारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचे मार्फत शहरातील नागरिकांना विद्युत पुरवठा केला जातो. शहर सौंदर्यीकरण व अपघात टाळण्याच्या दृष्टीने सदर उपस्कर विद्युत वाहिन्या भुमिगत करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचे मार्फत बहुतांश मुख्य रस्त्यांवरील सदर उपस्कर विद्युत वाहिन्या भुमिगत करण्यात आलेल्या असून उर्वरीत ठिकाणांचे कामकाज करणे बाकी आहे. तसेच, घरगुती स्वयंपाक व इतर वापरासाठी तसेच, शहरातील वाढत असलेल्या मोठ्या प्रमाणातील प्रदुषण रोखण्यासाठी चार चाकी वाहनांसाठी नैसर्गिक वायूचा वापर करण्याचा केंद्र शासनाने महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेतलेला आहे. त्याचप्रमाणे, शहरी भागात सी.एन.जी. चा वापर वाढवून घरगुती वापरातील एल.पी.जी. सिलेंडर ग्रामिण भागासाठी जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट केंद्र शासनाने निश्चित केलेले आहे. नैसर्गिक वायू ( सी.एन.जी.) हा एल.पी.जी. पेक्षा सुरक्षीत व स्वस्त असल्याने व २४ तास अखंडीत पुरवठ्याची शाश्वती असल्याने शहरातील नागरिकांसाठी त्याचा उपयोग होणार आहे. शहरात अशा प्रकारच्या नैसर्गिक वायूचे ( सी.एन.जी.) भुमिगत पाईपलाईन टाकण्याचे व पुरवठा करण्याचे कामकाज महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांचे मार्फत चालू आहे. तसेच शहरातील नागरिकांसाठी आवश्यक असलेले दळणवळणातील एक मुख्य साधन, दूरध्वनी व भ्रमणध्वनी तसेच इंटरनेटची सुविधा केंद्र

शासनाचा उपक्रम असलेली भारत संचार निगम लि. यासंस्थेमार्फत पुरविली जाते. तसेच, संरक्षण विभागासारख्या अती महत्वाच्या विभागासाठी देखील सदर संस्थेमार्फत सुविधा पुरविली जाते. वरील तीनही संस्थेंच्या त्याचप्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन यांच्या व त्यांच्या अंगीकृत संस्था तसेच इतर निमशासकिय संस्थेंच्या भुमिगत सेवावाहिन्या शहरातील नागरिकांसाठी उपयुक्त असल्याने त्यासाठी महानगरपालिकेचे देखील योगदान असणे आवश्यक वाटते. त्यासाठी सदर तीनही संस्थेंच्या भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी त्यांना आवश्यक असणा-या रस्ता खोदाई परवानगीसाठी महापालिकेमार्फत आकारण्यात येणारे शुल्कात सवलत देणे आवश्यक वाटते. केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, एम.एन.जी.एल. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था यांना पुणे महानगरपालिका हद्दीत भूमिगत केबल टाकणेसाठी पुणे मनपाचे मान्य रस्ते खोदाई शुल्कामध्ये चालू दराच्या ५०% सवलत देणेस व एम.एस.ई.डी.सी.एल (एम.एस.ई.बी.) यांना र.रु.२३५०/- या दराने रस्ते खोदाई शुल्क त्यांचेकडील कार्यालयीन परिपत्रक क्र. पथ १९९३, दि.१०/०७/२०१५ अन्वये आकारण्यात येत आहेत. सद्यस्थितीत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत भुमिगत सेवा वाहिन्या टाकण्यासाठी सर्व शासकिय / निमशासकिय व खाजगी संस्थांकडून प्रचलित दरानुसार शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेत येत आहे. तथापि, वरील प्रमाणे नमुद केलेनुसार सर्व शासकिय/निमशासकिय संस्थेंच्या सेवा वाहिन्या शहरातील नागरिकांसाठी उपयुक्त असल्याने व त्यासाठी महानगरपालिकेचे देखील योगदान आवश्यक असल्याने, पुणे महानगरपालिकेच्या वरील प्रमाणे धोरणानुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था, निमशासकिय संस्था यांना भूमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी पिंपरी चिंचवड मनपाचे प्रचलित रस्ते खोदाई दुरूस्ती शुल्कामध्ये चालू दराच्या ५०% सवलत देणेस ( मनपा अधिभार न घेता ) व **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना र.रु.२३५०/- या दराने रस्ते खोदाई शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबत,** तसेच, सदर शासन अंगीकृत कंपन्यांच्या सेवा वाहिन्या नादुरूस्त झाल्यास त्यांची दुरूस्ती तातडीने होणे आवश्यक असल्याने, सदर शासन अंगीकृत कंपन्यांच्या ५ मी. पर्यंत लांबीच्या सेवा वाहिन्या दुरूस्तीसाठी विनाशुल्क व ५ मी. पेक्षा जास्त लांबीच्या सेवा वाहिन्या दुरूस्तीसाठी वरील प्रमाणे शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबतचे धोरण निश्चित करणेसाठी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिकेच्या वरील प्रमाणे धोरणानुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था यांना भूमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी पिंपरी चिंचवड मनपाचे वेळोवेळी वापरात असलेल्या प्रचलित रस्ते खोदाई दुरूस्ती शुल्कामध्ये चालू दराच्या ५०% सवलत देणेस ( मनपा अधिभार न घेता ) व **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना र.रु. २३५०/- या दराने रस्ते**

**खोदाई शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबत,** तसेच, सदर शासन अंगीकृत कंपन्यांच्या सेवा वाहिन्या नादुरूस्त झाल्यास त्यांची दुरूस्ती तातडीने होणे आवश्यक असल्याने, सदर शासन अंगीकृत कंपन्यांच्या ५ मी. पर्यंत लांबीच्या सेवा वाहिन्या दुरूस्तीसाठी विनाशुल्क व ५ मी. पेक्षा जास्त लांबीच्या सेवा वाहिन्या दुरूस्तीसाठी वरील प्रमाणे शुल्क आकारून रस्ता खोदाईस परवानगी देणेबाबतचे धोरण  निश्चित करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषय दप्तरी दाखल करणेत येत आहे.

**मा.साधना जाधव -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक १ ला आमच्या सर्व शिवसेना सदस्यांचा विरोध आहे. सन्मा.आयुक्त साहेब तुम्हांला मी एक आठवण करुन देतो की मागच्या सर्वसाधारण सभेमध्ये या विषया संदर्भात सर्व शहरात खाजगी, निमशासकीय, शासकीय कंपन्यानी या शहराची पुर्ण वाट लावलेली आहे. एवढे मोहोळ उठलेल होत मागच्या मिटींगमध्ये आणि हा विषय कशा पध्दतीने मंजूर झाला हे मला कळायला तयार नाही. या संदर्भात भरपूर चर्चा झालेली आहे. त्याठिकाणी चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. आपण सांगीतलेल होत की, सभागृहामध्ये तो अहवाल आपण मांडू आणि अशा पध्दतीने चुकीचे काम झालेले असेलतर त्या अधिका-यावर कारवाई करुन आणि नेमके शहरात काय घडले किती कोटयावधी रुपयाचे नुकसान महापालिकेचे झालेले आहे. एमएसईबीसंदर्भात, शासकीय संस्था त्यांच्या नगरी सुविधा असतील त्याच्या संदर्भात पुण्याच्या धरतीवर निर्णय घ्यायला हरकत नाही. परंतु ज्या खाजगी संस्था याच्यावरती वर्षोनूवर्षे व्यावसाय करणार आहेत, आपण शुल्क नुसतं भरपाईच घेतो. जर येथे रस्ता खोदाई केलीतर त्याची केवळ भरपाई म्हणून आपण ते शुल्क घेतो. परंतु त्यांना जे चार डक्टची परवानगी आपण दिलेली आणि त्यामध्ये शासन आणि या संस्थेचा जो करार झाला त्याच्यामध्ये नमुद केलेले आहे अशा पध्दतीने व्यावसाय ती खाजगी कंपनी करत असेलतर त्याठिकाणी वेगळया पध्दतीचे व्यावसाय शुल्क वर्षाला स्विकारणे गरजेचे आहे. कारण या संस्था व्यावसाय करणार आहेत, पैसे कमावणार आहेत, आपले क्षेत्र ते वापरणार आहेत. आपली जागा ते वापरणार आहेत. मग जर ते व्यावसाय करत असतीलतर अशा लोकांना केवळ नुकसानभरपाई घेवून परवानगी दयायची का हा महत्वाचा प्रश्न आहे. याच्यावर भरपूर उत्पन्न महापालिकेला मिळणार आहे. त्यामुळे आता सन्मा.नगरसेवकांनी गेले चार वर्षापासून मेहनत करुन चांगला विकास केलेला आहे, डांबरीकरण केले आणि शेवटच्या वर्षात अशा अपेक्षा ज्या नगरसेवकांच्या उरल्या त्याच्यावरती नांगर फिरविण्याचे काम याठिकाणी महानगरपालिकेनी केलेल आहे. सगळ शहर त्याठिकाणी या संस्थेला परवानगी दिल्यामुळे उध्दवस्त झालेल आहे.

आज निवडणूका तोंडावरती आलेल्या आहेत. आपण मोफत शौचालय स्लम ऐरीयामध्ये ज्या ज्या ठिकाणी झालेले नाही त्याठिकाणी आपण परवानगी दिलेली आहे, जुने ड्रेनेज लाईन काढून नवीन लाईन टाकलेल्या आहेत. आज परिस्थिती अशी आहे की प्रत्येक स्लम ऐरीयामध्ये आपण फक्त ड्रेनेज लाईन टाकलेल्या आहेत पण आजतागायत कुठल्याहीप्रकारे त्याठिकाणी डांबरीकरण झालेले नाही. निवडणूका तोंडवरती आलेल्या आहेत तेव्हा बजेट नाहीये आणि जर त्याठिकाणी आम्ही मागणी करत असू की त्याला कुठतरी फंड उपलब्ध करुन दया तर त्याला आपले अधिकारी अनेकप्रकारच्या अडचणी निर्माण करतात. असं होता कामा नये कारण निवडणूकाच जवळ आलेल्या आहेत. नगरसेवकांना त्याठिकाणी नागरीकांना तोंड दयायच आहे. बजेटमध्ये तरतूद नाहीये. अशा परिस्थितीत आपण सर्व शहरात, सर्व झोपडपट्टीमध्ये अशा ज्या ज्या ठिकाणी परिस्थिती असेल त्या त्या ठिकाणी तात्काळ, पाऊस येण्याच्या अगोदर सर्व रस्ते करुन घ्यायची जबाबदारी आपली आहे. माझ्या वॉर्डात अशी परिस्थिती आहे, गेल्या अनेक दिवसापासून मी मागणी करतोय, संजय गांधी नगर झोपडपट्टीमध्ये सगळया ड्रेनेजलाईन नवीन टाकलेल्या आहेत आजही त्याठिकाणी रस्ते झाले नाहीत. रस्त्यावर दगड, गोटे आलेले आहेत. गेली दोन महीने नागरीक त्याठिकाणी सातत्याने त्रास सहन करतात. वारंवार मी राजन पाटील साहेबांना सांगीतलेल आहे तरी आपण अशा पध्दतीने प्रशासन चालत असेलतर हे बेजबाबदारपणाचे काम आहे. मी याठिकाणी विनंती करतो या विषयाकडे वेगळया पध्दतीने पाहण्याची गरज आहे. एकतर आपण त्याठिकाणी उत्पन्न मिळवल पाहिजे. भविष्यामध्ये आपले एकप्रकारचा स्त्रोत त्याठिकाणी निर्माण होवू शकते. आपण आपल्या निर्णयावरती ठाम राहीले पाहीजे. आमच्या एमएसईबी संदर्भातील ज्या काही नागरी सुविधा आहेत त्या सोडून इतर खाजगी संस्थेला अशाप्रकारच्या सवलती देवू नये. बाकीच्या वाहीन्या टाकलेल्या आहेत त्यांना परवानगी दिलेली आहे यापुढे आता परवानगी देवू नये, अजून सुध्दा काम चालू आहेत रात्रंदिवस काम चालू आहेत. कुठल्याही नगरसेवकांना माहिती नसते. फार वाईट अवस्था शहराची होणार आहे, आपण गांभीर्याने लक्ष दिले पाहीजे. केवळ जीबीमध्ये आपण बोलतो आणि जीबी संपल्यानंतर अधिकारी आपल्या घरी जातात प्रश्न आहे तसाच राहतो त्याच्यामुळे याचे गांभीर्य सन्मा.आयुक्त साहेब आपण घ्याव एवढीच याठिकाणी मी विनंती करतो आणि भविष्यामध्ये या सगळया खाजगी कंपन्यांना व्यावसायीक शुल्क लागू कराव जेणेकरुन कायमस्वरुपीच उत्पन्नाच स्त्रोत याठिकाणी महापालिकेला मिळेल एवढीच विनंती करतो आणि आमच्या शिवसेनेच्या सर्व सदस्यांचा या विषयाला भविष्यात विरोध असेल.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाच्या अनुषंगाने एमएसईबी केबल लाईन टाकतात ते टाकणे अतीशय गरजेच आहे. त्यामुळे त्याला जे शुल्क आकारले आहे त्याबद्दल दुमत नाही. त्यातून बाकीच्या लाईन टाकायच्या, पक्षनेत्यांनी परवाच्या मिटींगमध्ये सांगीतले महापालिकेमार्फत काही डक्ट तयार करुन त्या

डक्टमधुन या केबली जाण्यासाठी जे काही आपल्याला करता येईल ते लवकरात लवकर करावे. आपण ज्या परवानग्या दिल्या आहेत त्या परवानग्या बंद करुन डक्टचे काम लवकरात लवकर करावे. एमएसईबीच्या लाईन ज्याठिकाणी पडणार आहेत त्या त्या ठिकाणचे डांबरीकरण होणार आहे तरी ते डांबरीकरण थांबवावे आणि पहील्या लाईनी टाकून घ्या नंतर डांबरीकरण करावे. कारण आपण डांबरीकरण केल्यानंतर लाईनी टाकल्यातर परत खड्डे होतील आणि इलेक्शनच्या काळामध्ये लोकांना आपल्याला उत्तर देता येणार नाही.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय वेळोवेळी ब प्रभाग समितीमध्ये पण आला होता. मागील दोन-तीन वर्षापासून आपल्या भागामध्ये केबल टाकण्याच्या संदर्भात असेल, एमएसईबीचा असेल आता गॅसलाईन पण येणार आहे. नवीन नवीन टेक्नॉलॉजी येते. निश्चितपणे रस्ता खोदला जाणार आहे, निश्चितपणे वायरी टाकल्या जाणार आहेत परंतु प्रशासनाचे त्याच्याकडे लक्ष नाही त्यांना उत्पन्न दिसत नाही. आपण डक्ट उभे केलेतर दरवर्षाला भाडे मिळेल. एमएसईबी सोडून बाकीच्या ज्या खाजगी कंपन्या आहेत त्यांच्यासाठी आपण डक्ट तयार करावेत. प्रत्येकाच्या घरात आज मेलची गरज लागणार आहे. आपल्याला उत्पन्न मिळेल. माझ्या वॉर्डात एकजण आला त्यानी रस्ता खोदला त्यावेळेला तुमच्याकडे तक्रारी केल्या, यांनी यांनी रस्ता खोदला त्यांनी परवानगी घेतलेली होती. ज्याठिकाणी खोदलेल होत त्याठिकाणी डांबराची पट्टी मारुन घेतली नंतर लगेच पंधरा दिवसानी तीच पट्टी खोदली गेली आणि आपल्या सीसीटीव्हीवाल्यांनी वायर टाकण्यास सुरवात केली. रुट तोच त्याच्यानंतर परत सहा महीन्यानी ते बुजवून घेतल परत एमएसईबीची जी ओव्हरहेड लाईन अंडरग्राऊंड करायची होती, ती आमच्या मागणीनुसारच त्यांना बोलावून घेतलेल होत कारण दोन तीन लाईनी ओव्हरहेड राहीलेल्या होत्या. म्हणण्याचा उद्देश काय एकच रुट चार चार वेळेस खोदला गेला, त्याठिकाणी आपले डक्ट असतेतर आणि त्याचवेळी आपण डक्टसाठी योजना केली असतीतर निश्चितपणे त्याचा आपल्याला फायदा झाला असता. माझी विनंती आहे आज महापालिकेचे स्त्रोत कमी होत चाललेले आहे. या उद्देशान आपण मासीक भाडे कसे मिळेल, वार्षीक भाड कसं मिळेल एकदाच घेवून थांबण्यापेक्षा जर महीन्याला काही कंपन्याना आमच डक्ट वापरा व त्यात तुमच्या वायरी टाका आणि आम्हांला एवढ एवढ भाड दया असं केलतर निश्चितपणे आपल्या महापालिकेचा फायदा होईल. तरी आपण याकडे चांगल्या दृष्टिकोनातून बघाव. निश्चितपणे शहर सुंदर व्हावे यासाठी प्रयत्न करावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय रस्ता खोदण्याचा आहे. कुठ कुठ डक्ट पॉसीबल आहे. १२ मी., २४ मी. ३० मी. ला दोन डक्ट करावे. एमएसईबीची लाईन आणि गॅसलाईन एकत्र जाऊ शकणार नाही त्यासाठी दोन डक्ट वेगवेगळे पाहीजे. जागा किती घालवणार. कोणते रस्ते निवडणार. आमच्याकडे तर शक्यच नाही. येथून

पुढे ज्या ज्या ठिकाणी ज्या रस्त्यावर डक्ट करणे पॉसीबल आहे त्याठिकाणी त्याचा विचार करणे आवश्यक आहे. डबल डक्ट केल्याशिवाय पर्याय नाही. अत्यावश्यक बाब आहे. महावितरणाची अंडरग्राऊंड केबल होणे आवश्यक आहे. पुर्वी आपण जो खर्च करायचो तो वाचतो. फोरजी ची लाईन मग ते रिलायन्स असो, व्होडाफोन असो किंवा बीएसएनएल असो आमच्या वॉर्डात कोणकोणत्या रस्त्याला त्याचे बॉक्स उभारणार असं मला कळलं. किंवा कोणत्या रस्त्यावर केबल खोदाई होणार आहे याची माहिती प्रभाग समितीमध्ये प्रत्येक नगरसेवकाना त्या रस्त्याच्या सोसायटीमध्ये किंवा नकाशामध्ये दयावी. बाकी ठिकाणी मोठा रस्ता आहे एखादया ठिकाणी २० फुटाचा आहे एखादया ठिकाणी १२ च फुट आहे तो चेंज करता येईल. त्याप्रमाणे आम्ही सजेशन देऊ. अशाप्रकारे कार्यकारी अभियंत्यांनी किंवा प्रभाग अधिका-यांनी प्रभाग समितीच्या बैठकीमध्ये हा विषय आम्हांला सांगीतला पाहीजे. आम्हांला माहिती दयावी, या या ठिकाणी खोदाई चालू होणार आहे. याची कृपया नोंद घ्यावी, धन्यवाद.

**मा.निलेश बारणे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र राज्य विदयूत वितरण, एमएनजीएल, बीएसएनएल या सर्वांच्या निगडीत गोष्टी आहेत काळाप्रमाणे या झाल्याच पाहीजेत. रिलायन्स, एअरटेल यांच प्रोसिजर चालू आहे यांना पुणे महापालिकेप्रमाणे तुम्ही भूईभाडे का नाही आकारत पुणे महापालिका यांना भूईभाडे आकारते. तसं भूईभाड आपणही आकारल पाहीजे. रिलायन्स, एअरटेल हे आताशी आपल्याकडे परमीशन घ्यायला आलेले आहेत. विक्रम टेलिकॅटीक कंपनी आहे ती कंपनी आज पाच राज्यात काम करते. त्यांचा हाजार ते बाराशे कोटीचा टर्नवर्क आहे. यांनी पाच फुटाची सुध्दा परमीशन घेतलेली नाही. आज हिंजवडी सारख आयटी पार्क हा विक्रम टेलिकॅटीक कंपनीवर चाललेलं आहे. त्याच भुईभाड आकारल का, आज आपल्याला रिलायन्स, एअरटेल कंपनीमुळे जाग आली. ही कंपनी आठ ते नऊ वर्षे झाले यांनी साधारणपणे १५० ते २०० कि.मी.च्या लाईन टाकलेल्या आहेत. पर कि.मी. ला २ लाख ७ हजार प्रत्येक कंपनीला रेट आहे. एअरटेल असो, व्होडाफोन असो, टाटा असो, प्रत्येक हॉटेल असो, याची आपण चौकशी करणार का याचा खुलासा करावा. अंमलबजावणी करायची असेलतर ते चेक करण्याची मशीन असते ती मशीन दाखवते कुठ कुठ लाईन गेल्या आहेत ते. यातून महापालिकेचे उत्पन्न वाढल्या शिवाय राहणार नाही, धन्यवाद.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब मागच्या मिटींग मध्ये सुध्दा हा विषय होता. आम्ही सगळयानी या विषयी भावना व्यक्त केल्या. या ठिकाणी दोन प्रकारच्या संस्था काम करतात. एक शासकीय आणि एक व्यावसायीक असे दोन प्रकार यामध्ये आहेत. आपल्याकडे खोदाईचा जो दर आहे तो दर पुणे प्रमाणे पिंपरी चिंचवडचा करावा असं तुमच म्हणणं होतं कारण शासकीय संस्थाना ती गरजेची गोष्ट आहे लोकांच्या हिताच्या दृष्टिने आपल्याला ते करणं गरजेच आहे म्हणून आमच्यापैकी ब-याच जणानी तुम्हांला सांगीतले की पुण्याच्या दराप्रमाणे करावे. एमएसईबी किंवा बीएसएनएल या

शासकीय संस्थाना ठिक आहे परंतु ज्या व्यावसायीक संस्था आहेत यांच्या बद्दल महापालिकेच्या दृष्टिने आपल्याला आपले उत्पन्न यातुन मिळवता येवू शकते भविष्यकाळात उत्पन्न मिळेल त्याचा फायदा महापालिकेला होईल. कारण या रिलायन्स आणि बाकीच्या संस्था काम करतात त्या व्यावसायीक दृष्टिकोनातून करतात त्याच्यातून ते पैसे मिळवतात त्यामुळे याचा आपणही लॉंगटर्म विचार करुन त्याच्यामध्ये उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले पाहीजेत. आयुक्त साहेब हे जे काम चाललेल आहे याच कुठेतरी प्लॅनिंग असल पाहिजे. हे आपल्याकडे मागणी करतात यांनी टप्प्याटप्प्याने मागणी केली. तुम्ही त्यांच्याकडून पुर्ण पिंपरी चिंचवड शहरात त्यांना कुठ कुठ या लाईन टाकायच्या याचे तुम्ही त्यांच्याकडून प्लॅनिंग घेतले पाहिजे. त्यांची बैठक तुमच्या समवेत झाली पाहीजे आणि जिथे जिथे त्यांना गरजेच आहे तिथं तिथं आपण महापालिकेच्या वतीने डक्ट देवू शकतो का, खोदाईला परवानगी देवू शकतो का याचा अभ्यास केला पाहिजे. संपुर्ण शहराचा विचार झाला पाहिजे. कुठ कुठ आपल्याला ते देणे शक्य आहे. आता म्हेत्रे साहेब म्हणल्याप्रमाणे जे काही डीपी रोड मोठे आहेत त्याठिकाणी डक्ट देणे शक्य आहे परंतु जिथ आपले छोटे रस्ते आहेत त्याठिकाणी कदाचित आपल्याला डक्ट देता येणार नाहीत. किंवा त्यासाठी काय पर्यायी व्यवस्था करता येईल याचा सुध्दा विचार केला पाहिजे. आपल्या महापालिका संबंधीत जी काही खोदाईची कामे चालतात मग ती अंडरग्राऊंड ड्रेनेजची असेल, पाण्याची लाईनचे असेल ती सगळी काम करत असताना कुठतरी समन्वयाचा अभाव दरवेळेस असतोच त्याच्यामुळे स्थापत्य विभाग, पाणीपुरवठा विभाग, ड्रेनेज विभाग, विदयूत विभाग या सगळया विभागाच समन्वयायासाठी आम्ही वारंवार या विषयावर प्रत्येकवेळेस बोलत आलेलो आहोत. रस्ता डांबरीकरण केला जातो त्यानंतर पाणीपुरवठा किंवा ड्रेनेजलाईन खोदण्याची परवानगी मागीतली जाते. हे कुठेतरी थांबले पाहीजे. बदलत्या काळाप्रमाणे आपण ब-याच गोष्टी बदलल्या आहेत आणि आजून खुप बदलण्याची गरज आहे. याचे प्लॅनिंग भविष्यकाळात पिंपरी चिंचवड शहराच्या दृष्टिने करावे अशी आमची आपल्याकडन अपेक्षा आहे. हे करत असताना भविष्यामध्ये कंपन्या आपल्याकडे परवानगीसाठी येणार याची एक बैठक आयोजित करुन आपण पुर्ण शहराच प्लॅनिंग त्यांच्याकडून घेतले पाहीजे. किमान आपला जो खर्च झालेला आहे तो आपला खर्च वसुल झाला पाहीजे. मागच्या काळात अनेक ठिकाणी बेकायदेशिररित्या काही ठिकाणी परवानगी थोडी घेतली आणि जास्त खोदाई केलेली आहे त्यासाठी पेनॉल्टी, दंड आकारला पाहिजे जेणेकरुन भविष्यात या लोकांकडून अशाप्रकारचे होणार नाही अशी अपेक्षा व्यक्त करुन थांबतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय रिलायन्सचा असेल, एमएसईबीचा असेल किंवा नवीन नवीन टेक्नॉलॉजी आपल्या समोर येणार आहेत त्यासंदर्भात असेल. सध्या आता येणा-या २०१७ चे इलेक्शन आहे. आमच्या भागात

पुर्वी ड्रेनेज लाईन, पाण्याची लाईन रस्ते खोदले असतीलतर ते दुरूस्त करण्याच्या पाठीमागे आम्ही लागलेलो आहेत. माझी विनंती राहील की पावसाळा सुरु होणार आहे. २०१७ पर्यंत हया ज्या सगळया गोष्टी चालतील. आपल्या महानगरपालिकेच्या विदयूत लाईन्स, ड्रेनेज लाईन, पाण्याची लाईन सोडून येणा-या कंपन्या असतीलतर त्यांना सध्यातरी थांबावावे अशी आमची विनंती आहे निदान आमच्या भागाततरी आम्ही काम होवू देणार नाहीत कारण सध्या आपल बजेट, आम्ही केलेले काम, रस्ता नवीन केला की माग उखडलेल काम याच्यामुळे आमचे उपद्व्याप वाढलेले आहेत. हे तीन विषय विदयूत, पाण्याची लाईन, ड्रेनेजलाईन सोडून येणा-या या कंपनीला स्थगीती ठेवावी. त्यांच्या पुर्ण डिझाईन घ्याव्यात. जर रस्ता खोदायचा असेलतर स्थापत्य विभागाने त्याची जबाबदारी घ्यावी. आजजरी कुठल्या लाईन दिल्या असतीलतर पाठिमागे सेमडेला किंवा दुस-या तीस-या दिवशी रस्ते करावे ही जबाबदारी प्रशासन किंवा स्थापत्य घेणार असेलतरच आम्ही त्या विषयाला मंजूरी देवू अन्यत: आम्ही आमच्या भागात या तीन लाईन्स सोडून चौथी लाईन खोदू देणार नाहीत, या वर्षभराततरी. म्हणून आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे एकतर ही स्थापत्य विभागाने जबाबदारी घ्यावी. देहू-आळंदी रस्ता करत असताना अधिका-यांनी डक्ट टाकावे म्हणून हे मी स्वत: करुन घेतलेले आहेत. याला कारण असं होत की प्रत्येक १०० ते १५० फुटाला तुम्ही रस्त्यावर क्रॉसकट टाका. चिखली, आळंदी-देहू ला आपण तस केलं. ही काळाची गरज आमच्या ज्यावेळेस लक्षात आल की उदया आम्हांला काही लाईन्स टाकायच्या असतीलतर त्या लाईन्ससाठी डक्ट टाकणे गरजेचे आहे. आता जसं तात्यांनी सांगीतल की आमच्या भागात साडेतीन ते चार मीटरचेच रस्ते आहेत त्याठिकाणी डक्ट कुठून टाकणार. पहीलीच पाण्याची लाईन आहे, पहीलीच ड्रेनेज लाईन आहे, अंडरग्राऊंड ड्रेनेज लाईन आहे. मग हे नवीन डक्टस कुठून टाकणार. त्यालाही लिमीटेशन दिले पाहीजे की जे १२ मी. चे रोडचे पुढे असतील जे १८ मी असतील, जे २४ मी. चे रोड असतीलतर आमच्या भागात तरी आमचा हा नवीन भाग डेव्हलप होणारा आहे. नवीन रस्ते विकसीत होणारे आहेत. नाहीतर परत त्यांना कन्सल्टंन्सी नेमावी लागेल. प्रशासनाला माझी विनंती आहे की जे आमच्या भागात नवीन रस्ते होणार आहेत, देहू-आळंदी, थरमॅक्स चौक तो भोसरी रोड आपण आता केलेले आहे त्या रस्त्याला त्या ठिकाणी डक्ट आहेत. तो रस्ता थरमॅक्स चौकापुढे कधीही खोदला गेलेला नाही. ज्या दिवशी बनवला त्या दिवसापासून आजपर्यंत तो रस्ता कधी खोदला नाही. मग हे जर रस्ता आपण असा करु शकतो तर मग बाकीचा रस्ता का करु शकत नाहीत. शहराच्या चांगल्या दृष्टिने असे अधिकारी चांगले काम का करु शकत नाहीत. एक रस्ता करतो मग दुसरा रस्ता का करु शकत नाहीत. असे अनेक रस्ते आहेत की जे ३० मी. चे आहेत जे १८ मी. चे आहेत. कधीही मला दाखवा थरमॅक्स चौक ते टेल्को चौक हा रस्ता कधीही कुठल्याही कामासाठी खोदला गेलेला नाही. त्याठिकाणी दोन्ही बाजूने डक्ट टाकलेले आहेत. त्यामुळे तो रस्ता कधीही खोदायची गरज लागलेली नाही. याच

विषयी मी देहू-आळंदी रोडला सांगीतल होतं. त्याठिकाणी सुध्दा डक्ट टाका. ठेकेदाराला एक्स्ट्रॉ चार्ज दया म्हणून सांगीतल. आजही तो देहू-आळंदी रोड खोदाईची गरज लागत नाही. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की हा जो रस्ता आहे व जी आता खोदाखोदीची काम चालू आहेत आमच्या भागात या तीन लाईनी सोडून आम्ही खोदू देणार नाहीत. अन्यत: तुम्हांला खोदायचे असेलतर रस्त्याची जबाबदारी सुध्दा आपण घ्यायची. आताच सांगीतल आहे की एलबीटी बंद झाला बाकी उत्पन्नाचे स्त्रोत कमी झालेले आहेत मग यांना कुठेतरी आपण भाडयाने डक्ट देण्यास सुरवात करावी. या कंपनीकडून महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी काहीतरी सुरुवात करावी. महापालिकेला आपला इन्कम सोर्स वाढवायचा असेलतर व्यवस्थीत प्लॅनिंग करुन करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मागच्या मिटींगला सगळे बरसले, कुठलीही लाईन टाकायची नाही. परंतु यावेळेला मा.आयुक्तांना धन्यवाद देईल. त्यांनी पुन्हा विषय आणलेला आहे. १९९७ ला सुरु केलेले काम आपण २००८ पर्यंत ते काम केलेले आहे, अंडरग्राऊंड केबलचे. एमएसईबी कडून आज जे काम ते करु इच्छितात ते काम आपण १९९७ ते २००८ पर्यंत १२५ कोटी रुपयाचा खर्च आपण स्वत: केलेला आहे. स्वत:च रस्ते दुरुस्ती आपण केली तो खर्च वेगळा केला शिवाय १५ टक्के सुपरव्हीजन चार्ज दिलेला आहे तोही खर्च वेगळा म्हणजे साधारणत: २०० कोटीचा आपला खर्च झालेला आहे. हे काम आपल आहे आपण आता मागे मा.माजी उपमुख्यमंत्री अजीतदादा पवार ऊर्जा मंत्री असताना त्यांनी ते एमएसईबीकडे ते काम सोपवले आहे आणि म्हणून ते काम तरी आपण करून घ्याव. आता जो विषय मांडलेला आहे त्याबाबत २५ ते ३० टक्के त्यांचे काम राहिलेले असेल आणि नवीन काही गाव आलेली असतील त्यांच वेगळ. परंतु पुर्वीच्या गावामध्ये फक्त २५ ते ३० टक्के राहीलेल आहे ते काम पुर्ण करुन घ्यावे, कारण रस्त्याचे कडेला ब-याचशा ठिकाणी आपण ब्लॉक बसविलेले आहेत आणि ते ब्लॉक आपण लगेचच बसवू शकतो. अशा ठिकाणी लगेच परवानगी दयायला हरकत नाही. दुसर म्हणजे टेलेकम्युनिकेशनच्या बाबतीत मी निलेश बारणे यांच अभिनंदन करते की त्यांनी तुम्हांला विशेष अशी माहिती दिलेली आहे. अशा ज्या कंपन्या आहेत त्यासाठी काय कारवाई करा हाही त्यांनी उपाय सुचविलेला आहे. अशा आम्ही आपल्याला सुचना केल्यातर त्याही तुम्हांला उपयुक्त असेच ठरेल आता ब-याच जणांनी सांगीतल तोच विषय परत मी सांगते, रस्ता कितीही छोटा रुंदीला असो ७ मी. असो, ९ मी.असो, १२ मी. असो किंवा ३० मी. असो असो डक्टींग करणे हे अत्यावश्यक आहे काळाची गरज आहे. या वेगवेगळया कंपन्या येतात. आयडीया, एअरटेल, एअरसेल सगळया कंपन्यासाठी डक्टींग रस्त्याच्या कडेला करणे हे अत्यावश्यक आहे. त्यासाठी आपण प्लॅन तयार केला पाहिजे त्याचप्रमाणे आपले भाडेव्दारे आर्थिक मदतही होणार आहे. शहरामध्ये ड्रेनेजची लाईन कुठे आहे त्यानंतर पाण्याच्या लाईन्स कशी गेलेली आहे. ड्रेनेजचे तरी ते चेंबर असतात म्हणून

कळतेतरी. पण पाण्याची लाईन कुठून गेलेली आहे हे माहीतीच नसते. त्याचा प्लॅन अव्हेलेबल आहे का, याची चौकशी जरी सिटी इंजिनीअरनी केलीतरी चालेल तो प्लॅन अनेक ठिकाणचा अव्हेलेबल नाही आणि त्यामुळे पाण्याचे कनेक्शन घ्यायचे असेलतर किंवा एखादया नवीन भागाला पाण्यासाठी जोड दयायचा असेलतर त्याठिकाणी खुप मोठी आपल्याला अडचण येते. आता सांगीतल की विदयूतचे ७५ टक्के पर्यंत अंडरग्राऊंडची काम झालेले आहेत तरी तोही प्लॅन आपल्याकडे अव्हेलेबल पाहीजे. तरी तोही प्लॅन विदयूत विभागाकडून घ्यावा. पाणीपुरवठा विभागाकडे कुठे प्लॅन आहेत का तेही पहा आणि ते एकत्रीत करुन ठेवा आपल्याला मदत होईल. मी मा.पक्षनेत्या, मा.महापौर, मा.आयुक्त यांनी हा विषय पुन्हा एकदा आणला आणि आपण महाराष्ट्र राज्य विदयूत वितरण कंपनीच्या केबल अंडरग्राऊंड करण्यासाठी विषय आणला त्याबद्दल पुन्हा एकदा धन्यवाद देते आणि जो दर आपण २३५०/- रुपये ठेवलेला आहे तो मंजूर करावा व इतर बाबतीत आपण जो निर्णय घ्याल तो मान्य आहे. मिटींग घेवून त्यांना त्वरीत पत्र दयावे एवढीच विनंती करते म्हणजे उरलेले काम जी अर्धवट आहेत ती पुर्ण होतील.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा ठराव आमच्या समोर आहे. एमएसईबी आणि एमएनजीएल या दोन्ही कंपन्याचा विषय आहे. या दोन्ही लिमीटेड कंपन्या आहेत. आपल्या डॉकेटमध्ये असे म्हणलेले आहे की सद्यस्थितीत सदर रस्ते दुरुस्ती शुल्कामध्ये रस्ता दुरुस्ती खर्च अंदाजे सरासरी रू.६५००/- व मनपा अधिभार सरासरी र.रु.३०००/- प्रती मी. दराप्रमाणे आकारण्यात येतो. त्यानुसार अद्याप पर्यंत सर्व खाजगी, शासकीय/निमशासकिय संस्थांना (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत वगळून) त्यांच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी वरीलप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यात यावी. र.रु. ६५००/- अधिक ३०००/- म्हणजे ९५००/- दराप्रमाणे आकारण्यात येतो. या दोन्ही कंपन्याना आपण का कन्सेशन दयायला पाहीजे. एमएसईबी आपल्याला कुठेही कन्सेशन देत नाही. नागरीकांना कन्सेशन देतात का, नाही. त्यांचा रेट वाढत चालला आहे. या दोन्ही कमर्शिअल कंपन्या आहेत. लिमीटेड कंपन्या आहेत गव्हर्मेंट डिपार्टमेंट नाही. त्यामुळे या दोन कपंन्याना कन्सेशन दयायला नाही पाहीजे असे माझे मत आहे. आणि कन्सेशन दयायचेतरी किती. आपण २३०० रु. चार्ज करायचा असे म्हणतो. म्हणजे फक्त ३० टक्के रेट ते त्यांच्या कस्टमरला चार्ज करतात. दोन्ही कंपन्या कस्टमरला चार्ज करतात त्यामुळे कन्सेशन देणे चुकीचे आहे. यामध्ये ऑडीट ऑब्जेक्शन येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वांना सरसकट रेट लावला पाहीजे. हे ऑपरेट आपल्याला २ एमबीएस फ्री करायला पाहीजे होतं. हया कंपन्यानी फोरजी चार्ज केलेले आहे. ते आपल्याला दयायला पाहीजे ते आपल्याला दिलेल नाही सहा महीने झाले चर्जींग झालेल आहे. जोपर्यंत ॲग्रीमेंटप्रमाणे जे आहे ते देत नाहीत तोपर्यंत पुढे त्यांना परमीशन दयायला नाही पाहीजे. त्याला किती वेळ लागतो. कुठे कुठे आपल्याला देणार.

हेड ऑफीसला देणार किंवा झोन ऑफीसला देणार याची सर्व डिटेल्स माहीती मिळाली पाहिजे. नाहीतर तुम्हांला महिती आहे आपल्याकडे आठवण राहत नाही. माझा एक प्रश्न आहे की कितीवेळा आपण खोदणार. पहीले एमएसईबीने केबल टाकण्यासाठी खोदले, नंतर एअरटेलने खोदले, नंतर रिलायन्सने खोदले, नंतर गॅस कंपनीने खोदले. तुम्ही त्या सर्व ऑपरेटर्स अर्ज देण्यासाठी पहील्यावेळेस ते जेव्हा आपल्याकडे आले त्यावेळेस आपण एकाच वलयामध्ये स्लॉटस ठेवून आपण अरेंजमेंट करायला पाहीजे होती. फॉरेनमध्ये रोड तयार करताना पाच सहा स्लॉटस असतात. मग प्रत्येक स्लॉटसमधुन प्रत्येक ऑपरेटरना त्याच्यामधुन सुविधा देतात. रोडटेकींग प्रत्येक ऑपरेटर्स करत नाही. आज आमच्याकडे रिलायन्सचे काम चालू आहे, एअरटेलच्या चालू होणार आहे. रोड रिपेअरींग कोण करणार. पावसाळयाच्या अगोदर रिपेअर करणार का. रिपेअर करणार असालतर काम सुरु करा, मला प्रॉब्लेम नाही, पण होणार नाही. आपले अधिकारी इतके ईजीली घेतात की त्यांचे काम होवू दया, त्यानंतर ते म्हणणार पाऊस येणार असे म्हणणार. मग ते काम होत नाहीत. ज्या आर्थी तुम्ही एवढे करोडो रुपये देवून परमीशन देता त्याआर्थी त्यांच काम झाल की त्वरीत महापालिकेचे काम लगेच सुरु व्हायला पाहीजे. मग आपल्याकडे टेंडर आहे का. पण ताबडतोब डांबरीकरण सरफेसींगचे काम व्हायला पाहीजे. याच्याबद्दल सुध्दा तुम्ही ऑर्डर काढायला पाहीजे स्थापत्य विभागाने ऑर्डर काढायला पाहीजे. कन्सेशन दयायची गरज नाही. कन्सेशन म्हणजे १० टक्के, २० टक्के, २५ टक्के, ७० टक्के कन्सेशनला कन्सेशन नाही म्हणत, सेम रेट असायला पाहीजे.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मागच्या वेळेस जो विषय आपण तहकूब ठेवला त्याच्या बाबतच्या निर्णयासाठी हा विषय आहे. शासकीय सेवा वाहीन्याबाबतचा धोरणात्मक निर्णय आणि त्यातुन खाजगी वाहीन्याममुळे शहराला होणारा त्रास त्याबाबत चर्चा मागच्यावेळेस झालेली होती. काही गोष्टीला पर्याय म्हणून अनेक सदस्यांनी सुचना सुध्दा केलेल्या आहेत. माझेही दोन चार प्रश्न आहेत की जमिनी खालची सेवा जर चार्जेबल असेलतर जमिनीवरची सुध्दा सेवा चार्जेबल का नसावी. आज शहरातील एमएसईबीचे ओव्हरहेडचे जाळे फार कमी केलेले आहे. जवळपास १० ते १५ टक्के शिल्ल्क असेल. नवीन समाविष्ट गावात शिल्लक असेल. त्यांना पण चार्ज नको का. ते पोल कुठले वापरतात, आपल्या महानगरपालिकेचेच वापरतात. तुम्ही प्रत्येक लाईटचा पोल बघा. पोलवर केबल आहेच. तुम्ही जर खालून परवानगी दिली नाहीतर ते वरुनही विनापरवाना केबल टाकतात. दुसऱ्या बाजूला एअरटेल असेल, व्होडाफोन असेल, आयडीया असेल, रिलायन्स सारख्या इतर कंपन्या असतील किंवा अजून खाजगी कंपन्या प्रायव्हेट डक्ट भाडयाने देतात असेही आपल्या शहरामध्ये आहेत. निलेश बारणे यांनी उल्लेख केला, विक्रम नावाची कंपनी आहे. त्यांनी आपल्या शहरामध्ये १५० ते २०० कि.मी.ची लाईन ही विनापरवाना रुपयाही न भरता टाकलेली आहे व दुसऱ्या वाहीन्याला भाडयाने चालविण्यासाठी दिलेले आहे. अनेक

प्रायव्हेट केबल्स आपल्या शहरातून जातात. तुम्ही दोन एमबीबीएसचे चार एमबीबीएस करुन घेणार आहेत त्यामुळे महापालिकेचे भले होईल. आमच्या लोकांच काय भलं होणार. आपल शहर १०० टक्के वायफाय होण्यासाठी त्यांच्याकडून सहकार्य घेतल पाहीजे. त्यांच्याकडून आपल्या शहरात १०० टक्के वायफाय सुविधा करण्यासाठी निदान काही हॉटस्पॉट जे आहेत ते तरी करु शकतो. १०० टक्के शहर करु शकत नसलेतरी किमान रस्त्यावरचा मुख्य जो भाग आहे तो १०० टक्के वायफाय या लोकांनी आपल्याला करुन दिला पाहीजे. सगळयात महत्वाचा प्रॉब्लेम या प्लॅनिंगमधलाच आहे.  कन्सलटन्सीचा विषय याठिकाणी ब-याच लोकांनी मांडलेला होता. मी दिड ते दोन वर्षापुर्वी सिटी ईंजिनीअरच्या नावान व तुमच्या नावान पत्र दिलेल आहे आपल्याला जेव्हा जेव्हा आपले बीआरटी असतील, आपले सगळे रस्ते असतील १२ मी. पुढच्या एकाही रस्त्याला एकाही कन्सलटंटनी तुम्हांला टॉयलेटचे प्लॅनींग दिलेले नाही, तुम्हांला कुठेही रेन हर्वेस्टींगचा प्लॅन दिलेला नाही, तुम्हांला वृक्षारोपण प्लॅनिंग दिलेले नाही तुम्ही आज शहरामध्ये लेडीज टॉयलेट बांधण्यासाठी सांगतात की आपण ही योजना केली, ती योजना केली. कन्सलटंटच हे काम नाही का, एक प्रायव्हेट डक्ट टाकण्याचे सुध्दा त्यांच्या प्लॅनमध्ये नाही. हे त्यांच काम नव्हतं का. २.३५ टक्के काही वर्षा पासून आपण त्यांना फि देतोय. ज्या ज्या रस्त्यावर खोदाई करायला लागेल आणि त्या रस्त्याचे प्लॅनिंग कन्सलटन्सीने केले असेलतर त्याचा खर्च त्यांच्याकडून वसूल करा. त्यांच नियोजन काय आहे जर एखाद प्लॅनिंग आपल्याला दिल असेलतर तरी सुध्दा हा रस्ता आपल्याला दोन वर्षानी खोदावा लागत असेलतर त्याच्या प्लॅनिंगचा काय अर्थ आहे. कन्सलटंट काय सांगतो, आपण फुटपाथच्या मधला जो भाग आहे तो कधीही खांदू देणार नाही. याच प्लॅनिंग नाही म्हणत ना. शहरात आम्ही सारख ओरडतो एमएनजीएलवाला आला, एमएसईबीवाला आला, एअरटेलवाला आला, व्होडाफोनवाला आला, रिलायन्सवाला आला. तो आमच्या साईडचे डक्ट सगळे खराब करुन टाकतो. तुमचा जो फुटपाथचा १.२ मी.चा जो पार्ट आहे तो शहरातील आज खराब झालेला आहे. एमएनजीएलचे तुम्हांला सांगतो, आपण त्यांचेकडून पैसे भरुन घेतलेले आहेत. फुटपाथ पासून १५ फुटावर त्यांची लाईन आहे. आम्ही काय करायचे. तुम्ही पैसे भरले याचा अर्थ कुठेही त्यांनी काम करायचे का. त्याला कुठेतरी आपली दिशा पाहीजे. आपली दिशा असल्या शिवाय होणार नाही. मी एमएनजीएलच्या सर्व अधिका-यांशी बोललो. परवानगी दिली याचा अर्थ तुम्ही रस्त्याच्या मधोमध खोदू शकत नाही. पर्याय शोधू खालून जाता येईल, वरुन जाता येईल. त्यांचा फ्लेक्झीबल पाईप आहे. या काही टेक्निकल गोष्टी आहेत. याला आपण परवानगी दिल्यानंतर आपले अधिकारी तीकडे ढुकून सुध्दा बघत नाहीत आणि तोही लक्ष देत नाही त्याला काम उरकायच असत त्यामुळे कामाला स्पिड ठेवतो. त्यामुळे आपले फुटपाथ खराब, रस्ते खराब सगळया शहराची बकाल अवस्था झालेली आहे. हे होत असताना एका बाजूला पुणे शहरात दुस-या पध्दतीचे दर आकारला जातो आणि आपल्याकडे तशी मागणी होते. एमएसईबीच्या

बाबतीत दादांनी सांगीतले आहे. याचा धोरणात्मक निर्णय फार पुर्वी स्वत: दादा मंत्री असताना या विभागाशी झाला होता, पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये आपल्याला ज्या सेवा वाहीन्या टाकायच्या आहेत त्याबद्दल एमएसईबीला थोडेसे सवलतीचे दर दया. आपली एक माफक अपेक्षा होती की जर आमच्याकडन जर तुम्हांला सवलतीचे दर अपेक्षीत असतीलतर शहरातील नागरांना तुम्ही सवलतीचे दर आकारले पाहीजेत. तो त्याच्यापेक्षा कदाचित किचकट प्रकारचा निर्णय होता त्यामुळे तो होवू शकला नाही. हा मात्र झालेला आहे, पुणे शहरात याची अंमलबजावणी होते ती २३००/- रुपये आकारणी करुन रस्ते खोदाईला परवानगी दिलेली आहे. आपल्याही शहरात सुध्दा दयायला हरकत नाही. पण एका बाजूला आपल शहर देशातल सगळयात चांगल शहर प्लॅनिंगमध्ये असताना जर सारखच खोदाव लागत असेलतर काय तुमच्या प्लॅनिंगचा फायदा आहे. आपणच गवगवा करतो माझे शहर खुप सुंदर आहे या शहरातील रस्ते फार प्रशस्त आहेत. फार चांगले आहे मग आता सारखेच जर खोदावे लागत असतीलतर व त्याला जर आपण दोन पाच वर्षात हजारो कोटी रुपये खर्च केला असेलतर काय करायचे, सारखे खोदावे लागतात. आपल्या कन्सल्टन्सीने हे जे प्लॅनिंग केले ते १०० टक्के चुकीचे आहे. आज आपण उन्हाळयाचे चटके बघतो, दुष्काळाची जाणीव होते. शहरामध्ये एकही कन्सलटंट असा नाही की त्याने आपल्याला रेनहर्वेस्टींग सूचवले असे झालेले नाही. आपल्या कन्सलटंटने काय केले, स्टॉर्म लाईनचे ३०० कोटीची योजना केंद्रशासनाकडून मंजूर करुन आणली. चांगली गोष्ट आहे, पाण्याचे नियोजन झाले पाहीजे. पण ते पाणी सुरळीतपणे सिमेंटच्या पाईपमधुन रस्त्यावरुन वाहणार पाणी आपण नदीला जोडतो. एक थेंबही जमिनीमध्ये झीरपत नाही. लोकांच्या बोअरला पाणी कसं लागेल. तुमच पाणी म्हणता बिल्डींगला देवू नका, इमारतीना पाणी देवू नका. ज्यांनी परमीशन घेतलेले आहेत त्यांना टँकरने सप्लाय करु नका. त्यांनी बोअर घ्यायला गेलेतर बोअरला पाणीच लागणार नाही. तुमच्या जमिनीत तुम्ही पाणी मुरण्याची व्यवस्था जर केली नाहीतर तुम्हांला या बाकीच्या व्यवस्था त्यांना करुन दयाव्या लागतील. एका बाजुला तुम्ही असे म्हणणार या बांधकामाना पाणी देता येणार नाही. पण दुसऱ्या बाजूला आपण केलेले ढिसाळ नियोजन दिसून येते हे एकमेकाशी संबंधीत विषय नाही परंतु आपल्याला एकाच छताखाली टेंडर काढायची सवय झालेली आहे. जेणेकरुन त्या कामात सुसूत्रता येते. ही सुसूत्रता जर आपल्याला सारखी बीघडाव लागत असेलतर या लोकांची कन्सलटंट म्हणून काम करायची लायकी नाही. जवळपास आपण ४० ते ५० कोटी रुपये यांना दिलेले आहेत. मग याच्यामध्ये एकाही माणसाने डक्ट सारखा उल्लेख करु नये का. एकाही माणसाने कॉंक्रीट डक्ट असेल, पाईपींग असेल हे एकाही माणसाने सुचवू नये. महीलांसाठी टॉयलेट असेल हे एकाही माणसाने सूचवू नये. रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण असेल हे एकाही माणसाने सुचवू नये आपण कशासाठी कोटयावधी रुपये फि दयायची. आपल्या शहराला जीआयएसची आवश्यकता आहे. अमृत योजनेअंतर्गत, स्मार्ट सिटी

योजनेअंतर्गत या गोष्टी घ्यायच्या आहेत. तुम्ही शहराचा जोपर्यंत जीआयएस मॅपींग करत नाहीत, त्याच्यामध्ये तुम्ही खर्चाचे बघु नका. प्रत्येक ठिकाणी पैसे वाचविण्याचा प्रयत्न केल्यास शहरात उणीवा राहणारच आहेत. आपल्या शहरामध्ये ड्रेनेजचे चेंबर किती आहेत, लाईटचे पोल किती आहेत, लाईटच्या पोलचे फिडरपिलर  किती आहेत, एमएसईबीच्या केबलची पोझीशन काय आहे, ड्रेनेजची काय आहे, पाणीपुरवठयाची काय आहे, त्याची साईज काय आहे याची प्रत्येक खडानखडा माहिती तुमच्या जीआयएसवर अव्हेलेबल आहे. तुम्ही जर प्रॉपर जीआयएस केलातर एकदाच २० कोटी खर्च होतील. आता दहा वेळा आम्ही लोक ओरडतो पाणीपुरवठयाची लाईन कुठे. माझ्या इंजिनीअरची बदली झाली तो कुठं आहे बिल्डींग परमीशनला. त्याला विचारलतर साहेब, मी आता अव्हेलेबल नाही मला बघुन सांगाव लागेल. मला त्या विभागात जायला लागेल. हे एकमेकाचे तुम्ही वनरुप काम करणार असालतर एकमेकाच्या मान्यते शिवाय तुम्हांला त्या रस्त्याच किंवा त्या परिसरातील डेव्हलपमेंटचे कामच करता येणार नाही अशी परिस्थिती तुम्हांला जीआयएस आल्यानंतर करता येवू शकेल. ड्रेनेजवाला म्हणतो माझ काम नाही, पाणीपुरवठयावाला म्हणतो माझ काम नाही, मी नाही सांगणार मी नाही नुकसानभरपाई देणार. काम असतं स्थापत्य विभागाकड, नुकसान होत ड्रेनेजवाल्यामुळे. जबाबदारी कोणच घ्यायला तयार नाही. आपल्याकडे जर प्रॉपर त्या भागाची माहिती असेल, तुमच्या नकाशावर जर तो किती ईंचीचा पाईप आहे, तो ड्रेनेजचा आहे का पाणीपुरवठयाचा आहे का इलेक्ट्रीक केबलचा आहे का, तो प्रायव्हेट केबलवाला आहे का ही जर माहीती तुम्हांला रस्त्याचे काम करतांना मिळालीतर आणि प्रत्येक विभागाची माहीती किंवा एनओसी तुम्हांला प्रत्येक ठिकाणी मिळालीतर त्या कामाच्या नियोजनामध्ये १०० टक्के तुमची बचत होणार आहे. हा जर विचार आपल्या कन्सलटंटला, आपल्या संबंधित अधिका-यांना जर कळत नसेलतर याच्या पेक्षा दुसरी खंत ती काय. त्यामुळे माझी तुम्हांला विनंती आहे येथून पुढचे प्लॅनिंग, येथून पुढचे नियोजन अतीशय चांगल्या पध्दतीने होण्यासाठी या खाजगी वाहीन्याना सुध्दा तुम्ही आडवू शकत नाहीत. एका बाजूला तुम्ही जर विचार केलातर एकटया एअरटेलने, एकटया व्होडाफोनने आणि एकटया रिलायन्स यांनी आपल्याकडे जवळपास ४० ते ५० कोटी रुपये आपल्या महानगरपालिकेत भरलेले आहेत हे सुध्दा विसरुन चालणार नाही. त्यांच्याकडन काय चुकीच होत, काय बरोबर होत हा भाग सोडून दया. याच नियंत्रण करणं आपल्या अधिका-यांचच काम आहे. त्यांनी जर ५० कोटी रुपयाच नुकसान केलेल असेलतर त्याच ठिकाणी खर्चही करणं याला नियोजन म्हणाव लागेल. आपले ५० कोटी जमा झाले की आले माझ्या वॉर्डामध्ये. मी मागच्या वेळी तुमच्या बैठकीला योगायोगाने हजर होतो. मी सगळया वाहीन्याच्या लोकांना सांगीतले, तुमच्या अधिका-यांनाही सांगीतल की यासाठी सेपरेट हेड प्रभागामध्ये तुम्ही करा. ज्या ज्या ठिकाणी वाहीन्यासाठी खोदाई केली जाईल त्याच ठिकाणी ही रक्कम खर्ची केली जाईल. ती रक्कम खर्च करत असताना ही वेळच का यावी.

आता इलेक्शन आलेले आहे. १ मे नंतर डांबरीकरणास परवानगी देणार नाहीत. तुम्ही जरी दिली आणि निसर्गाने चांगली कृपा दाखवली, पाऊस झालातर सगळीच काम ठप्प. त्यामुळे आमच्याकडे काम करण्यासाठी एवढा एकच महीना आहे. १५ मे पर्यंत खोदाईचे आदेश दयावेत. त्यानंतर १५ दिवसात सगळ डांबरीकरण संपले पाहीजे. ते होत असताना ओव्हरहेडचा निर्णय अंडरग्राऊंडचा निर्णय खाजगी लोक जे तुमच्याकडे पैसे भरणार आहेत. ज्यांनी शहरामध्ये अतीशय बकालपणा आणायचे स्वरुप आतापर्यंत केले त्यांना नियंत्रीत करण्यासाठी योग्य नियोजन हे सगळ तुम्हांला येत्या काही दिवसात करावे लागेल. मागच्यावेळेस सुध्दा तासनतास याच विषयावर आपण घालवले. जेंव्हा या सेवेची उपयुक्तता आपल्या शहरामध्ये नागरीकांसाठी आहे ते समजल्यानंतर दादांनीही सांगीतल की मदत करावी लागेल. मदत करण्याबद्दल कोणाचही दुमत नाही परंतु एमएनजीएल सारख्या माणसाना जर आपण खोदाई करण्यासाठी त्यांनी पहील्यांदा ६ हजार आमच्याकडून डिपॉझीट घेणार आहेत उदया त्यांनी १० हजार घेतलेतर काय करायचे, तर ते घेवू नये त्यांना आपण कंडीशनच तशी करावी. किमान वर्षे ते दोन वर्षे आपल्या शहरात तरी त्यांनी काम करावं. त्याचे नियोजन सेंटर गव्हर्मेंट ठरवतं. हे जरी आपल्याला माहीती असल तरी सुध्दा आपण त्यांना कंडीशन टाकून झाल की त्यांना परवानगी दया काही अडचण नाही पण ॲग्रीमेंट जेव्हा आपण करतो त्यावेळेला सर्वच करारनामा/अटिना आपण लागू पडतो किंवा आपण त्यात बसतो असे काही नाही. जेव्हा बसू तेव्हा मात्र तो आपल्याला लागू झाला पाहीजे. ॲग्रीमेंटमध्ये सुध्दा काही कायदेशिर मुद्दे आहेत हे कायदेशिर मुद्दे त्यामध्ये घालून त्यांना आपण मान्यता दिली पाहीजे. आपल्या शहरातील प्रत्येक नागरीकांना एमएनजीएल गॅस उपलब्ध कसा होईल हे पाहील पाहीजे. हे होत असताना आतापर्यंत २०० कि.मी.ची लाईन झाली असती, २०० म्हणजे काहीच नाही आपल्याकड कितीतरी हजार कि.मी. ची लाईन आपल्या शहरामध्ये आहे, म्हणजे आपल्या रस्त्याचे जाळे आहे. मग त्या जाळयाकड प्रत्येक ठिकाणी यांना जायलाच लागणार आहे. पण आपले शहर कुठतरी कार्बन क्रेडीट घेण्यासाठी सुध्दा उदयाच्या काळात पात्र होईल. शहराचे कमीत कमी नुकसान होवून अशाप्रकारच्या वाहीन्यांना, अशाप्रकारच्या सेवाना आपण संधी दिली पाहीजे. याबरोबरच सरकारी सेवे बरोबरच खाजगी जे लोक आपल्याकडे अतीक्रमण करतात, अतीरेक करतात याबाबतीत सुध्दा तुम्ही धोरणात्मक निर्णय घेवून त्यांची काम होवून त्यांची सुध्दा सेवा शहरामध्येच आहे. बीएसएनएलचे फोन आपण स्वत: बंद केले, का तर कनेक्टीव्हीटी नाही, स्पिड नाही, म्हणून तुम्हांला व्होडाफोन असेल, एअरटेल असेल, रिलायन्स असेल जे आज जग सेव्हनजी कड बघु पाहतय म्हणून आपल्याला त्याची गरज आहे, काळाची ती गरज आहे. भविष्यात हे करावे लागेल परंतु ते करत असताना त्यांच्याकडून सुध्दा आपल्याला दोन रुपये उत्पन्न मिळू शकेल का. आमच्या काही सदस्यांनी सुचवल आहे, मी सुध्दा मागच्यावेळेस म्हणलेल होत आपण आपले डक्ट करा आणि ते भाडयाने दयावेत. आपण हा करतोय, तो

करतोय असं म्हणण्यापेक्षा त्याचा आपल्याला काही फायदा जर होत असेलतर तो नक्कीच महानगरपालिकेनी करुन घ्यावा असं मला याठिकाणी म्हणावस वाटतं त्यामुळ आपण याबाबतचा निर्णय चांगल्या पध्दतीने आम्ही तर घेणारच आहोत तुम्हांला परवानगी देणारच आहोत पण याची दक्षता मात्र घ्या. अंडरग्राऊंड, ओव्हरहेड लाईन त्याच्या बाबतीत आकारले जाणारे भाड त्याच्या बाबतचा सुध्दा धोरणात्मक उल्लेख असावा. या सर्व सेवा वाहीण्याना डिस्टर्ब न करण्यासाठी शहरात जीआयएस प्रणालीची अंमलबजावणी करावी. या तीन गोष्टी मला अतीशय महत्वाच्या वाटतात आणि त्यासाठी या धोरणाची लवकरच चांगल्या पध्दतीने नियमावली तयार करुन हे महापालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून कामकाज कराव अशी मी याठिकाणी विनंती करतो, सुचना करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.महेशदादा लांडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयासंदर्भात भरपुर चर्चा या सभागृहामध्ये झालेली आहे. काही सदस्यांनी प्रायव्हेट कंपनी संदर्भात वेगळे धोरण असावे आणि शासकीय ज्या काही योजना आहेत त्याचे सुध्दा वेगळे रेटस असावेत असे सांगीतले आहे. एमएसईबीसंदर्भात मी आपल्याला थोडक्यात सांगतो. पठाणताईनी सांगीतलेल आहे आपण स्वत: खर्च करुन १९९७ ते २००८ पर्यंत कोटयावधी रुपये अंडरग्राऊंडसाठी खर्च केलेले आहेत. त्याच्यानंतर ब-याचशा दिवसापासून अंडरग्राऊंड करण्यासाठी सगळया सदस्यांची मागणी होती हे काम आपण करावे त्यावेळेला तत्कालीन आयुक्त मा.श्रीकर परदेशी साहेब यांच्याकडे नगरसेवकांनी मागणी केली. मागणी केल्यानंतर मा.आयुक्तांनी, आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकानी एमएसईबीला, राज्यशासनाला सांगीतले की आमच्याकडील अंडरग्राऊंडचे काम आहे ते आपण कराव, त्यासंदर्भातील जी काही मदत लागेल ती महापालिकेकडून करु असे पत्र त्यावेळेसच्या तत्कालीन आयुक्तांनी दिलेले आहे. त्याचा विचार करुन त्यावेळेला हे काम मार्गी लागलेले आहे. त्यावेळेला आपल्या मागणीनुसार त्यांनी एमएसईबीने हे टेंडर काढले त्यामध्ये उल्लेख होता की आपल्या मागणीनुसार हे काम करत आहोत असे पत्र आपल्याला दिलेले होते त्यानंतर त्या विभागाने इंफ्रा-२ च टेंडर तयार केले त्यामध्ये रस्ते खोदाईची रक्कम भरण्याकरिता कुठलाही एमएसईबीने उल्लेख केलेला नव्हता. ईंफ्रा-२ चे काम ठरावीक कंपनीला मिळाले त्या कंपनीनी आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेच काम सुरु करण्यास सुरवात केली. रस्ताखोदाईसाठी रक्कम महापालिकेनी जी काय असेल नियमानुसार ती मागीतली, ती मागीतल्यानंतर जो ठेकेदार होता तो ती रक्कम भरु शकत नव्हता कारण त्यांच्या टेंडरमध्ये यासंदर्भातील कुठलीही अट एमएसईबीने टाकलेली नव्हती. एमएसईबीने याच्यासाठी टाकली नव्हती कारण ही महापालिकेची मागणी आहे त्याच्यानंतर हे काम ब-याच दिवस थांबलं. त्याच्यानंतर आयुक्त साहेब आपण आताचे ऊर्जामंत्री मा.ना.बावनकुळे साहेबांकडे यासंदर्भात विनंती केली आणि या शहरामध्ये २०० कोटीचे काम ईंफ्र-२ च्या माध्यमातून चालू झाले. पुणे महापालिकेनी २३००/- रुपये या रेटनं घ्यायचा असं

त्यावेळेस ठरलं. त्या रेटनुसार त्यांनी परवानगी सुध्दा घेतलेल्या आहेत व काहींचे पैसे सुध्दा भरलेले आहेत. आपण गेल्या महीनाभरात सर्व काम एमएसईबीचे थांबविलेले आहेत. माझ्या अंदाजाने ८० टक्के काम ईंफ्रा-२ च या शहराच उरकलेले आहे व २० टक्के काम राहीलेले आहे. जे २० टक्के काम राहील ते तुम्ही थांबवल, काही ठिकाणी त्यांनी रस्ते उखडून ठेवलेले आहेत. १५ मे ची कटऑफ डेट आहे त्यानंतर आपण खोदाईला परवानगी देणार नाहीत. आता जे काम त्यांनी हाती घेतलेले आहे विशेषत: त्या रस्त्याच्या खोदाईच्या अगोदर त्या रस्त्याचा सर्वे आपल्याकडे दिलेला आहे. तो सर्वे आपल्या अधिका-यांनी पाहून नंतर त्यांना परवानगी दिलेली आहे. हे झाले एमएसईबी विषयी. मगाशी काही सदस्यांनी प्रायव्हेट कंपन्याच सांगीतल माझा त्यांना विरोध आहे असं नाही जे काम काढण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेनी त्यांना पत्र दिलेले आहे. ज्या कामासाठी आपण २०० कोटी रुपये खर्च केलेले आहेत तो २०० कोटी खर्च आपल्यासाठी आज ते करतात. आता प्रशांत शितोळे यांनी सांगीतले आपल्या शहरामध्ये सुनियोजीतपणा, निटनेटकेपणा आला पाहीजे. आज सुध्दा तुम्ही दिल्लीत किंवा या ग्रामीण भागामध्ये जावा. छोटया मोठया गल्लीमध्ये इतक केबलच जाळं आहे, इतकी बेकार परिस्थिती आहे. काही लोकांच्या घरावर वायर चिटकलेल्या आहेत. कधीही अपघात होवू शकतो आणि तो अपघात झाल्यानंतर त्या नागरीकाच काही नुकसान झालतर त्याला जबाबदार कोण. आपण म्हणतो अंडरग्राऊंड केबल झाली पाहीजे. आमच्या येथे कुठला अपघात झाला नाही पाहीजे. म्हणजे हे सर्व जर आपल्याला पाहीजे असेलतर आपण सुध्दा त्यांना सुविधा दिल्या पाहीजे. या सर्व सुविधा देण्यासाठी, याच्या संदर्भात आठ महीन्यापुर्वी मंत्रालयामध्ये मिटींग झालेली होती त्यावेळेस जसं आपण या सभागृहामध्ये बोललो होतो तसं आपल्याला अंडरग्राऊंड केबल करायची आहे तरी आपण त्यांना काय मदत करणार याच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली पाहीजे. प्रायव्हेट कंपनीला किती रेट घ्यायचा, आपल्या धोरणानुसार, आपल्या नियमानुसार याचे पुर्ण अधिकार आपल्याला आहेत त्यामध्ये नियमावली तयार आहे किंवा अजून काय बदल करायचा तो करावा. त्यासंदर्भात आमचे काहीही म्हणणे नाही. पण एमएसईबीचे काम थांबून अडचण निर्माण झालेली आहे. स्थायी समिती चेअरमन असताना मी विषय केलेला होता. आपण ज्या वॉर्डामध्ये कुठल्याही प्रायव्हेट कंपन्या असो त्यात किंवा आपली खोदाई असू दयात त्या प्रायव्हेट कंपन्यानी जो काही निधी आपल्याकडे जमा केला ते पैसे त्याच वॉर्डामध्ये खर्च केले पाहीजे. प्रत्येक वेळेस आपले अधिकारी यासंदर्भात हेड ओपन करु, हेड ओपन करु, हेड ओपन करु म्हणतात. पण त्या हेडच नाव काय दयायचे, त्या वॉर्डामध्ये कसे जाणार. यासंदर्भात भोसले साहेबांबरोबर चर्चा झालेली आहे. तळवडेमध्ये रस्ते उखडलेले आहेत. त्याठिकाणचा जो निधी जमा झालेला आहे तो त्या हेडवर कसा जमा होईल याचा विचार केला पाहीजे. रिलायन्स जर चिखलीमध्ये रस्ता खोदतय तर तो पैसा चिखलीमध्येच खर्च झाला पाहीजे, रावेतमध्ये खोदतय तरी ते पैसे त्याच ठिकाणी खर्च झाले

पाहीजे. यासाठी तुम्ही विशेष असे हेड तयार करा. नुसत आपण चर्चेतच राहीलेलो आहोत. सगळयांची इच्छा एकच आहे रस्ता उखडलातर तो परत निट कधी होणार. हे विचारण्यासाठी लोक त्या प्रायव्हेट कंपनीवाल्याकड जाणार नाहीत, एमएसईबीवाल्याकडे जाणार नाहीत किंवा अधिकारी म्हणून आपल्याला विचारायला येणार नाहीत. हे त्या वॉर्डातील लोकप्रतिनीधीला लोक विचारायला येणार. प्रत्येक सदस्यांच हेच मत आल की आपण रस्ते खोदाईस परवानगी त्या संबंधीत कंपनीला देतो तर त्या कंपनीने भरलेले पैसे तो रिपेअरींगसाठी आपण त्याच ठिकाणी वापरले पाहीजेत. दिड ते दोन वर्षापासून मी आपल्याला सांगतो हा पैसा त्याच ठिकाणी खर्च व्हावा म्हणून सांगीतलेले आहे. रस्ते खोदाईसाठी कुठल्याही कंपनीने अर्ज केला, एमएसईबीने केला त्यांना परवानगी मिळते त्यास फार विलंब हातो. विलंब झाल्यानंतर त्यांना पावसाळयाच्या अगोदर खड्डे बुजवायचे असतात. विलंब झाल्यानंतर त्याला चार महीने थांबावे लागणार आहे. टाईमबॉण्ड ठेवला पाहीजे. यासंदर्भात जी रक्कम आपल्या महापालिकेत जमा होईल यासाठी आज उदया हेड ओपन करुन घ्यावे त्यामध्ये ही रक्कम जमा करा. वॉर्डामध्ये हा निधी फक्त त्याच कामासाठी शहरात वापरला गेला पाहीजे. आपल्याकडे पुण्याची भामा-आसखेडची पाईपलाईन चाललेली आहे, च-होलीच्या तेथे, काय परिस्थिती आहे. तो ठेकेदार आपल्या महापालिकेच्या अधिका-याचे ऐकत नाही. त्याला आपण फोन करावा, तुम्ही फोन करावा. तो पुणे महापालिकेचा ठेकेदार आहे. ब-याचशा वेळा कांबळे साहेबांनी फोन केलेला आहे, आज आपल्या रस्त्याचे नियोजन पुर्णपणे विष्कळीत झाले आहे. लाईन वर आणि रस्ता खाली आपला झालेला आहे. भूसंपादनमधून रक्कम दिली म्हणून तरी तिथले रस्ते झालेले आहेत. गेल्या पावसाळयामध्ये तीथल्या लोकांना चांगल्या रस्त्यान जाता आलं. पंधरा-पंधरा, वीस-वीस वर्षे पुर्वीचे रस्ते तसेच होते तुमच्या मुळे तो निधी मिळाला म्हणून रस्ता झालेला आहे आणि या ठेकेदारांनी आज रस्ता उखडून टाकलेला आहे तरी याकडे लक्ष दयावे. आपण धोरणा मध्ये, नियमामध्ये, प्रायव्हेट कंपन्याना ठरवितो ते तुमच्या अधिकारामध्ये ठरवावे त्यांना परवानगी दिल्यानंतर त्यांना तुम्ही टाईमबॉण्ड दयावा. जेणेकरुन आपण जे काही डांबरीकरण त्याच्यानंतर करणार त्याला पण मर्यादा राहील. ब-याचशा दिवस तो रस्ता विष्कळीत राहणार नाही. एमएसईबीला जो आपला रेट २३००/- रुपयाचा आहे तो करावा जेणेकरुन आपल्या शहरातील अंडरग्राऊंड काम होतील, याची शहराला, नागरीकांना गरज आहे या निमीत्तान मी आपल्याला अशी विनंती करतो आणि थांबतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो विषय आहे तो मागच्या मिटींगला आपण चर्चा करुन तहकूब केलेला होता तोच विषय आहे. विषयाची सुरवातच अशी आहे भूमिगत सेवा वाहीन्या टाकण्यासाठी शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्थेकडून परवानग्या मागण्यासाठी आपल्याकडे सदरचे लोक येतात. त्यांना परवानगी देण्यासाठी स्थायी समितीने जसा दिला तसा मंजूर करावा. याचे कारण असे आहे की

शहरामध्ये आता आमदारांनी सांगीतले की एमएसईबीचे जे काम आहे ते ८० टक्के काम पुर्ण झालेले आहे व २० टक्के काम राहीलेले आहे. जर २० टक्के राहीलेल आहे तर त्याच बायफरकेशन करा आवघड याच्यामध्ये काय आहे. २० टक्क्याच बायफरकेशन करा की ज्या एखादया ५ ते १० टक्क्यामध्ये कुठतरी खुप चांगले काम त्या भागामध्ये झालेल असेल, मला नाही वाटत २० टक्क्यामध्ये काम खुप चांगले झालेले असेल परंतु जर खुप चांगल काम झालेल असेल तीथ तुम्ही आता रस्ता केलेला असेलतर आणि लगेच तुम्हांला खोदायचे असेलतर ते २० टक्केच काम तुम्ही चार महीन्या नंतर करा. परंतु त्या २० टक्केमधल बायफरकेशन करा. एमएसईबीसाठी कोणाचाही विरोध नाही आणि कोणाचा असायचही कारण नाही. फक्त राहीलेले २० टक्के कामास कोणाची अडचण असेल असे वाटत नाही. ५ ते १० टक्के काम इकडचे तीकडे झालेतर आभाळ कोसळणार असे वाटणार नाही. त्या त्या नगरसेवकांना विचारा तुमच्या वॉर्डामध्ये एमएसईबीच काम झालय का, तुम्हांला पाहीजे का. तुमच काम कुठ आडलेल आहे का तुमचा झालेला हा रस्ता आम्ही खोदणार आहे बाकीचे जे उरलेले प्रश्न आहेत जस आम्ही सांगीतल की एमएनजीएलवाले ज्यावेळेला आले मी तुम्हांला रेकॉर्डपुर्वक दाखवू शकते की पहील्यांदा त्यांनी नागरीकांकडून ३ हजार रुपये डिपॉझिट घेतले, त्यानंतर ६ हजार केले. त्याच्यानंतर प्रशांत शितोळे ९ हजार म्हणाले आहेत. मग त्यांच्यामुळे आपण रेट कमी करण्याचे कारण काय. आणि ते लाईन टाकताना त्यांना जे खोदायचे आहे तेवढे फुट खाली ते जातात का. उदया काही दुर्घटना झालीतर त्याला जबाबदार कोण असणार, आपले अधिकारी का नॅचरल गॅसवाले. त्यांच्या प्रत्येक सोसायटीमध्ये लाईन्स गेलेल्या आहेत त्याठिकाणी प्रॉब्लेम झालातर त्याला जबाबदार कोण असणार. माझ्या सहकार्यांना मी सांगू इच्छिते की त्यांची लाईन घेतली त्यांचा एकदा फॉर्म भरला, त्यांच कनेक्शन सुरु झालं की जसे एमएसईबीच मीटर पळणार तसे तुमचे ते मीटर पळणार. तुम्ही जरी कॉक बंद केलातरी तुम्हांला मिनीमम एका सिलेंडर एवढे बील हे येणारच आहे. तरी याचा खुलासा झाला पाहीजे. सुविधा लोकांना नक्की पाहीजेत आजही आमच शहर चाललेलच आहे. त्यांनी कंपनी स्थापन केलेली आहे त्यांचा तो बिझनेस आहे तो करताना कुठल्याही गोष्टीच्या त्यांना सुविधा दयाव्यात असे मला वाटत नाही. आमच्या नागरिकांना जर ते सुविधा देणार असतील, आमच्या नागरिकांना त्याचा फायदा मिळणार असेलतर पुर्वी अशाच पध्दतीने एमआयडीसीचे पाणी देत होते. प्रत्येक ऐरीयाला एमआयडीसी जिथ जिथ पाणी जात नव्हत तिथ तिथ एमआयडीसी २४ तास पाणी दयायची. त्यांचा रेट किती आहे. आजही ते पाणी देतात त्यांचा रेट किती आपल्या पेक्षा पाचपटीने जास्त आहे. आपण त्यांच्याकडून घेताना पाचपट जास्त देतो आणि आपल्या नागरीकांकडून कमी घेतो. मग गॅसलाईन बद्दल तसेच करायचे का, उदया गॅसचा बिझनेस करावा लागेल. त्यांच्या लाईनी विकत घ्या नागरीकांना दया. पुढच्या २०१७ च्या जर नगरसेवकांच्या मनात आलतर की अजून काहीतरी दोन चार वर्षानी या

गॅसलाईनचा बट्टयाबोळ होतोय पण आम्ही नागरीकांना कमीटमेंट केलीय आमचा वॉर्ड पुर्ण गॅससाठी ऑनलाईन पाईपव्दारे होईल असं जर एखादयाने त्यांच्या ब्रोशरमध्ये टाकलेतर त्या नगरसेवकांना फिरता येणार नाही. त्यावेळेला महापालिकेनी तो गॅस फुकट दयायचा का. ते देता येणार आहे का. त्याचे रेट कमी करता येणार आहेत का. या लोकांना रस्ते खोदण्यासाठी बाकीच्या गोष्टीसाठी ते लोक जेवढे पैसे भरतात तेवढा रस्ता केला जातो का. आपण नेहमी रेग्युलर रस्ता करतो त्या पध्दतीने रस्ता केला जातो का, त्या पध्दतीने रस्ता केला जात नाही. अनंत को-हाळे यांनी सांगीतले की मी गॅसलाईन टाकून घेतली, रस्ता करुन घेतला परंतु त्या रस्त्याची क्वॉलीटी नुसत असं डांबर टाकतात त्याच्यावर तो रोलर फिरवतात, पुढे जातात दुस-या दिवशी परत तो रस्ता खोदायला रिकामा. हे कशासाठी चालल आणि कुणासाठी चाललं. आज आपण सभागृहामध्ये चार पाच वेळेला पुण्याचे नाव काढली, मला असं वाटत नाही आपण पुण्या बद्दल कधी कम्पेअर कराव परंतु जर आपण पुण्याबद्दल या सर्वांच्या बाबतीत कम्पेअर करायच ठरवतोतर पुण्याच्या महापौरांनी मागच्या महीन्यामध्ये सगळे रस्ते खोदाईच्या परमीशन बंद केल्या आहेत. २ जून पासून पाऊस सुरु होणार आहे तुम्ही १५ मे पर्यंत जर खोदाईची परमीशन दिलीतर त्याच्यावर तुम्हांला डांबर टाकता येणार आहे का. त्याच्या आत जर पाऊस झालातर, तुम्ही देणार परमीशन. मा.महापौर ताई, मी आपल्याला नम्रं विनंती करते की जे २० टक्के आमदार साहेबांनी सांगीतले त्यांच्या मताशी मी सहमत आहे. एमएसईबीच काम जिथ चालू आहे त्या २० टक्केमध्ये तुम्ही बघा. ग्रामीण भागामध्ये जिथे मोठे रस्ते आहेत, ज्या ठिकाणी डक्टींग करायचे आहे ते डक्ट टाकून घ्या. जिथं तुम्हांला काम करायच आहे तिथं नक्की करा. मा.अजीतदादा पवार यांच्या उद्घाटनासाठी तुम्ही मला सांगत होतात तुम्हांला मी फोटो दाखविले. काय परिस्थिती होती, तुम्हांला उद्घाटन घेता आल असतं का. त्याठिकाणी तुम्हांला नेल असतंतर मग काय झाल असतं. मग तुम्ही डोळे झाकून परमीशन कशा देता, कोणत्या कंपन्या असे काम करतात, का काम करतात. मगाचा पाण्याचा प्रश्न तसाच, कुठलाही रस्ता बंद केला की चालले, त्याच्यावर तुमच लक्ष नाही, त्याच्यावर तुमचा अंकूश नाही, काहीच नाही. आस्थापनेवरचा खर्च मग कशासाठी महापालिकेचा. सगळयांचे तारखेला पगार होतातच नां आणि किती आकडयानी पगार होतात मग तो खर्च कशासाठी. मा.श्रीकर परदेशी साहेब असताना काही अधिका-यांचे पगार थांबविले होते. चांगल्या कामाची आठवण परत परत येते. मग कशासाठी थांबवले होते. चांगल काम झाल नाहीतर पगार थांबलेच पाहीजेत. पुण्यामध्ये पीएमपीएमएलच चांगल काम झाल नाहीतर क्लास-१ अधिका-यांचे पगार थांबविले होते. मग हे थांबायलाच पाहीजे. त्या कामाचा जर आपण मोबदला घेत असूतर ते काम तीतकच चोख झाल पाहीजे असं मला वाटतं आणि या मताशी सगळेच सहमत असतील. आता निलेश बारणे यांनी सांगीतलं, म्हणजे कुठल्या युगात आणि कुठल्या जगात आपण वावरतो. त्या विक्रमने विक्रम केलानां आपल्या शहरामध्ये व आपण गप्प

बसलो. हे जर नागरीकांपुढे निलेश बारणे जर घेवून गेलेतर आमच्यावर शिंतोडे उडणार आहेत. ते घेवून जाणार लोकांसमोर आणि मग आमच्यावर शिंतोडे काय उडणार, सत्ताधारी पक्ष आहे त्यांनी इतकी डोळेझाक कशी केली. आस्थापनेवर पगार आम्ही घेतो का. ही डोळेझाक का करता. हे सगळे होईपर्यंत एमएसईबीला २० टक्के राहीलेल्या कामासाठी त्याचा जो २३००/- चा रेट आहे तो आम्हांला सगळयांना मंजूर आहे. हा विषय तेवढयापुरताच आख्खा नाही. तेवढच उपसूचनेव्दारे करुन देतोत अन्यत: हा विषय तहकूब आहे. याच्यावर सर्वपक्षीय कमिटी नेमा. रस्ते कोण किती खोदतं, परवानगी कुठून कुठ घेत यात आम्हांला नाव घ्यायच नाही. नाव का घ्यायची नाही माझेच सर्व सहकारी आहेत. आम्हांला नाव घ्यायचे नाही. परंतु सब कॉन्ट्रॅक्ट आहे, कुणी घ्याव, कुणी कराव तो मुद्दा वेगळा आहे. ज्या लोकांनी काम घेतलेले आहे त्यांनी परवानगी घेतलेली आहे, काम करणारी तीसरी फळी वेगळी आहे. ज्यांनी काम घेतले त्यांनी मॅप प्रमाणे काम करावे. रोडच्या नावासकट नाही, गल्लीच्या नावासकट पाहीजे आहे. काम एकीकडे आणि दिल्लीत जावुन खोदतात. याच्यावर सर्व पक्षीय कमिटी होईल. याच्यावर काम करणा-यांची सर्वांची चौकशी होईल आणि मगच हा विषय मंजूर होईल. एमएसईबीचे २० टक्के काम सोडून सगळयावर स्थगीती करावी. आमचा गॅस चालू आहे, आमच्या गृहीणी रोज गॅस पेटवतात. एमएसईबी सोडून सगळया गोष्टीवर स्थगीती करावी. खोदकाम कुठेही होणार नाही. पेपरवाल्यांना आणि नागरीकांना माझ आवाहन आहे की असं जर कोणी खोदकाम करत असेलतर जागेवर तेथून फोटो पेपरला, प्रेसला पाठवा, आयुक्तांच्या व्हॉटसऍपवर पाठवावा. याची चौकशी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत बाकी विषय स्टॉप आणि आतापर्यंत झालेल्या सगळयाचं आतापर्यंतच त्यांनी काम केलेले ती किती कि.मी.लाईन टाकली, कोणकोणत्या केबल टाकल्या, कोण केबल भाडयाने देतं. कुठल्या डक्टींग मधुन त्या पाच-पाच केबल भाडयाने चाललेल्या आहेत हे सभागृहासमोर याव. हे थर्ड परसनचे काम आहे. ज्यांनी काम घेतलेले आहे तो जो कॉन्ट्रॅक्टर्स आहे त्यांना जे फाईन करायचे ते करा, थर्ड परसन लोकांना सुध्दा, कशाला दादागीरी करुन आपल्या लोकांवरुन आपल्या लोकावर शिंतोडे उडवून घेता माझे सर्व लोक सदन आहेत सभागृहातील व सभागृहा बाहेरचे सुध्दा सदन असताना अशा गोष्टी करु नयेत. मुलगा चुकलातर त्याला सांगणे आपले काम आहे. आणि म्हणून कोणासाठी आपण काम करतो याच्यापेक्षा आपण काय काम करतो हे महत्वाच आहे. सर्व डाटा समोर आला पाहीजे त्यावेळेला हा विषय मंजूर होईल. पावसाळयात तुम्ही डांबरीकरण करु शकणार नाहीत. त्याच्यानंतर पाऊस तीन महीने पडतो, चार महीने पडतो, कधीही पडतो त्याच्यानंतर आमच्या निवडणूका लागणार आहेत म्हणजे आमच तुम्ही पुर्ण भजनच करणार म्हणून अजीबात हे खोदाईचे काम करायचे नाही. शहरामध्ये नागरीकांनाही आवाहन करते, तुम्हीही आवाहन करा की असं कुठ रातोरात काम होणार दिसत असेलतर असं लोकांना आवाहन कराव. पुण्याच्या महापौरांनी सुध्दा निर्णय घेतलेला आहे. आता पावसाळा सुरु होईल, आज सुध्दा बाहेर पाऊस

पडू शकतो. हे सगळे काम थांबले गेले पाहीजे अशी मी विनंती करते. फक्त एमएसईबीचे २३००/- रु. शुल्क घेवून आम्हांला ऍग्री आहे. बाकी काही नाही.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. प्रशासनाचा जो विषय आहे तो फक्त शासकीय खात्यासाठीच होता आणि आज चर्चा खुप झालेली आहे. राज्यशासनाच डिपार्टमेंट आहे एमएसईबी त्याच्यासाठी २३००/- चा निर्णय घेतला. बीएसएनएल, एमएनजीएलसाठी आमचा आग्रह नाही. प्रायव्हेटसाठी आम्ही आपल्या समोर आलेलोच नाही. प्रायव्हेटसाठी जो आहे तोच चालू राहील. १५ मे च्या पुढे आपण तसं परमीशन देणार नाहीत कारण पावसाळा तोंडावर आलेला आहे. परंतु हा प्रस्ताव फक्त शासकीयसाठी होता त्यामध्ये सुध्दा एमएसईबी आणि दोन केंद्रशासनाच्या संस्था होत्या. केंद्रशासनाच्या संस्थासाठी सुध्दा आग्रह नाही. एमएसईबीसाठी विचारपुर्वक काय निर्णय घ्याल तो पण आजच घेतला पाहीजे तर अंमलबजावणी होईल नाहीतर तेही थांबेल. स्पेशल डक्टसाठी आपण पॉलीसी आणू. मा.आमदार साहेबांनी मुद्दा उपस्थित केला होता की वेगळ हेड करावे म्हणून. मी मा.आमदार साहेबांना सांगू इच्छितो की आपण प्रत्येक प्रभागासाठी दहा-दहा कोटी रुपये ठेवलेले आहेत. त्यामुळे तशी अडचण येणार नाही मी खात्री केलेली आहे. एमएसईबी बद्दल आज निर्णय झालातर बरे होईल.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पुर्ण बाकीचे काम बंद, फक्त एमएसईबीसाठी ती सुध्दा २० टक्के जिथे काम पेंडीग राहीलेली आहेत ती, नवीन नाही आणि ती सुध्दा त्या वॉर्डातील नगरसेवकांची एनओसी घेतल्यानंतर काम कराव. नाहीतर केलेला पुर्ण फुटपाथ, रस्ता असं जर खोदून टाकलतर चालणार नाही. या विषयाला मी उपसूचना देते बाकीचा विषय जसा स्थायीने केलेला आहे त्या पध्दतीने करावा. मा.महापौरताई तुम्ही पुर्ण खोदाईची काम थांबवायला सांगा. पावसाळया पुर्वी कुठल्याही वॉर्डातल काम, डांबरीकरण होणार नाही.

**मा.महेशदादा लांडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. इंफ्रा-२ चे काम काही वेळेत झाले नाहीतर काही वर्षानी ते काम आपल्याला करावे लागेल एमएसईबीचं. ते काम त्यांच्या मुदतीमध्ये पुर्ण झाले नाहीतर त्यांना सुध्दा टेंडरचे लिमीट दिलेले आहे त्या पिरीएडमध्ये काम झाले नाहीतर पुढे हा खर्च पिंपरी चिंचवड महापालिकेला करावा लागणार आहे. यासाठी २३००/- रेटने काम चालू राहू दया उदया कोणी आडविलेतर, पुर्ण आपण करु शकलो नाहीतर पिंपरी चिंचवड शहराचे इंफ्रा२ चे काम थांबेल. वेळेत झाले नाहीतर ते काम बंद होईल आणि पुढचे बजेटमध्ये परत आपल्या महापालिकेचे पैसे खर्च करावे लागतील याचा विचार करावा.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडते- पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था, निमशासकीय संस्था महाराष्ट्र विदयुत वितरण कंपनी मर्या. भारत संचार निगम लि. यांचा भूमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी पिंपरी चिंचवड मनपाचे प्रचलित रस्ते खोदाईस परवानगी देण्याबाबतचे धोरण निश्चित करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी आणि मा.स्थायी समिती सभेची ठराव क्रमांक १५१६६ दि.१७/२/२०१६ अन्वये सदरचा विषय दप्तरी दाखल करणेची मागणी असलीतरी सदर ठरावातील सर्व मजकूर वगळून त्याऐवजी पुढील प्रमाणे मजकूर समाविष्ट करुन घेणेत येवून ठरावास मान्यता देणेत येत आहे. फक्त महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना र.रु. २३५० च्या दराने शुल्क आकारुन रस्ते खोदाईस मान्यता देण्यात येत आहे. तसेच येथून पुढे रस्त्यांमधून भुमिगत वाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे शासकीय / निमशासकीय तसेच खाजगी संस्थेकडून खोदाई करण्यापूर्वी त्या त्या वॉर्डातील नगरसदस्यांचा ना हरकत दाखला घेणे बंधनकारक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. विक्रम टेलिकॅटीक या कंपनीने मनपाची परवानगी न घेता २०० किलोमीटरचे डक्ट तयार करुन ते भाडयाने देण्यात आले असल्याचे निर्दशनास आले असून याची सखोल चौकशी करुन व तसा अहवाल सादर करण्यास तसेच या खोदाई कंपनीच्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी सर्वपक्षीय सदस्यांची कमिटी नेमण्यास त्याचप्रमाणे मनपाने मोठे रस्ते करताना व गावांचा विकास करताना दोन्ही बाजूस डक्टचे नियोजन करण्यास जेणेकरुन भविष्यात रस्ता न खोदता वाहिन्या भुमिगत करता येतील तसेच महावितरणचे काम ८० % पूर्ण झाले असल्याने २० % काम करण्यास मान्यता देण्यात येत आहे व हे काम १५ मे पर्यंत पूर्ण झाल्यानंतर नव्याने कोणत्याही शासकीय/ निमशासकीय अथवा खाजगी कंपनीस खोदाईसाठी परवानगी न देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर -** फक्त एमएसईबीसाठी परमीशन देण्यात यावे व बाकीच्या कंपनीची शहरातील खोदाईचे काम थांबले पाहीजे, फक्त उपसूचनेप्रमाणे करावे, फक्त उपसूचनेसह विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८४३ विषय क्रमांक- १

दिनांक - २०.४.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/श.अ./तां/४/५१५/१५ दि.२८/१२/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१५१६६ दि.१७/०२/२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८३० दि.१८/३/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात केंद्र शासन महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था, निमशासकीय संस्था महाराष्ट्र विदयुत वितरण कंपनी मर्या. भारत संचार निगम लि. यांचा भूमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी पिंपरी चिंचवड मनपाचे प्रचलित रस्ते खोदाईस परवानगी देण्याबाबतचे धोरण निश्चित करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी आणि मा.स्थायी समिती सभेची ठराव क्रमांक १५१६६ दि.१७/२/२०१६ अन्वये सदरचा विषय दप्तरी दाखल करणेची मागणी असलीतरी सदर ठरावातील सर्व मजकूर वगळून त्याऐवजी पुढील प्रमाणे मजकूर समाविष्ट करुन घेणेत येवून ठरावास मान्यता देणेत येत आहे. फक्त महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना र.रु. २३५० च्या दराने शुल्क आकारुन रस्ते खोदाईस मान्यता देण्यात येत आहे. तसेच येथून पुढे रस्त्यांमधून भुमिगत वाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे शासकीय / निमशासकीय तसेच खाजगी संस्थेकडून खोदाई करण्यापूर्वी त्या त्या वॉर्डातील नगरसदस्यांचा ना हरकत दाखला घेणे बंधनकारक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. विक्रम टेलिकॅटीक या कंपनीने मनपाची परवानगी न घेता २०० किलोमीटरचे डक्ट तयार करुन ते भाडयाने देण्यात आले असल्याचे निर्दशनास आले असून याची सखोल चौकशी करुन व तसा अहवाल सादर करण्यास तसेच या खोदाई कंपनीच्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी सर्वपक्षीय सदस्यांची कमिटी नेमण्यास त्याचप्रमाणे मनपाने मोठे रस्ते करताना व गावांचा विकास करताना दोन्ही बाजूस डक्टचे नियोजन करण्यास जेणेकरुन भविष्यात रस्ता न खोदता वाहिन्या भुमिगत करता येतील तसेच महावितरणचे काम ८० % पूर्ण झाले असल्याने २० % काम करण्यास मान्यता देण्यात येत आहे. व हे काम १५ मे पर्यंत पूर्ण झाल्यानंतर नव्याने कोणत्याही शासकीय/ निमशासकीय अथवा खाजगी कंपनीस खोदाईसाठी परवानगी न देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमत मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८४४ विषय क्रमांक- २

दिनांक - २०.४.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.मातंवि/अमृत/२/कावि/५२/२०१६दि.३१/३/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१५९४४ दि.५.०४.२०१६

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत मंजुर प्रकल्पाच्या अनुषंगाने अभियानाच्या वित्तीय आकृत्तीबंधानुसार महापालिकेचा स्वःहिस्सा उभा करणेस मान्यतेकामी सोबतचे प्रपत्र अ मधील अ.क्र.१ ते ५ प्रकल्पांना त्यांचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे एकूण रकमेस अंदाजपत्रकिय मान्यता मिळणेस त्याचप्रमाणे अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सेवास्तर सुधारणा आराखडा (SLIP) प्रपत्र अ येथे दर्शविणेत आलेल्या प्रकल्पास प्रशासकिय मान्यता. ब) अमृत अभियानांतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सोबतचे प्रपत्र ब मधील सुधारणांची अंमलबजावणी करण्यास मान्यता क) अमृत अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पाच्या अनुषंगाने अभियानाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार महापालिकेचा स्व:हिस्सा उभा करणेस मान्यता मिळणेकामी सदरच्या प्रकल्पांची व सुधारणांची अंमलबजावणी करणेस तसेच आवश्यक ती तरतूद (मनपा हिस्सा उभा करणे) करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमत मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ३

दिनांक - २०.४.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१५९५१ दि.५.०४.२०१६

पिंपरी चिंचवड शहरातील विविध धर्म पंथाचे लोकांचे पिंपरी चिंचवड शहरांतर्गत असणा-या स्मशानभूमी व दफनभूमीमध्ये सर्व धर्मिय व पंथांच्या अंत्यसंस्कारासाठी खर्चाची जबाबदारी मनपाने स्विकारुन त्याकामी योग्य ती आर्थिक मदत मनपातर्फे देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो विषय आहे तो आपण पर्यावरणाला पुरक अशा पध्दतीने हा विषय करतो. याच्यामध्ये गॅस दाहीनी असेल, विदयुत दाहीनी असेल आणि जिथे काही समाजामध्ये लिंगायत समाज असेल, मुस्लिम समाज असेल, ख्रिश्चन समाज असेल यांच्यासाठी जे दफनभूमी आहे ती खोदण्यासाठी जर कॉर्पोरेशनने निधी दयावा. बाकी खुप शहरामध्ये याच्यासाठी निधी आहे ते खोदकाम करु देण्यासाठी जो निधी आहे तो देता येतो. हा सदस्य प्रस्ताव आहे पण सदस्य प्रस्ताव असलातरी आपण गॅसदाहीनी आणि विदयूत दाहीनी फ्रि देतोच आहेत. फक्त त्याच्या सोबत हा जो विषय आलेला आहे त्यांना ज्यामध्ये दफन करतात त्या दफनभूमीसाठी सुध्दा खोदकामाच टेंडर काढाव आणि त्या पध्दतीने त्यांना मदत करावी. त्याच्यापुढे जाऊन मी असंही सांगेल की खुप ठिकाणी आपल्या ज्या बसेस असतात हया बसेस सुध्दा आपण लोकांना देतो, खुप शहरामध्ये केलेलं आहे. आपण आज सहा प्रभागामध्ये दोन दोन कोटीच्या गॅसदाहीनी करणार आहोत. ज्या लोकांची "पुष्पक" वाहनाची डिमांड असेलतर त्यांना सुध्दा मदत केली गेली पाहीजे. तसेच वायसीएममध्ये सुध्दा अशी काही बेवारस लोकांच्यासाठी सुध्दा या संदर्भात काही मदत लागत असेलतर मग त्यांना कापड पुरवणे असेल वगैरे. कारण मध्यंतरी एका पेपरमध्ये आलेल होतं की ढंपरमध्ये ती बेवारस प्रेत टाकलेली होती आणि ती अंत्यसंस्कारासाठी चालली होती. बेवारस लोकांच्यासाठी जी सुविधा आहे मग त्याच्यासाठी ॲम्ब्युलन्स असेल, त्याच्यासाठी कापड असेल, बाकीच्या काही सुविधा लागत असतीलतर त्या सुध्दा सुविधा या विषयाला धरुन देण्यात याव्यात.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पिंपरी चिंचवड शहरातील विविध धर्म पंथाचे लोकांचे पिंपरी चिंचवड शहरांतर्गत असणा-या स्मशानभूमी व दफनभूमीमध्ये मुस्लिम, लिंगायत, जैन,

ख्रिश्चन आदी धर्मिय व पंथांच्या अंत्यसंस्कारासाठी खर्चाची जबाबदारी मनपाने स्विकारुन त्याकामी योग्य ती आर्थिक मदत मनपातर्फे देण्यास तसेच शहरामध्ये बेवारस मृतदेहास उत्तरणीय तपासणीनंतर पर्यावरणपूरक अंत्यविधीस येणा-या सर्व खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८४५ विषय क्रमांक- ३

दिनांक - २०.४.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१५९५१ दि.५.०४.२०१६

पिंपरी चिंचवड शहरातील विविध धर्म पंथाचे लोकांचे पिंपरी चिंचवड शहरांतर्गत असणा-या स्मशानभूमी व दफनभूमीमध्ये सर्व धर्मिय व पंथांच्या अंत्यसंस्कारासाठी खर्चाची जबाबदारी मनपाने स्विकारुन त्याकामी योग्य ती आर्थिक मदत मनपातर्फे देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरातील विविध धर्म पंथाचे लोकांचे पिंपरी चिंचवड शहरांतर्गत असणा-या स्मशानभूमी व दफनभूमीमध्ये मुस्लिम, लिंगायत, जैन, ख्रिश्चन आदी धर्मिय व पंथांच्या अंत्यसंस्कारासाठी खर्चाची जबाबदारी मनपाने स्विकारुन त्याकामी योग्य ती आर्थिक मदत मनपातर्फे देण्यास तसेच शहरामध्ये बेवारस मृतदेहास उत्तरणीय तपासणीनंतर पर्यावरणपूरक अंत्यविधीस येणा-या सर्व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

(सभागृहात गोंधळ)

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ४

दिनांक - २०.४.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५५/२०१६, दि.०९/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६१ दि.१.०४.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जाहिरात फलक उभारुन जाहिराती केल्या जातात त्यावर महानगरपालिकेमार्फत जाहिरात कर, परवाना फी व जाहिरात फलक

म.न.पा जागेत असल्यास जागाभाडे आकारणी करणेत येऊन परवाना दिला जातो. वरीलपैकी परवाना फीची आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ नुसार करण्यात येत आहे. कलम ३८६ नुसार आकारण्यात येणारे परवाना फीचे दर निश्चित करताना मा. विधी समितीमार्फत मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. मागील वर्षाचे दर निश्चित करण्यासाठी या विभागाने दिनांक ८/०१/२०१४ रोजी महापालिका सभेकडे विधी समिती मार्फत प्रस्ताव सादर केला होता. मा. विधी समिती सभेने प्रस्तावासोबतचे परिशिष्टा प्रमाणे दरवाढ करणेस मान्यता दिली होती. मात्र दरम्यानच्या काळात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आचारसंहिता कालावधीमुळे मा. महापालिका सभेने ठराव क्रमांक ५१३ दिनांक ५/७/२०१४ अन्वये सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत आलेला आहे. त्यामुळे परवाना फीचे दर सन. २०१३-२०१४ प्रमाणेच सन २०१४-१५ साठी कायम ठेवण्यात आले आहेत. चालु वर्षी परवाना फीचे दरात १५% वाढ केलेली असल्याने म.न.पा. उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सन.२०१६-२०१७ साठी ठराविक चौक वगळता अन्य सर्वसाधारण ठिकाणी परवाना फीचे वाढ करावी असे मत आहे. याबाबत पुणे म.न.पा. कडून प्रतिवर्षी र. रू. २२२/- प्रति चौ. फूट याप्रमाणे फी आकारण्यात येते. याचा मासिक दर रू. १८.५० इतका येत असून त्या तुलनेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जाहिरात कर व परवाना फी याचा प्रति चौ. फूट प्रति महा एकत्रित दर र. रू. ७.८० इतका आहे. तो पुणे म.न.पा. पेक्षा खूपच कमी आहे. सबब परवाना फीचे दरात सन २०१५-१६ पेक्षा ठराविक चौक वगळता अन्यत्र वाढ करावी असे मत आहे. मात्र आकारणी मधिल क्लिष्टता कमी करून हिशोबात सोपेपणा येण्याचे हेतुने त्यामधिल टप्पे कमी करून सोबतच्या परिशिष्ट ‘अ’ मध्ये दर्शविलेप्रमाणे दराचे टप्पे निश्चित करून नजिकच्या पुढच्या रक्कमेत पुर्णांकीत करुन वाढ करण्यात यावी अशी शिफारस आहे. उत्पन्न वाढीच्या दृष्टिने महानगरपालिकेने शहरातील जास्त वर्दळीच्या महत्वाच्या एकूण. १० चौकामध्ये जाहिरातीचे हक्क निविदेद्वारे १/४/२०१२ ते. ३१/३/२०१४ या काळात जाहिरात संस्थेस दिलेले होते. त्यामध्ये प्रती चौरस फुट प्रती महा र. रू. २४ ते र. रू. ३० जाहिरात कर व परवाना फी चे एकत्रित दर प्राप्त झालेले होते. हि बाब विचारात घेता सदर निविदा चौकामध्ये अन्य क्षेत्रापेक्षा जाहिरातदाराकडून प्राधान्यक्रमाने व वाढीव दराने मागणी आहे, हे दिसून येते. तसेच या चौकाशिवाय त्याच क्षेत्रातल्या अन्य महत्वाचे चौकाचा समावेश त्यामध्ये करता येईल. एकूण १२ शिफारस केलेल्या चौकांची यादी सोबतच्या परिशिष्ट ‘ब’ मध्ये दर्शविली आहे. सदर चौकात जाहिरात प्रसिध्दीसाठी प्राप्त दरामुळे जाहिरातीचा सदर चौकातील जाहिरात प्रसिध्दीसाठीचे बाजारभाव प्राप्त झालेले आहेत. वरील बाब विचारात घेता व म.न.पा.चे आर्थिक हित विचारात घेऊन निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरामधील सर्वात जास्त दर ज्या चौकात प्राप्त झाले आहेत त्या दरानुसार अन्य सर्व प्रस्तावित चौकात दरांची आकारणी करता येईल असे वाटते. तथापी सदरचे दर हे ४ वर्षापूर्वी प्राप्त झाले आहेत. ही बाब विचारात घेऊन वरील चौकात प्राप्त झालेल्या

अधिकत्तम र.रू.२८/- प्रति महा दरानुसार परवाना फी सर्व चौकात आकारणी करावी अशी शिफारस आहे. त्यासाठी वरील सर्व चौकाचे क्षेत्र घोषित करुन (झोनिंग) सदर चौकामध्ये प्रसिध्द होणा-या जाहिरातींना वरील प्रमाणे परवाना फी चे दर लागू करणेत येतील. चौकातील जाहिरात क्षेत्र म्हणजे चौकाचे सिमारेषेपासून सर्व दिशांनी ५० मिटर अंतराचे आत चौकामधून दृष्टीपथास येणारे (चौक सन्मुख) सर्व प्रकारचे जाहिरात फलक (खुल्या जागेवरील, इमारतीवरील, इमारतीचे गच्चीवरील, इत्यादी) या सर्वांना हे दर लागू करण्याची शिफारस आहे. उपरोक्त बाबी विचारात घेऊन महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरातीचे दरात परिशिष्ठ ‘अ’ प्रमाणे सर्व साधारण क्षेत्रासाठी परवाना फीचे दर प्रस्तावीत केले आहेत. तसेच विशिष्ट चौकांची यादी परिशिष्ट ‘ब’ मध्ये नमूद केलेप्रमाणे परवाना फीचे दर मा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी सर्व ठिकाणच्या जाहिरात फलकासाठीचे परवाना फी चे सन २०१५-१६ साठी निश्चित केलेले दर हे सन २०१६-१७ साठी कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.आशा सुपे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८४६ विषय क्रमांक- ४

दिनांक - २०.४.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५५/२०१६, दि.०९/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६१ दि.१.०४.२०१६

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ५

दिनांक - २०.४.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५३/२०१६, दि.०९/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६२ दि.१.०४.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात.

सद्यस्थितीत याविभागामार्फत देण्यात आलेल्या एकूण परवान्यांची संख्या दि. ३०/११/२०१४ अखेर ६१३९ एवढी आहे व सन २०१५-२०१६ मधील माहे नोव्हेंबर २०१५ अखेर मिळालेले एकूण उत्पन्न र.रु. १५,८४,४५६/- ( अक्षरी र.रु.पंधरा लाख चौ-याऐंशी हजार चारशे छपन्न फक्त) एवढे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतुदीस आधीन राहून प्रति वर्षी परवाना फीचे दर निश्चित करण्यात येतात त्यानुसार सन २०१६-१७ साठीही ते निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१३-२०१४ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१२-२०१३ चे दरात १०% वाढ केलेली आहे. ही बाब विचारात घेता सन २०१४-२०१५ साठी कोणतीही फी वाढ न करता सन २०१३-२०१४ चे दर कायम ठेवण्यात आले आहेत. सन २०१५-२०१६ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१४-२०१५ चे दरात १०% वाढ केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्रमांक पीसीसी-३०१५/प्र.क्र.७५(१)/नवि-२२ दिनांक २४/४/२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३ मध्ये महानगरपालिकेच्या अधिकारितेतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्दारे अधिसूचित केलेल्या क्षेत्रामध्ये कारखाने, कर्मशाळा किंवा कामाच्या जागेच्या बाबतीत अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही अशी सुधारणा केलेली आहे. त्यामुळे एम.आय.डी.सी. क्षेत्रातील उद्योगांना यापुढे म.न.पा. परवाने देता येणार नाहीत. तसेच म.न.पा.चे उत्पन्नाचे प्रमुख साधन एल.बी.टी. हे शासनाने रद्द केलेने म.न.पा. उत्पन्न वाढविण्यासाठी सन २०१६-१७ साठी प्रचलित सन २०१५-१६ दरामध्ये २०% दरवाढ उपरोक्त व्यवसाय व साठा परवान्यासाठी करणेत यावी. तसेच उद्योगधंदा परवान्यासाठी प्रपत्र अ प्रमाणे परवाना फी असे सूचविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०१६-१७ साठी प्रस्तावित दर दर्शविणारे, उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र - अ, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र - ब व साठा परवाना फी साठी प्रपत्र - क सोबत सादर केलेप्रमाणे मा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी उद्योगधंदा परवाना, व्यवसाय परवाना

व साठा परवाना फी चे सन २०१५-१६ साठी निश्चित केलेले दर हे सन २०१६-१७ साठी कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.आशा सुपे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८४७ विषय क्रमांक- ५

दिनांक - २०.४.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५३/२०१६, दि.०९/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६२ दि.१.०४.२०१६

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ६

दिनांक - २०.४.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/७/कावि/६१/२०१६, दि.१२/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६३ दि.१.०४.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेने मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 454 सह 457 (3) मधील तरतुदी नुसार महानगरपालिकेस नेमणुकीचे अधिकार असलेल्या जागांसाठी आवश्यक असेलेली शैक्षणीक पात्रतेबाबतचे “पिंपरी चिंचवडमहानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2010” नियम तयार केलेले होते. त्यांस मा.महापालिका सभा ठराव क्रमांक 1113 दिनांक 18/03/2011 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर नियमांचा मसुदां पत्र क्रमांक प्रशा/1अ/कावि/533/2011 दिनांक 02/05/2011 च्या नोटीसान्वये प्रसिध्दी करुन हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्या नुसार एकुण 162 हरकती व सुचना प्राप्त झाल्या आहेत. सदर

हरकती बाबत विचार होउन सदरचे नियम अंतिम मंजुरीसाठी दिनांक 17/10/2013 अन्वये मा. विधी समितीकडे सादर करण्यात आले होते. तथापी शासन निर्णय क्रमांक : एमसीओ 2014/प्र.क्र.153/नवि 14 दि. 01 सप्टेंबर 2014 अन्वये महानगरपालिकांचे सुधारीत वर्गीकरण करण्यात आले असुन त्यानुसार "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश "ब" वर्गात झाल्याने त्या प्रमाणे आकृतीबंधासह सेवा प्रवेश नियम "ब" वर्ग पुणे महानगरपालिकेच्या मंजूर सेवा प्रवेश नियमाच्या नमुन्यामध्ये तयार करुन सादर करण्याच्या सुचना मा. शासनाकडुन सुचना दिलेल्या आहे. त्यामुळे पत्र क्रमांक प्रशा/7/कावि/621/2014 दि. 01/09/2014 अन्वये सदरील प्रस्ताव दुरुस्तीकामी मा.विधी समिती कडुन मागे घेण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2010 हे अधिकारी/कर्मचारी यांच्या श्रेणी/गट निहाय तयार करण्यात आले होते. तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2016 हे प्राप्त हरकती वरील अभिप्रायासह विभागाच्या आकृतीबंधाचा समावेश करुन तयार करण्यात आलेले आहेत. सदरचे नियम परिशिष्ट 1 ते 3, प्रत्येक विभागाची पदनिहाय मंजुर पदांची माहिती व प्रस्तावित आकृतीबंध यासह सादर करण्यात आले आहेत. "पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2010" आता पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा ( सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2016 मधील परिशिष्ट 1 ते 3 (सेवा भरती करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती अधिकारी व कर्मचा-यांच्या पदांसाठी शैक्षणीक व इतर अर्हता, अधिकारी व कर्मचारी यांसाठी विभागीय परिक्षा नियम), विभागनिहाय प्रस्तावित आकृतीबंध यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५४ सह ४५७ (३) अन्वये मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित आकृतीबंधातील "प्रपत्र अ ग्रेड पे" यामध्ये खाली नमुद केलेप्रमाणे ग्रेड पे चा समावेश करुन त्यास एकत्रितपणे मान्यता देणेत येत आहे.

**प्रपत्र “अ”**

**नवीन निर्माण करावयाची पदे/ग्रेड पे**

**गट “अ”**

| अ.क्र. | पदनाम | नवीन आवश्यक पद संख्या | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| १ | अतिरिक्त आयुक्त | ----- | १५६००-३९१०० | ७९०० |
| २ | शहर अभियंता | ----- | १५६००-३९१०० | ७९०० |
| ३ | सह आयुक्त | ----- | १५६००-३९१०० | ७६०० |
| ४ | मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी | ---- | १५६००-३९१०० | ७६०० |
| ५ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ----- | १५६००-३९१०० | ७६०० |
| ६ | विकास अभियंता, दुरसंचार | --- | १५६००-३९१०० | ७६०० |
| ७ | नगरसचिव | ----- | १५६००-३९१०० | ६९०० |
| ८ | चिफ केमिस्ट | ----- | १५६००-३९१०० | ६६०० |
| ९ | मुख्य पशुसंवर्धन अधिकारी | ---- | १५६००-३९१०० | ६६०० |
| १० | मुख्य सुरक्षा अधिकारी | ------ | १५६००-३९१०० | ६६०० |
| ११ | माहिती व तंत्रज्ञान अधिकारी | ----- | १५६००-३९१०० | ६६०० |
| १२ | उपमुख्य अग्निशमन अधिकारी | ----- | १५६००-३९१०० | ६६०० |
| १३ | मुख्य समाज विकास अधिकारी | ---- | १५६००-३९१०० | ६६०० |

**प्रपत्र “अ”**

**नवीन निर्माण करावयाची पदे**

**गट “ब”**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कॉम्प्युटर प्रोग्रामर | ----- | १५६००-३९१०० | ५४०० |
| २ | क्रिडा अधिकारी | ------ | ९३००-३४८०० | ५४०० |
| ३ | मुख्य गाळणी निरिक्षक | ----- | ९३००-३४८०० | ५४०० |
| ४ | विभागीय अग्निशमन अधिकारी (डिव्हीजनल फायर ऑफीसर) | ----- | ९३००-३४८०० | ४८०० |
| ५ | वरिष्ठ दुरसंचार अधिकारी | ---- | ९३००-३४८०० | ४८०० |
| ६ | क्रीडा पर्यवेक्षक | ----- | ९३००-३४८०० | ४६०० |
| ७ | सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी(असिस्टंट डिव्हीजनल फायर ऑफीसर) | ----- | ९३००-३४८०० | ४६०० |
| ८ | कनिष्ठ दुरसंचार अधिकारी (दुरध्वनी) | ---- | ९३००-३४८०० | ४६०० |

**प्रपत्र “अ”**

**ग्रेड पे व नवीन निर्माण करावयाची पदे**

**गट “क”**

| अ.क्र. | पदनाम | नवीन आवश्यक पद संख्या | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| १ | अग्निशमन केंद्र अधिकारी (स्टेशन ड्युटी ऑफीसर) | ----- | ९३००-३४८०० | ४४०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | दुरध्वनी पर्यवेक्षक | ----- | ९३००-३४८०० | ४४०० |
| ३ | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (असिस्टंट स्टेशन ड्युटी ऑफीसर) | ----- | ९३००-३४८०० | ४१०० |
| ४ | चालक तथा यंत्र चालक / ड्रायव्हर ऑपरेटर (फायर इंजिन ड्रायव्हर) | ----- | ५२००-२०२०० | ३१०० |
| ५ | लिडिंग फाय़रमन | ----- | ५२००-२०२०० | २८०० |
| ६ | फायरमन | ---- | ५२००-२०२०० | २४०० |

वरील प्रमाणे नवीन वेतनश्रेणी व मंजूर पदांचे सुधारित वेतनश्रेणीस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेनंतर मुळ प्रस्तावात आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१६ अंतर्गत खालील प्रमाणे नवीन पदनिर्मिती, संवर्ग, पदनाम/पदांची संख्या/वेतनश्रेणी, नेमणूकीची पध्दत व टक्केवारी, नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती तयार करण्यात यावी.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम / पदांची संख्या / वेतनश्रेणी | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय सेवा गट-अ | विशेष अधिकारी पद-१ १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | पदोन्नतीने १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी<br>२) पत्रकारिता व जनसंज्ञापन (Journalism & Mass Communication) या विषयातील पदवी/पदवीका परिक्षा उर्त्तीर्ण<br>३) महानगरपालिका आस्थापनेवरील माहिती व जनसंपर्क अधिकारी या संवर्गातील ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २ | तांत्रिक सेवा गट - अ | कार्यकारी अभियंता (दूरसंचार) | पदोन्नती १००% | महानगरपालिका अस्थापनेवरील उपअभियंता (दूरसंचार) पदावरील पदवीधारक असल्यास किमान 3 वर्षाचा अनुभव आणि पदविकाधारक असल्यास किमान 5 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पद-१<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | | वर्षाचा अनुभव असणा-या अधिका-यांमधून सेवाज्येष्ठतेचा विचार करून (सदर पदामध्ये वायरलेस इनचार्ज पदाचे समायोजन करून रिक्त झाल्यानंतरच्या पदासाठी) |
| ३ | तांत्रिक सेवा<br>गट - ब | वरिष्ठ दूरसंचार अधिकारी<br>पद-१<br>९३००-३४८०० ग्रेड पे ४८०० | पदोन्नती १००% | १) कनिष्ठ दूरसंचार अधिकारी या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| ४ | तांत्रिक सेवा<br>गट - क | कनिष्ठ दूरसंचार अधिकारी (दूरध्वनी) पद-१<br>९३००-३४८०० ग्रेड पे ४६०० | पदोन्नती १००% | १) दुरध्वनी पर्यवेक्षक या पदावर किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| ५ | तांत्रिक सेवा<br>गट - ब | मुख्यगाळणी निरीक्षक<br>पद - १<br>९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील शास्त्र शाखेचा रसायनशास्त्र विषय घेऊन उत्तीर्ण झालेला पदवीधर<br>२) पाणी पुरवठा केंद्रातील मशिन व उपकरणे हाताळण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ६ | प्रशासकीय सेवा<br>गट-ब | कुस्ती कोच<br>पद-१<br>९३००-३४८०० ग्रेड पे ४६०० | पदोन्नती १००% | १) बी.ए.,बी.एड. (फिजिकल), एन.आय.एस. (कुस्ती खेळ)<br>२) महापालिका आस्थापनेवरील ७ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>३) महापालिकेच्या अर्हताधारक कर्मचा-यांच्या एकत्रित सेवाज्येष्ठतेच्या अधिन |
| ७ | वैद्यकीय सेवा<br>गट-ब | सहाय्यक आरोग्य अधिकारी (दंत) पद-१<br>९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० | पदोन्नती १००% | मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील B.D.S. पदवी, मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील MDS हि पदव्युत्तर पदवी व ३ वर्षे कामकाजाचा अनुभव व इंडियन डेंटल कौन्सिल कडील रजिस्टेशन आवश्यक असावे. |
| ८ | तांत्रिक सेवा<br>गट-ब | उपप्राचार्य (आयटीआय)<br>पद- १<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा ए.एम.आय.ई अ व ब परिक्षा उत्तीर्ण<br>२) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील तांत्रिक शिक्षण संस्थेमधील किमान गटनिदेशक पदावरील अद्यापनाचा अथवा शासकीय/निमशासकीय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | उद्योगातील अथवा संस्थेकडील पर्यवेक्षकीय पदाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नतीने १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा ए.एम.आय.ई अ व ब परिक्षा उत्तीर्ण<br>२) महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गटनिदेशक पदावरील ३ वर्षाचा अनुभव |
| ९ | तांत्रिक सेवा गट-ब | सेवा नियोजन अधिकारी ( प्लेंसमेंट ऑफीसर)<br>पद- १<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा ए.एम.आय.ई अ व ब परिक्षा उत्तीर्ण.<br>२) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील तांत्रिक शिक्षण संस्थेमधील किमान गटनिदेशक पदावरील अद्यापनाचा अथवा शासकीय/निमशासकीय उद्योगातील अथवा संस्थेकडील पर्यवेक्षकीय पदाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नती १००% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा ए.एम.आय.ई. अ व ब परिक्षा उत्तीर्ण.<br>२) महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गटनिदेशक पदावरील ३ वर्षाचा अनुभव |
| १० | तांत्रिक सेवा गट-अ | आर्ट ऑफीसर<br>पद- १<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची फाईन आर्ट विषयातील पदवी,<br>२) आर्टिस्ट या पदावरील 3 वर्षाचा अनुभव असणा-या सेवाज्येष्ठ कर्मचा-यांमधून, संगणक चालविण्याचा अनुभव |
| ११ | तांत्रिक सेवा गट-ब | आर्टीस्ट्र<br>ग्रेड-१<br>९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० | पदोन्नती १००% | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची फाईन आर्ट विषयातील पदवी,<br>२) आर्टिस्ट कम फोटोग्राफर या पदावरील ५ वर्षाचा अनुभव असणा-या सेवाज्येष्ठ कर्मचा-यांमधून, संगणक चालविण्याचा अनुभव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | तांत्रिक सेवा गट-अ | विकास अभियंता (दुरसंचार) १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० | पदोन्नती १००% | १) सांविधिक विद्यापीठाची इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेची पदवी/पदविका उत्तीर्ण.<br>२) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील १२ वी शास्त्र नंतरचा २ वर्षाचा पदविका शासन तंत्रशिक्षण मंडळाकडील डब्ल्यू.एम.सी.ओ. पदविका समकक्ष कोर्स उत्तीर्ण<br>३) वायरलेस इनचार्ज पदावरील महानगरपालिका सेवेतील ५ वर्षाचा कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव. |

वरील प्रमाणे नवीन पदनिर्मिती, संवर्ग, पदनाम/पदांची संख्या/वेतनश्रेणी, नेमणूकीची पध्दत व टक्केवारी, नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिकेच्या मान्यतेनंतर मुळ प्रस्तावात आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१६ अंतर्गत खालील पदांची निर्मिती व पदांच्या संख्येत वाढ करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | विभाग | पदनाम | प्रस्तावित पदांची संख्या | वाढ | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापत्य मुख्यालय | सह शहर अभियंता (स्थापत्य) | ० | १ | १ |
| २ | माहिती व तंत्रज्ञान विभाग | कॉम्प्युटर ऑपरेटर | २ | ४ | ६ |
| ३ | स्थापत्य मुख्यालय (BRTS प्रकल्प) | कार्यकारी अभियंता | १ | ३ | ४ |
| | | उपअभियंता | ३ | ६ | ९ |
| | | कनिष्ठ अभियंता | ६ | ६ | १२ |
| ४ | सुरक्षा विभाग | उपलेखापाल | १ | १ | २ |
| ५ | मध्यवर्ती भांडार विभाग | भांडार नियंत्रक | ० | १ | १ |
| ६ | वैद्यकीय (YCMH सह) | सहाय्यक आरोग्य अधिकारी (दंत) | ० | १ | १ |
| | | मायक्रोबॉयोलॉजिस्ट | १ | १ | २ |
| | | असिस्टंट मेट्रन | ५ | २ | ७ |
| | | लेखाधिकारी | १ | १ | २ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बायोमेडीकल इंजिनिअर | १ | १ | २ |
| | | ब्लड बँक टेक्नीशिअन | ७ | २ | ९ |
| | | एक्स रे टेक्नीशिअन | २४ | ६ | ३० |
| | | ए.एन.एम. | ९५ | ५ | १०० |
| | | कॉम्प्युटर ऑपरेटर | ४ | १ | ५ |
| ७ | आय.टी.आय. मोरवाडी | उपप्राचार्य | ० | १ | १ |
| | | प्लेसमेंट अधिकारी | ० | १ | १ |
| ८ | यांत्रिकी विभाग | उपअभियंता यांत्रिकी | २ | १ | ३ |
| ९ | अग्निशमन विभाग | प्रमुख अग्निशमन विमोचक | ३६ | ४ | ४० |
| | | चालक तथा यंत्र चालक | ४८ | २ | ५० |
| | | अग्निशमन विमोचक / फायरमन रेस्क्युअर | २०० | ८० | २८० |
| | | मुख्य लिपिक | १ | १ | २ |
| | | सहाय्यक भांडारपाल | ० | १ | १ |
| | | वाहन चालक | ५ | १ | ६ |
| | | कॉम्प्युटर ऑपरेटर | २ | १ | ३ |
| १० | विद्युत मुख्यालय (दुरसंचार सह) | सह शहर अभियंता, विद्युत | १ | १ | २ |
| | | विकास अभियंता (वि/यां) | ० | १ | १ |
| | | कार्यकारी अभियंता, दुरसंचार | ० | १ | १ |
| | | उपअभियंता, दुरसंचार | १ | १ | २ |
| | | वरिष्ठ दुरसंचार अधिकारी | ० | १ | १ |
| | | कनिष्ठ अभियंता, दुरसंचार | १ | ७ | ८ |
| | | कनिष्ठ दुरसंचार अधिकारी | १ | १ | २ |
| | | कनिष्ठ दुरसंचार अधिकारी, दुरध्वनी | ० | १ | १ |
| ११ | क्रिडा विभाग | क्रिडा पर्यवेक्षक | ७ | ५ | १२ |
| | | कुस्ती कोच | ० | १ | १ |
| १२ | नगरसचिव विभाग-विधी समिती कार्यालय | कॉम्प्युटर ऑपरेटर | ० | १ | १ |
| १३ | माहिती व जनसंपर्क विभाग | विशेष अधिकारी | ० | १ | १ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आर्ट ऑफीसर | ० | १ | १ |
| | | आर्टीस्ट | ० | १ | १ |
| १४ | पाणी पुरवठा विभाग, सेक्टर-२३ | मुख्य गाळणी निरीक्षक | ० | १ | १ |
| १५ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | उपप्राचार्य | ० | १ | १ |
| | | सेवा नियोजन अधिकारी (प्लेंसमेंट ऑफीसर) | ० | १ | १ |

वरील प्रमाणे नवीन पदनिर्मिती, मंजुर पदांच्या संख्येत वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिकेच्या मान्यतेनंतर मुळ प्रस्तावात आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रस्तावित (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१६ परिशिष्ट-२ मध्ये संबंधित पदाचे अनुक्रमांकापुढे नमुद मुळ अर्हतेऐवजी खाली नमुद केल्याप्रमाणे सुधारित अर्हता व व्रूस्ती नमुद करुन सुधारित अर्हतेसह मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|
| २ | प्रशासकीय सेवा गट- अ | अतिरिक्त आयुक्त १५६००-३९१०० ग्रेड पे ७९०० | पदोन्नती | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) मागील <u>५</u> वर्षातील अभिलेखापैकी किमान <u>४</u> गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ठ दर्जाचे असणे आवश्यक. या पात्रतेनुसार <u>५</u>अधिका-यांच्या नावाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात यावा. शासन स्तरावरील निवड समिती प्रस्तावाची छाननी करून नियुक्त करावायाच्या अधिका-याची शिफारस करेल. पदोन्नतीने उमेदवार उपलब्ध न झाल्यास हे पद भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल. |
| | | | प्रतिनियुक्ती | उर्वरित १ पद भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल. उपलब्ध न झाल्यास <u>राज्यशासन सेवेतील ७ वर्षाचा अनुभव असणा-या उपजिल्हाधिकारी/अप्पर जिल्हाधिकारी किंवा मुख्याधिकारी अ-</u> |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | निवडश्रेणी संवर्गातील अधिका-यांमधून भरणे. |
| ३ | प्रशासकीय सेवा गट- अ | उप आयुक्त १५६००-३९१०० ग्रेड पे ६९०० | पदोन्नतीने ७५ %<br>प्रतिनियुक्ती २५ % | बदल नाही |
| ४ | प्रशासकीय सेवा गट- अ | सहाय्यक आयुक्त | पदोन्नती ७५ % | बदल नाही |
| | | | प्रतिनियुक्ती २५ % | बदल नाही |
| ६ | प्रशासकीय सेवा गट- ब | प्रशासन अधिकारी | नामनिर्देशन ० % | वगळणे |
| | | | पदोन्नती १०० % | बदल नाही |
| ८ | प्रशासकीय सेवा गट– क | मुख्य लिपिक/कॉम्प्युटर ऑपरेटर स्वीय सहाय्यक मा.महापौर/स्वीय सहाय्यक मा.उपमहापौर/स्वीय सहाय्यक मा.अध्यक्ष स्थायी समिती/स्वीय सहाय्यक मा.सभागृह नेता / स्वीय सहाय्यक मा.विरोधी पक्षनेता/स्वीय सहाय्यक-मा.सभापती | पदोन्नती १००% | १) महानगरपालिका आस्थापनेवरील लिपिक संवर्गातील कामकाजाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>२) महानगरपालिका आस्थापनेवरील कॉम्प्युटर ऑपरेटर या पदासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणे आवश्यक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विधी समिती / व्यवस्थापक प्रेक्षागृह | | व्यवस्थापक प्रेक्षागृह- नाट्यशास्त्र पदविका व व्यवस्थापन मॅनेजमेंट कोर्स आवश्यक |
| १० | प्रशासकीय सेवा गट- ब | लघुलेखक (उच्चस्तर) | पदोन्नती १०० % | १) इयत्ता १२ वी उत्तीर्ण<br>२) बदल नाही<br>३) बदल नाही |
| १७ | तांत्रिक सेवा गट- अ | शहर अभियंता १५६००-३९१००-७९०० | पदोन्नतीने १००% | १) बदल नाही<br>२) वगळणे<br>३) बदल नाही |
| २० | तांत्रिक सेवा गट- ब | उपअभियंता | नामनिर्देशन ० % | वगळणे |
| | | | पदोन्नती १००% | १) बदल नाही<br>२) बदल नाही |
| २१ | तांत्रिक सेवा गट- क | कनिष्ठ अभियंता | नामनिर्देशन ७५% | १) बदल नाही |
| | | | पदोन्नती २५% | १) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्लंबर, सर्व्हेअर व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावरील पदवीधारक असल्यास ३ वर्षे व पदविकाधारक असल्यास ५ वर्षे अनुभव असणे आवश्यक, आय.टी.आय असल्यास ७ वर्षे अनुभव आवश्यक तसेच कनिष्ठ अभियंता नामनिर्देशन पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेले मनपातील वर्ग-३ मधील ७ वर्षे सेवा पुर्ण झालेले कर्मचारी<br>२) वगळणे |
| २२ | तांत्रिक सेवा गट- क | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | नामनिर्देशन ७५% | १) बदल नाही |
| | | | पदोन्नती २५ % | १) नामनिर्देशनातील विहित केलेली अर्हता धारक करणा-या महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कर्मचारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | तांत्रिक सेवा गट-क | गाळणी ऑपरेटर | नामनिर्देशन १०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील रसायनशास्त्र शाखेची पदवी. |
| ३४ | शहर विकास सेवा गट- क | सहा. नगररचनाकार | नामनिर्देशन ५० % | १) बदल नाही |
| | | | पदोन्नतीने ५० % | १) नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या महापालिका कर्मचा-यांच्या एकत्रित सेवा ज्येष्ठतेने<br>२) पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनाने भरणेत यावी. |
| ३८ | तांत्रिक सेवा गट-अ | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ / कार्यकारी अभियंता (संरचना अभियांत्रिकी) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील वास्तुशास्त्र शाखेची अर्बन डिझाईन विषयातील एम.आर्च. ही पदव्युत्तर पदवी किंवा संरचना अभियांत्रिकी (Structural Engineering) शाखेची पदव्युत्तर पदवी.<br>२) सदर कामाकाजाचा ५ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नतीने १००% | १) वगळणे<br>२) महानगरपालिका आस्थापनेवरील उप अभियंता (Structural Engineering) किंवा वास्तुशास्त्रज्ञ संवर्गातील, वास्तुशास्त्र शाखेची अर्बन डिझाईन विषयातील एम. आर्च ही पदव्युत्तर पदवी किंवा संरचना अभियांत्रिकी (Structural Engineering) शाखेची पदव्युत्तर पदवी धारण करणा-या अभियंत्या मधून.<br>३) वास्तुशास्त्रज्ञ/उपअभियंता पदाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ३९ | तांत्रिक सेवा गट-ब | वास्तुशास्त्रज्ञ / उपअभियंता (संरचना अभियांत्रिकी) | नामनिर्देशन २५% | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील वास्तुशास्त्रज्ञ शाखेची अर्बन डिझाईन विषयातील बी. आर्च. ही पदवी किंवा संरचना अभियांत्रिकी (Structural Engineering) शाखेची पदव्युत्तर पदवी. |
| | | | पदोन्नती ७५% | १) महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता संवर्गातील संरचना अभियांत्रिकी (Structural Engineering) शाखेची पदव्युत्तर पदवी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | धारण करणा-या अभियंत्यामधून.<br>२) महानगरपालिका आस्थापनेवरील ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ४२ | तांत्रिक सेवा गट-ब | उपअभियंता (यांत्रिकी) | नामनिर्देशन ० % | वगळणे |
| | | | पदोन्नतीने १००% | बदल नाही |
| ५९ | तांत्रिक सेवा गट-ब | उपअभियंता विद्युत | नामनिर्देशन ० % | वगळणे |
| | | | पदोन्नतीने १००% | बदल नाही |
| ६० | तांत्रिक सेवा गट-क | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन ५०% | बदल नाही |
| | | | पदोन्नती ५०% | १) बदल नाही |
| ६७ | तांत्रिक सेवा गट-ब | उपअभियंता (दुरसंचार) | पदोन्न्ती १००% | महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन पदवी/पदवीका आवश्यक) या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या अभियंत्यांच्या सेवाज्येष्ठतेचा विचार करून. |
| ६९ | तांत्रिक सेवा गट-क | कनिष्ठ अभियंता (दुरसंचार) | नामनिर्देशन ५०% | १) महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन) पदवी/पदवीका आवश्यक<br>२) शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील वायरलेस ऑपरेटर अथवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | | | पदोन्नती ५०% | १) बदल नाही<br>२) नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या वायरलेस ऑपरेटर किंवा मनपा आस्थापनेवरील इतर पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणा-या कर्मचा-यांमधून पदोन्नतीने (नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या वायरलेस ऑपरेटर पदाचे समायोजन करून रिक्त झालेल्या पदासाठी) |
| ७२ | तांत्रिक सेवा गट- | माहिती व तंत्रज्ञान | नामनिर्देशन ०% | १) वगळणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ब | अधिकारी | | |
| | | | पदोन्नती १००% | बदल नाही |
| ७४ | तांत्रिक सेवा गट-क | कॉम्प्युटर ऑपरेटर | नामनिर्देशन ७५% | १) बदल नाही |
| | | | पदोन्नती २५% | १) पदोन्नतीसाठी नामनिर्देशन प्रमाणे नेमणूकी करीता अर्हता आवश्यक<br>२) महानगरपालिका आस्थापनेवरील अर्हताधारण करणा-या गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांच्या एकत्रित सेवाज्येष्ठतेमधून |
| ७५ | लेखा सेवा गट-अ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | पदोन्नती १००% | १) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी या संवर्गातील किमान ३ वर्षाचा अनुभव |
| ७७ | लेखा सेवा गट- ब | लेखाधिकारी | नामनिर्देशन २५% पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास | बदल नाही |
| ८७ | प्रशासकीय सेवा गट- क | सहाय्यक माहिती व जनसंपर्क अधिकारी/सहाय्यक राज शिष्टाचार अधिकारी (प्रोटोकॉल ऑफिसर) | नामनिर्देशन २५%<br><br>पदोन्नती ७५% | १ ते ५ बदल नाही<br><br>१) नामनिर्देशनाची अर्हता धारण करणा-या महानगरपालिका आस्थापनेवरील गट-क मधील एकत्रित सेवाज्येष्ठतेने |
| ९० | प्रशासकीय सेवा गट- क | सहाय्यक ग्रंथपाल | नामनिर्देशन ५०%<br>पदोन्नती ५०% | १ ते २ बदल नाही<br>ग्रंथपाल शासनाकडील पदवी / पदवीका ही अर्हता धारन करणा-या मनपा आस्थापनेवरील गट क व ड मधील कर्मचा-यांच्या एकत्रित सेवाज्येष्ठता मधून |
| १०९ | प्रशासकीय सेवा गट- अ | मुख्य कामगार कल्याण अधिकारी | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १ ते २ बदल नाही |
| | | | पदोन्नती १०० % | बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११० | प्रशासकीय सेवा गट- ब | कामगार कल्याण अधिकारी | नामनिर्देशन | १ ते २ बदल नाही |
| ११९ | सुरक्षा सेवा गट- अ | मुख्य सुरक्षा अधिकारी (पुरुष) पद – १ वेतनश्रेणी १५६००- ३९१०० ग्रेड पे ६६०० | (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास ) नामनिर्देशन | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) बदल नाही<br>४) वगळणे |
| | | | पदोन्नती १००% | १) बदल नाही<br>२) बदल नाही |
| १२० | सुरक्षा सेवा गट - ब | सुरक्षा अधिकारी (पुरुष) | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) बदल नाही<br>४) वगळणे |
| | | | पदोन्नती १००% | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) लष्कर, निमलष्करी दलातील सेवानिवृत्त सुभेदार/नायब सुभेदार किंवा या पदाशी समकक्ष इतर पदे अथवा पोलीस दलातील पोलीस निरिक्षक या पदावरिल किमान ३ वर्षाची अनुभव असणे आवश्यक |
| १२१ | सुरक्षा सेवा गट- ब | सहाय्यक सुरक्षा अधिकारी (पुरुष/महिला) | पदोन्नती १००% | १) बदल नाही<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी |
| १२२ | सुरक्षा सेवा गट- क | सुरक्षा निरिक्षक (पदनाम बदल) | पदोन्नती १००% | १) पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरिल सुरक्षा रक्षक/रखवालदार पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| १२३ | सुरक्षा सेवा गट- ड | सुरक्षा रक्षक | नामनिर्देशन १००% | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी) व सुरक्षा रक्षक पदावर ३ वर्षाचा अनुभव<br>२) बदल नाही<br>३) बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ४) बदल नाही |
| १३३ | उद्यान सेवा गट-ड | माळी | नामनिर्देशन ५०%<br>पदोन्नती ५०% | १ ते २ बदल नाही |
| १३७ | वैद्यकीय सेवा गट- अ | वैद्यकीय अधिक्षक | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) बदल नाही<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील क्लिनिकल विषयातील मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील एम.डी. / एम.एस. / एम.डी.एस. पदवी<br>३) बदल नाही<br>४) बदल नाही. |
| | | | पदोन्नती १०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस/बी.डी.एस पदवी<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील एम.डी. / एम.एस.पदवी / एम.डी.एस. पदवी किंवा एम.सी.आय. / एम.एम.सी. कडील तत्सम अर्हता<br>३) बदल नाही<br>४) बदल नाही. |
| | | | प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) बदल नाही |
| १३८ | वैद्यकीय सेवा गट- अ | वैद्यकीय उपअधिक्षक | नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस/बी.डी.एस पदवी<br>२) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील एम.डी./ एम.एस.पदवी / एम.डी.एस. पदवी<br>३) बदल नाही<br>४) बदल नाही. |
| १५२ | वैद्यकीय सेवा गट- अ | ज्येष्ठ दंतशल्य चिकीत्सक ऐवजीसंचालक, दंत विभाग असा पदनाम बदल | पदोन्नती १००% | बदल नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७३ | वैद्यकीय सेवा गट- ब | दंतशल्य चिकित्सक | नामनिर्देशन १०० % | १) बदल नाही<br>२) <u>वगळणे</u><br>३) बदल नाही<br>४) बदल नाही |
| १८४ | निमवैद्यकीय सेवा गट- क | स्टाफ नर्स | <u>नामनिर्देशन ८०%</u><br><u>पदोन्नती २०%</u> | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) <u>स्टाफ नर्स पदाची शैक्षणिक अर्हता असलेल्या ए.एन.एम मधून ७ वर्षाचा अनुभव आवश्यक</u> |
| २७६ | पशुवैद्यकीय सेवा गट- ड | सहाय्यक ॲनिमल किपर | <u>नामनिर्देशन ५०%</u><br><u>पदोन्नती ५०%</u> | १) बदल नाही<br>२) <u>५ वर्षाचा अनुभव आवश्यक</u> |
| २९७ | अग्निशमन सेवा गट-अ | मुख्य अग्निशमन अधिकारी | नामनिर्देशन / प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास) | १) बदल नाही<br>२) बदल नाही<br>३) बदल नाही<br>४) बदल नाही<br>अ) बदल नाही<br>ब) बदल नाही<br>क) अनुभव-कोणत्याही महानगरपालिका किंवा १५ ते २० अग्निशमन केंद्रे असलेल्या महानगरपालिका किंवा विशेष नियोजन प्राधिकरणामध्ये मुख्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | अग्निशमन अधिकारी (वर्ग-१) किमान वेतनश्रेणी १५६००-३९१००, ग्रेड वेतन र.रू. ५४००) या पदावर ३ वर्षे सेवा केलेला तसेच वरील शैक्षणिक व शारीरीकदृष्ट्य सक्षम असावा. किंवा विभागीय अग्निशमन अधिकारी (वर्ग-२) या पदावर किमान ५ वर्षे सेवा पुर्ण किमान वेतनश्रेणी ररू. ९३००-३४८०० ग्रेड वेतन र.रू.५०००/-) या पदावर किमान ५ वर्षे सेवा केलेला तसेच वरील शैक्षणिक पात्रता पुर्ण करणारा उमेदवार असावा. किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून वेळोवेळी विहीत करण्यात येणारे सेवा प्रवेश नियम लागू होतील. |
| २७८ | क्रीडा सेवा गट-ब | क्रिडा अधिकारी | नामनिर्देशन ०% | वगळणे |
| | | | पदोन्नती १००% | १) बदल नाही |
| २८० | क्रिडा सेवा गट-क | शारिरिक शिक्षण संघटक (पदनाम बदल) | बदल नाही | बदल नाही |
| २९५ | सार्वजनिक आरोग्य सेवा गट-क | मलेरिया इन्स्पेक्टर | नामनिर्देशन ७५%<br><br>पदोन्नतीने २५ % | बदल नाही<br><br>बदल नाही |

वरील प्रमाणे दुरूस्तीस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिकेच्या मान्यतेनंतर मूळ प्रस्तावात आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांची वर्गीकरण) नियम २०१६ मधील परिशिष्ट १ ते ३ विभाग निहाय प्रस्तावित आकृतीबंध यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 454 सह 457 (3) अन्वये मा. विधी व मा.महापालिका सभेची मान्यता मिळणेकरीता विषयपत्र सादर करणेत आलेले आहे. प्रस्तावित करणेत आलेल्या आकृतीबंधा नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नव्याने

वाढ होणा-या पदांच्या अनुषंगाने सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रकानुसार एकूण उत्पन्नाशी आस्थापना खर्चाची टक्केवारी विचारात घेता सध्या टक्केवारी २३.७३% इतकी आहे. प्रस्तावित केलेली नविन पदनिर्मिती, मंजुर पदसंखेत वाढ यामुळे आस्थापना खर्चात साधारण ३.३५% इतकी वाढ होऊन आस्थापना खर्च २७.०८% इतका होणार असल्याने या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह हा विषय आकृतीबंध विषय आहे. महापालिकेमध्ये नियमावली बनवायची आहे याचा अभ्यास करण्यासाठी एक महीना हा विषय तहकूब करत आहोत ज्यांना ज्यांना यावर अभ्यास करायचा असेल त्यांनी अभ्यास करावा.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.आशा सुपे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणे ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८४८ विषय क्रमांक - ६

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/७/कावि/६१/२०१६, दि.१२/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६३ दि.१.०४.२०१६

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.औप्रसं/०१/कावि/७५/२०१६, दि.२०/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६४ दि.१.०४.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी संस्थांना NCVT, DGT, Ministry of Skill Development & Entrepreneurship Govt. Of India, New Delhi यांची संलग्नता (Affiliation) प्राप्त असून महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे.

संस्थेकरिता प्रवेश प्रक्रिया कामकाजकरिता सन १९९२ मध्ये धोरण ठरविण्यात आले असून त्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.२२०४ दिनांक १७/०७/१९९२ अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती. संस्थेतील प्रवेश प्रक्रीया करीता शासनाच्या मार्गदर्शक प्रणाली प्रमाणे सन २०१० मध्ये Admission Software प्रणालीचा समावेश तसेच इतर सुधारणा करण्यात आल्या.महानगरपालिकेच्या औ.प्र.संस्था करिता प्रशिक्षणापोटी आकारण्यात येणा-या शुल्कास / तारणधन / प्रशिक्षण फी प्रवेश फी इत्यादी मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४०२४ दिनांक ०७/०४/१९९९ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत प्रशिक्षण शुल्क दरमहा र.रु.१००/- एकत्रित र.रु.१,२००/- प्रतिवर्ष, प्रवेश शुल्क र.रु.१००/- व तारणधन र.रु.५००/- इ. फी आकारणी करण्यात येते.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण ३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक १४/०५/२०१५ अन्वये राज्यातील शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थासाठी ऑगष्ट २०१५ या सत्रापासून होणा-या प्रवेशासाठी नियमावली आणि शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी लागू करावयाच्या प्रशिक्षण शुल्क नियमावलीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या दोन्ही औ.प्र.संस्था करीता सदर शासन निर्णय लागू असून त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे

महानगरपालिकेच्या दोन्ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थाकरिता लागू करावयाच्या सुधारित " प्रवेश प्रक्रिया व प्रशिक्षण शुल्क धोरण २०१५ " मसूदा प्रस्तावा सोबतचे परिशिष्ट " अ " सह मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औदयोगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी व औदयोगिक प्रशिक्षण संस्था (मुलींचे) कासारवाडी येथील सन २०१६ च्या प्रवेश सत्रापासून केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करणेबाबत निर्देशित आहे. ही प्रवेश प्रक्रिया राबवितांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असलेल्या प्रवेशोत्सुक सर्व उमेदवारांना ७० % कोटयातून प्रवेश देण्यात यावा आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेरील वास्तव्य असलेल्या प्रवेशोत्सुक सर्व उमेदवारांना ३० % कोटयातून प्रवेश देणेत यावा. तसेच महानगरपालका हद्दीतील उमेदवार प्राप्त न झाल्यास हद्दीबाहेरील उमेदवारास प्रवेश देण्यात यावा. तथापि सदर संपुर्ण प्रक्रियेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील उमेदवारांना प्राधान्य देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८४९ विषय क्रमांक - ७

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.औप्रसं/०१/कावि/७५/२०१६, दि.२०/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६४ दि.१.०४.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी संस्थांना NCVT, DGT, Ministry of Skill Development & Entrepreneurship Govt. Of India, New Delhi यांची संलग्नता (Affiliation) प्राप्त असून महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे.

संस्थेकरिता प्रवेश प्रक्रिया कामकाजकरिता सन १९९२ मध्ये धोरण ठरविण्यात आले असून त्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.२२०४ दिनांक १७/०७/१९९२ अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती. संस्थेतील प्रवेश प्रक्रीया करीता शासनाच्या मार्गदर्शक प्रणाली प्रमाणे सन २०१० मध्ये Admission Software प्रणालीचा समावेश तसेच इतर सुधारणा करण्यात आल्या.महानगरपालिकेच्या औ.प्र.संस्था करिता प्रशिक्षणापोटी आकारण्यात येणा-या शुल्कास / तारणधन / प्रशिक्षण फी प्रवेश फी इत्यादी मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४०२४ दिनांक ०७/०४/१९९९ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत प्रशिक्षण शुल्क दरमहा र.रु.१००/- एकत्रित र.रु.१,२००/- प्रतिवर्ष, प्रवेश शुल्क र.रु.१००/- व तारणधन र.रु.५००/- इ. फी आकारणी करण्यात येते.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण ३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक १४/०५/२०१५ अन्वये राज्यातील शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थासाठी ऑगष्ट २०१५ या सत्रापासून होणा-या प्रवेशासाठी नियमावली आणि शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी लागू करावयाच्या प्रशिक्षण शुल्क नियमावलीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या दोन्ही औ.प्र.संस्था करीता सदर शासन निर्णय लागू असून त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे

महानगरपालिकेच्या दोन्ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थाकरिता लागू करावयाच्या सुधारित "प्रवेश प्रक्रिया व प्रशिक्षण शुल्क धोरण २०१५" मसूदा प्रस्तावा सोबतचे परिशिष्ट " अ " सह मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औदयोगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी व औदयोगिक प्रशिक्षण संस्था (मुलींचे) कासारवाडी येथील सन २०१६ च्या प्रवेश सत्रापासून केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करणेबाबत निर्देशित आहे ही

प्रवेश प्रक्रिया राबवितांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असलेल्या प्रवेशोत्सुक सर्व उमेदवारांना ७० % कोटयातून प्रवेश देण्यात यावा आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेरील वास्तव्य असलेल्या प्रवेशोत्सुक सर्व उमेदवारांना ३० % कोटयातून प्रवेश देणेत यावा. तसेच महानगरपालिका हद्दीतील उमेदवार प्राप्त न झाल्यास हद्दीबाहेरील उमेदवारास प्रवेश देण्यात यावा. तथापि सदर संपुर्ण प्रक्रियेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील उमेदवारांना प्राधान्य देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८५० विषय क्रमांक - ८

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.दवनि/१/कावि/१६/१६ दि.२९/०३/२०१६

सन २०१६-१७ च्या मंजूर अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेची मान्यता दिलेली आहे. सदर अंदाजपत्रकामधील सर्व विकास कामांच्या समोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस दरवर्षी प्रमाणे एकत्रित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. सन २०१७ जानेवारी/फेब्रुवारी मध्ये महानगरपालिकेची सार्वजनिक निवडणूक होणार आहे. सदर निवडणूकीची अचारसंहिता नोव्हेंबर/डिंसेबर मध्ये लागणार आहे. मनपा मंजुर अंदाजपत्रकातील नमुद विकास कामे करण्यासाठी सुमारे ८ महिन्यांचा कालावधी उपलब्ध आहे. या बाबीचा विचार करता सर्व विकास कामांच्या नावासमोर नमुद अंदाजपत्रकीय रक्कमेस, एकत्रीत प्रशासकीय मान्यता मिळाल्यास त्या त्याकामाची केलेली तरतुद त्याच वर्षात खर्च करता येईल व विकास कामांच्या निविदा प्रक्रिया हाती घेवुन सदरची विकास कामे उपलब्ध कालावधी मध्ये चालु करता येतील.

सबब सन २०१६-१७ च्या मंजुर अंदाजपत्रकात नमुद केलेप्रमाणे अ अंदाजपत्रक सर्व विभाग, क अंदाजपत्रक पाणीपुरवठा व जलनि:स्सारण विभाग, सर्व प्रकारच्या विशेष योजना, स्थापत्य उदयान, पर्यावरण अभियांत्रिकी, झोपडपट्टी निर्मुलन व पुर्नवसन विभाग, झोनिपु स्थापत्य, EWS व BSUP विभाग विदयुत विभाग, शुध्द/अशुध्द जल उपसा केंद्र, सेक्टर २३ विदयुत, सर्व विभागाचे प अंदाजपत्रक कामे, भुयारी गटर योजना, सर्व प्रभाग मुख्यालयासह, प्रभाग स्तरावरील सर्व प्रकारची विदयुत, पाणीपुरवठा व स्थापत्य विषयक सर्व कामे, महसुली अंदाजपत्रकातील सर्व प्रकारची देखभाल व दुरुस्तीची कामे, UTF फंडातील विकास कामे,

इत्यादी सर्व विकास कामांच्या समोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता–

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८५१ विषय क्रमांक - ९

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.आरोग्य/२/कावि/२५६ /२०१६ दि. ७/०४/२०१६

देशातील सर्व शहरां मधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४ पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | ८४,९६,०००/- | १,१७,५७,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ८,०९,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,३७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ३४,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,२७,०३,०००/-** | **२७,३७,००० /-** |
|  |  | **केंद्रशासन व राज्य शासन एकूणअनुदान** | **२,५४,४०,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ८०००/-, राज्य शासनाचे र.रु. ४०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३१/३/२०१६ अखेर प्रपत्र "अ" प्रमाणे कामकाज झालेले आहे.शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९/११/२०१५ अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा" असे कळविलेले आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/३/२०१६ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** |  | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा |  | पुणे |  |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या |  | ४५२७ |  |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची |  | ४०६९ |  |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या |  | २९६० |  |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | १०४२ |  |

| | | | |
|---|---|---|---|
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ४५० | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | १२७ सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | २८८४ लाभार्थी | GOI+GOM=१७३.०४ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ५७.६८ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **२३०.७२ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ३०२ लाभार्थी | GOI + GOM=१८.१२लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/-हिस्सा |
| | | ULB = ६.०४ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **२४.१६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता–

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.प्रशा/१/कावि/२२२/२०१६ दि.११/०४/२०१६

**विषयाचा आशय :- आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर करावयाच्या नेमणूकीस शासन मान्यता मिळणेबाबतच्या शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.**

**विषयाचे संदर्भात टिपण** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'आरोग्य वैद्यकीय अधिकारी' या अभिनामाचे एकमेव पद पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र गुरुवार दि. १७ ऑक्टोबर १९८५ भाग एक ए पुणे विभाग यांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्याकरीता पुढीलप्रमाणे अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे.

**<u>पदोन्नती</u>** -

1. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस आणि सार्वजनिक आरोग्य विषयातील पदविका **(DPH)**
2. सहाय्यक आरोग्याधिकारी किंवा वैद्यकीय अधिकारी पदावरील सलग ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा कामकाजाचा अनुभव.

डॉ. नागकुमार कुणचगी हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरुन दि.३०/०४/२०११ रोजी सेवानिवृत्त झाल्यापासून मा. शासनाकडे 'जॉईन्ट डायरेक्टर' दर्जाचा अनुभवी व कार्यक्षम अधिकारी प्रतिनियुक्तीवर उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करुनही तो उपलब्ध न झाल्याने व आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे जबाबदारीचे पद असल्याने दि.३१/०५/२०१३ रोजीच्या 'कार्यालयीन अधिक्षक' पदाचे पदोन्नती समिती सभेपुढे आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद पदोन्नतीने भरण्यासाठी विचार करण्यात आला.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, आरक्षण, गोपनीय अहवाल, सेवाज्येष्ठता क्रमांक व अनुभव कालावधी इत्यादि सेवाविषयक तपशील विचारात घेऊन दि.३१/१२/२०११ चे वैद्यकीय अधिकारी पदाचे अंतिम सेवाज्येष्ठता यादीमधील आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदासाठी आवश्यक असणारी अर्हता धारण करणारे अ.क्र. २० वैद्यकीय अधिकारी डॉ.के. अनिल रॉय हे एम.बी.बी.एस. असून त्यांनी डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता दि.३०/०५/२०१३ रोजी धारण केली आहे. तसेच या सेवाज्येष्ठता यादीमधील अ.क्र. २४ वरील अधिकारी डॉ.पवन वसंत साळवे यांनी एम.बी.बी.एस. व पी.एस.एम. ही शैक्षणिक अर्हता धारण केली असून, या दोन अधिकाऱ्यांमध्ये डॉ. के. अनिल रॉय हे सेवाज्येष्ठ अधिकारी असल्याने त्यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी या रिक्त पदावर पे बॅन्ड १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नेमणूक देण्यास तसेच सदर नेमणूकीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५(४) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन पदोन्नतीने नेमणूक देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. मा.महापालिका सभेने ठराव क्र. ५०३ दि.०५/०७/२०१४ अन्वये डॉ. के. अनिल रॉय यांच्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार डॉ. अनिल के. रॉय यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने करावयाच्या नियुक्तीस मा.शासनाची पूर्वमान्यता/मार्गदर्शन मागणी केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०१५ व दि.०७/०३/२०१५ च्या शासन पत्रान्वये सदर पदासाठी विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदी, तसेच पदोन्नती संदर्भात केलेले सर्वसाधारण निकषाच्या(ज्येष्ठता, गोपनीय अहवालाची सरासरी किमान प्रतवारी, निम्न पदावर किमान सेवा) आधारे महापालिकेने तपासणी करुन महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ४५(१) अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील नेमणुकीबाबत महापालिकेस प्रदान अधिकारात उचित निर्णय घेऊन कलम ४५(४) अनुसार योग्य तो प्रस्ताव शासनास सादर करण्याकामी निर्देश दिलेले होते.

शासन निर्देशाच्या अनुषंगाने दि.३१/०५/२०१३ रोजीच्या पदोन्नती समितीची शिफारस, मा.महापालिका सभेची मान्यता, शासन निर्देश आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी या बाबी विचारात घेऊन, आदेश क्र. प्रशा/१/कावि/३७७/१५, दि.२८/०४/२०१५ अन्वये डॉ. के. अनिल रॉय यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५(४) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन पदोन्नती देण्यात आली आहे

प्रकरणी शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार डॉ. के. अनिल रॉय यांच्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५(४) नुसार शासन मान्यता मिळण्याकामी इकडील पत्र दि.१५/०५/२०१५ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. मूळ प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने मागणी केलेल्या माहितीच्या पूर्ततेनुसार प्रकरणी इकडील पत्र दि२१/०९/२०१५ अन्वये अंतिम अहवाल मा. शासनास सादर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार नगरविकास विभाग शासन पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४/०३/२०१६ अन्वये प्रकरणी महापालिकेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीसाठी विहित केलेली अर्हता, अनुभव व अन्य संबंधित बाबी विचारात घेऊन पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबतची कार्यवाही करणेकामी कळविले आहे. त्यानुसार पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करणे बाबत विचार करणे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनमोदन देते.

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.आशा सुपे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रामंक - ८५२ विषय क्रमांक - १०

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.प्रशा/१/कावि/२२२/२०१६ दि.११/०४/२०१६

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८५३ विषय क्रमांक - ११

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील .क्र.शिक्षण/आस्था/१/कावि/ ६६/१६ दि.११/०४/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विभागामार्फत इ. ५ वी ते १० वी पर्यंतचे वर्ग चालविले जातात व विदयार्थ्यांना आवश्यक त्या सोईसुविधा पुरविल्या जातात परंतु इ. ५ वी ते १० च्या मुलींना अभ्यास करण्यासाठी घरी योग्य ते वातावरण नसते त्यामुळे इ. १० वी मध्ये मनपाच्या शाळा गुणात्मक दर्जा गाठू शकत नाहीत. या विदयार्थ्याचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

निगडी प्राधिकरणामधील ज्ञान प्रबोधनी ही नामाकींत शैक्षणीक संस्था गुरुकूल पध्दतीने शिक्षण देत असून या संस्थेचे विदयार्थी गुणवत्ता यादीत येत असतात. त्यामुळे मनपा शाळेतील मुलींना योग्य ते शैक्षणिक वातावरण व मार्गदर्शन होणेसाठी पिंपरी चिंचवड शहरातील मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सुरवातीस इ. ५ वी ते ८ वी व नंतर १० वी पर्यंतच्या मुलींना वसतीगृहाची सुविधा उपलब्ध करुन देऊन ज्ञान प्रबोधनी शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनेच्या नियंत्रणात सदर वसतीगृह व विदयार्थीनीना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी प्रायोगीक तत्वावर इ. ५ वीतील ८० गरजु व होतकरु मुलींसाठी निगडी येथील मनपाच्या प्राथमिक विदयालयाच्या इमारतीत वसतिगृहाची सुरवात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८५४ विषय क्रमांक - १२

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा. विधी समिती</u>**

दि.४/३/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८५५ विषय क्रमांक - १३

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दि.२४/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.९/३/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८५६ विषय क्रमांक - १४

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) दि.१६/२/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१/३/२०१६ व दि.१५/३/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनुराधा गोफणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८५७ विषय क्रमांक - १५

दिनांक - २०.४.२०१६ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कतिक समिती</u>**

अ) दि.२/३/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/२२९/२०१६
दिनांक - ३०/५/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(विषय क्र. २ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - १८

**सेवास्तर सुधारणा आराखडा (SLIP)**

**प्रपत्र - अ**

| अ.क्र | प्रकल्पाचे नांव | केंद्रशासन हिस्सा (33.33%) (र..रू.कोटीत) | राज्यशासन हिस्सा (16.67%) ( र.रू.कोटीत) | मनपा हिस्सा (50%) (र.रू.कोटीत ) | एकूण (र.रू.कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **पाणीपुरवठा वितरण व्यवस्था**<br>• २४x७ पाणीपुरवठा प्रकल्प (उर्वरीत ६०% शहरासाठी )<br>• आंद्रा धरणातून १०० MLD पाणी उचलणे व १२० MLD क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारणे.<br>• भामा आसखेड धरणातून १६७ MLD पाणी उचलणे व २०० MLD क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारणे. | ३३३.३० | १६६.७० | ५००.०० | १०००.०० |
| २ | **जलनि:सारण प्रकल्प**<br>• शहरातील ११९७२ वैयक्तीक शौचालये जलनि:सारण नलिकेला जोडणे.<br>• जुनी जलनि:सारण नलिका काढून नविन नलिका टाकणे (२०० कि. मी.)<br>• जलनि:सारण केद्राची क्षमता वाढविणे (७० MLD) | ९३.८० | ४६.९२ | १४०.७२ | २८१.४४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | • नविन भागामध्ये जलनि:सारण नलिका टाकणे (१३५ कि. मी.) | | | | |
| ३ | **बागा/उद्याने प्रकल्प**<br>• प्रभाग क्रमाक १ मधील तळवडे भागात डिअर पार्क विकसित करणे.<br>• प्रभाग क्रमाक ५ मधील चिखली भागात उद्यान विकसित करणे.<br>• प्रभाग क्रमाक ७ मधील च-होली भागात उद्यान विकसित करणे.<br>• प्रभाग क्रमाक १६ मधील आकुर्डी भागात उद्यान विकसित करणे.<br>• प्रभाग क्रमाक २७ मधील मोरवाडी भागात उद्यान विकसित करणे.<br>• प्रभाग क्रमाक ४० मधील खराळवाडी भागात उद्यान विकसित करणे.<br>• प्रभाग क्रमाक ४५ मधील पिंपरी वाघेरे भागात उद्यान विकसित करणे.<br>• प्रभाग क्रमाक ५२ मधील पुणावळे भागात उद्यान विकसित करणे. | ३७.०१ | १८.५१ | ५५.५३ | १११.०५ |
| ४ | **पावसाळी गटर योजना**<br>( Strom Water )<br>• पावसाचे पाण्याचा निचरा होणेसाठी नाला बांधणे (इंद्रायणी नदीकाटचा परिसर- Sub Basin No. 38 to 54 लांबी ७४.२ कि. मी.<br>• पावसाचे पाण्याचा निचरा होणेसाठी नाला बांधणे (पवना नदीकाटचा परिसर- Sub Basin No 28 to 37) लांबी ३८.३२ कि. मी.<br>• रस्ताचे कडेला पावसाळी गटर विकसित करणे (पवना नदीकाटचा डावी बाजू ) लांबी ३२२.२ कि. मी.<br>• रस्ताचे कडेला पावसाळी गटर विकसित करणे(इंद्रायणी नदीकाटचा परिसर) लांबी ३८७ कि. मी. | ४४२ .९६ | २२१.५४ | ६६४.५० | १३२९.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | **सार्वजनिक वाहतुक व्यवस्था**<br>• ७२० बस खरेदी करणे | १५९.१० | ७९.५८ | २३८.६८ | ४७७.३६ |
| | **एकूण** | **१०६६.१७** | **५३३.२५** | **१५९९.४३** | **३१९८.८५** |

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**प्रपत्र ब**

**अमृत शहरी सुधारणा ( Reforms) टप्पे आणि कालावधी ( Timeline ) बाबत.**

| अ.क्र. | विषयाचा तपशील | निकष / करावयाच्या सुधारणा (Milestone) | अंमलबजावणी कालावधी |
|---|---|---|---|
| १ | ई-गर्व्हनन्स (E-Governance) | डिजीटल स्थानिक स्वराज्य संस्था ( Digital ULBs )<br>१. स्थानिक स्वराज्य संस्थेचे संकेत स्थळ निर्माण करणे.<br>२. ई वार्तापत्र (e-Newsletter) प्रकाशित करणे<br>डिजीटल भारत करिता पुढाकार<br>३. डिजीटल भारत निर्माण करणेसाठी मदत करणे. (सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्वावर खोदाई (Ducting) कामकाज करणे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वत: करावे.) | <br>६ महिने<br>६ महिने<br><br>६ महिने |
| | | ई-स्थानिक स्वराज्य संस्थाची व्याप्ती ( संगणक प्रणाली सुरवात होण्याचे तारखेपासून )<br>• जन्म, मृत्यू नोंद व विवाह नोंदणी ( Registration)<br>• पाणीपट्टी व जलनि:सारण शुल्क<br>• तक्रार निवारण<br>• करसंकलन<br>• जाहिरात कर<br>• विविध परवाने देणे | २४ महिने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • बांधकाम परवानगी<br>• परिवर्तन (Mutations)<br>• पगारबील (Payroll)<br>• निवृत्तीवेतन (Pension) | |
| | | • ई-खरेदी ( e-procurement )<br>• प्रशासकिय व्यवस्थापन ( Personnel Staff management )<br>• प्रकल्प व्यवस्थापन ( Project Management ) | ३६ महिने |
| २ | महापालिका संवर्गाबाबत घटना व व्यवसायिकता ( Constitution and professionalization of municipal cadre ) | १. महापालिका संवर्ग स्थापन करणे<br>२. संवर्ग निहाय प्रशिक्षण<br>३. महापालिकेचे अस्थापनेवर प्रशिक्षणार्थीची नेमणूक व अंमलबजावणी करणेबाबतचे धोरण.<br>४. स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत लोकसंख्याचे प्रमाणानुसार निर्मिती व वेतन खर्च विचारात घेवून राज्य शासन महापालिकेचे पदाधिकारींची संख्या निश्चित करण्याचे धोरण.<br>( The State will prepare a Policy for Right-sizing the number of Municipal functionaries depending on, say, population of ULB generation of internal resources and expenditure on salaries.) | २४ महिने<br>२४ महिने<br>१२ महिने<br>३६ महिने |
| ३ | द्विनोंद लेखा पद्धतीचा अवलंब करणे (Augmenting double entry | १. सर्व लेखे द्विनोंद लेखा पद्धतीने परिवर्तन करून प्रत्यक्षात अवलंब करणे व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून याबाबतचे लेखापरिक्षण प्रमाणपत्र प्रत्येक आर्थिक वर्षासाठी प्राप्त करून घेणे.<br>२. अंत:र्गत लेखापरिक्षक नेमणूक करणे. | १२ महिने<br>२४ महिने |

| | | | |
|---|---|---|---|
| | accounting) | ३. वार्षिक वित्तीय विवरणपत्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. | प्रती वर्षी |
| ४ | नागरी नियोजन आणि शहर पातळीवर योजना ( Urban Planning and City level Plans ) | १. भौगोलिक सुचना प्रणालीचा ( G.I.S.) चा वापर करून मास्टर प्लॅन तयार करणे.<br>२. सेवा स्तर सुधारणा योजना ( SLIP ) तयार करणे, राज्य वार्षिक कृती आराखडा ( SAAP ) तयार करणे. | ४८ महिने<br>६ महिने |
| | | ३. शहरी विकास प्राधिकरण स्थापन करणे. (Urban Development Authorities ) | ३६ महिने |
| | | ४. हरीत क्षेत्र ( Green Cover ) पाच वर्षात १५% वाढविणेसाठी कृती आराखडा तयार करणे. | ६ महिने |
| | | ५. अमृत शहरामध्ये प्रतीवर्षी कमीतकमी एक बगीचा (बालोद्यान) ( Children Park )लहान मुलांसाठी तयार करणे<br>६. लोकसहभाग सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPPP) पद्धतीने महानगरपालिकेची मैदाने, पार्क, मनोरंजन केंद्रे इत्यादीचे देखभाल व दुरूस्तीचे नियोजन करणे.<br>७. शास्वत आवास राष्ट्रीय अभियान ( National Mission for Sustainable Habitat )मध्ये दिलेल्या घटकांची अंमलबजावणी करणेसाठी राज्य स्तरीय धोरण तयार करणे. | प्रति वर्षी<br>१२ महिने<br>२४ महिने |
| ५ | शासकीय निधी व सेवां विषयी वर्गीकरण करणे ( Devolution of | १. १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांकडे निधीचे हस्तांतरणांबाबत खात्री करणे.<br>२. राज्य वित्त आयोगाची (SFC) नेमणूक करणे व त्या अनुषंगाने निर्णय घेणे. | ६ महिने<br>१२ महिने |

| | | | |
|---|---|---|---|
| | funds and functions ) | ३. राज्य वित्त आयोगाने (SFC) केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी वेळेत करणे.<br>४. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सर्व १८ सेवा व कामकाज हस्तांतरीत करणे. | १८ महिने<br>१२ महिने |
| ६ | इमारत (बांधकाम) उपविधी आढावा ( Review of Building by-laws ) | १. इमारत (बांधकाम) उपविधीची नियमीतपणे सुधारणा करणे.<br>२. ५०० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे सर्व इमारती आणि सार्वजनिक इमारतींचे छतावर सौर उर्जा यंत्रणा उभारणी कामी धोरण व कृती आराखडा राज्य शासनामार्फत तयार करणे.<br>३. ३०० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या नवीन इमारती आणि सर्व व्यवसायिक इमारतीमध्ये पावसाचे पाणी साठविणेची यंत्रणा (Rain Water Harvesting) उभारणी करणेबाबत धोरण व कृती आराखडा राज्य शासनामार्फत तयार करणे.<br>४. बांधकाम परवानगी मंजूरी करिता एक खिडकी योजना तयार करणे | १२ महिने<br>१२-२४ महिने<br>१२-२४ महिने<br>१२ महिने |
| ७ | राज्य स्तरावर आर्थिक मध्यस्थ संस्थेची व्यवस्था करणे. (Set-up financial intermediary at state level) | १. आर्थिक मध्यस्थ संस्थेची व्यवस्था तयार करणे व कार्यान्वित करणे त्यासाठी निधी जमा करणे, बाह्य मार्गाने निधी उपलब्ध करणे, म्युनिसिपल बाँड प्रमाणे प्रक्रिया राबविणे. | १२-१८ महिने |
| ८ (अ) | महापालिका कर आणि शुल्क सुधारणा ( Municipal tax and fees improvement ) | १. किमान ९०% कर आकारणी क्षेत्र ( Atleast 90% coverage )<br>२. किमान ९०% कर वसुली करणे. ( Atleast 90% collection )<br>३. ठराविक कालावधीनंतर मिळकत कर व शुल्क सुधारित करणेसाठी धोरण निश्चित करणे.<br>४. करांची मागणी व वसुली पुस्तिका तपशिल संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. | १२ महिने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५. जाहिरात महसुलात वाढ होणेसाठी पुर्ण क्षमतेचे धोरण निश्चित करणे, शहरातील ठिकाणांनुसार दर निश्चित करणेबाबत डायनामिक पद्धतीने निश्चित करणे. (Achieve full potential of advertisement revenue by making a policy for destination specific potential having dynamin pricing module.) | |
| ८ (ब) | वापरानुसार शुल्क आकारणी करणे व वसुली करणेकामी सुधारणा करणे. ( Improvement in levy and collection of user charges ) | १. वैयक्तिक व संस्थात्मक पाणीपट्टी दराची वापरानुसार मुल्यांकन करणे व त्यानुसार वेगवेगळी दर आकारणी करणे व त्याकरिता धोरण निश्चित करणे आणि पाण्याची पुरेशी सुरक्षितता बाबत काळजी घेणेसाठी धोरणात समावेश असावा.<br>२. पाण्याची गळती २०% पेक्षा कमी होईल यादृष्टीने कृती आराखडा तयार करणे व मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.<br>३. वापरानुसार शुल्क आकारणी करणेकरिता स्वतंत्र खाते ठेवणे.<br>४. किमान ९०% मागणी ( Billing )<br>५. किमान ९०% शुल्क वसुली. | १२ महिने |
| ९ | पतदर्शक मूल्यांकन (Credit Rating ) | १. स्थानिक स्वराज्य संस्थेने पतदर्शक मुल्यांकन (Credit Rating) करून घेणे. | १८ महिने |
| १० | उर्जा आणि पाण्याचे लेखापरिक्षण ( Energy and Water Audit ) | १. उर्जा (रस्त्यावरील दिवे) आणि पाण्याचे लेखापरिक्षण (महसूल न होणा-या अथवा वाया जाणारे पाण्यासह)<br>२. मलनि:सारण केंद्र व जलनि:सारण केंद्र अधिक उर्जा कार्यक्षम करणे<br>३. उर्जा कार्यक्षम पद्धतीचा वापर करून रस्त्यावरील दिवे अपारंपारिक उर्जा अनुकुल करणे.<br>४. ग्रीन इमारतींसाठी प्रोत्साहन देणे. ( उदा. मालमता कर अथवा बांधकाम | १२ महिने<br>१२ महिने<br>१२ महिने<br>२४ महिने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परवानगी/विकास शुल्कामध्ये सवलत ) | |
| ११ | स्वच्छ भारत अभियान ( Swachh Bharat Mission ) | १. उघडयावरील शौचास बंदी करणे.<br>२. कचरा गोळा करणे. (१००%)<br>३. कचरा वाहतुक करणे.( १००%)<br>४. शास्त्रीय पद्धतीने कच-याची विल्हेवाट लावणे.( १००%) | ३६ महिने |

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

**(विषय क्रमांक १० चे लगत)**

महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्र. पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२
**नगर विकास विभाग,**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १४.३.२०१६

प्रति,

आयुक्त,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी.

**विषय : आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर करावयाच्या नेमणूकीस <u>शासन मान्यता मिळणेबाबत.</u>**

**संदर्भ** :- १) आपले पत्र क्र. प्रशा/१/कावि/४३२/२०१५,दिनांक १५.५.२०१५
२) आपले पत्र क्र. प्रशा/१/कावि/७२५/२०१५,दिनांक २७.८.२०१५
३) आपले पत्र क्र. प्रशा/१/कावि/७३०/२०१५,दिनांक २७.८.२०१५
४) आपले पत्र क्र. प्रशा/१/कावि/७७९/२०१५,दिनांक २१.९.२०१५

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्र. १ येथील दिनांक १५.५.२०१५ च्या पत्रान्वये पाठविलेला प्रस्ताव व त्याअनुषंगाने संदर्भ क्र. २ ते ४ येथील पत्रान्वये सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रकरण शासनास सादर केले असता, **महानगरपालिकेने पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करावा,** असे निर्देश शासनाने दिले आहेत. तरी, शासनाचे सदर निर्देश व आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य संबंधित बाबी विचारात घेवून, पदोन्नती समितीच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबतची कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

( ए. कि. सहाणे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

आयुक्त कार्यालय
आवक क्र.- २२१४
दिनांक- १४/३/१६
विभाग- प्रशासन
स्वीय सहा.
मा. आयुक्त-